सालअखेर १ ७ ॥ १८८
किरकोळ अंकास .................. ०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचें आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस .... ०१

Single copy ............................ 4 as.

# वऱ्हाडसमाचार.

Advertisement
Below 10 lines...2 Rs.
per line over 10...4 as.
Repitition per line 3 as.

THE BERAR SAMACHAR

VOL XXVIII | AKOLA MONDAY 6 AUGUST 1894 | NO. 31

वर्ष २८ | आकोला सोमवार तारीख ६ माहे आगष्ट सन १८९४ इ० | अंक ३१

## सर्व नजरबंदीच्या माकडचेष्टांस ह्मणून पाडतां येते.

मी रस्त्यांत जेंव्हां लोकांडी खात चालत असे तेव्हां लोकांनीं माझ्याकडे बोट दाखवून हिणवावें कीं पहा काय बेटा झिंगून गेलेला आहे आणि प्रथम दर्शनीं तुह्मासही खास त्यांच्या सारखेंच वाटलें असतें. परंतु ते सर्व चुकत होते. मर रस्त्यांत मला चालतांना झोकांड्या येतात ह्मणून आपण मला विचाराल तर त्याचें समर्पक उत्तर देण्यास माझ्या आयुःक्रमाचे पूर्व मार्गावर थोडेसें गेलें पाहिजे

आज तागाईत एखाद्या आनंदी व रंगेल मनुष्या प्रमाणें मी सुखी प्राणी होतों परंतु चार पांच वर्षापूर्वी मला वाटूं लागलें कीं माझ्यांत कांहीं कांहीं तरी कमी जास्त होत आहे. जेवतांना पूर्वीसारखी माझी क्षुधा राहिली नव्हती. मला भूक लागे व खाण्याची इच्छा होई परंतु तोंडांत घास गेला कीं लागलीच पक्काशय उमळून येई व जसें कांहीं वेढावा करून माझ्या हतुस ह्मणत पाहे'. हें मला अरिष्ट नवीनच व त्याचें मला मोठें आश्चर्य वाटे. मी जेव्हां ह्मणून खाण्याचा आव घाली तेव्हां तेव्हां मला फारच तिटकारा येई. कदाचित पोटांत कांहीं अन्न गेलें तर तें अन्न किंवा मांस न वाठतां एखाद्या शिशासारखें जड वाटे त्या मुळें निजायाला जातांना आपल्यास जशी सुस्ती चढून थकवा येतो त्या प्रमाणें मला होत असें. ह्यामुळें रात्रीं झोंपेचा कल अगदीं बदलला. झोंप थोडी पण चांगली येई. कधीं कधीं बरोबर येत नसे, व धुंद झाल्या सारखें मला वाटल्यामुळें मी केव्हां केव्हां आफू किंवा इतर अमली पदार्थ घेत असे. मी जीभ पहातो तो तिच्यावर थर जमलेला आणि काम करण्याची हौस बिलकूल नाहींशी झालेली असे.

माझ्या बरगड्यांत आणि पाठींत सपाटून दुखत असे व कधीं कधीं ह्या वेदना खांद्यांत भाला टोंचल्या सारख्या वाटत. मी आरशांत पाहिलें तों माझे डोळे पिवळे दिसूं लागले. आणि माझ्या दांत व हिरड्या सभोंवती कीट जमलेला दिसे व मुखमार्जन करण्यास पाणी न मिळाल्यामुळें किंवा इतर साधनें दांताजवळ नसल्यामुळें माझ्या तोंडाची घाण फारच येई. माझा कोठा फारच जड झाला आणि पक्काशयांत घाणेरडा वायू उत्पन्न होऊन तोंडावाटे ढेंकर देतांना निघून जाई ह्या वेळेस मला किती वाईट वाटत होतें हें मी कधीं विसरणार नाहीं. ह्या वेळीं रस्त्यांत चालत असतां एकदम घेरी यावी; हलक वाटावें. आणि गरगर फिरल्यासारखें वाटून झोकांड्या देत चालावें व जमिनीवर सबगळ पडून नमस्कार घालावा लागत असे. माझ्यानें हें विघ्न जितकें टाळता येईल तेवढें टाळून घेई व आतां तें गेलें असें समजून तो दिवस घालवीत असे.

माझ्या मित्र मंडळीनें व वैद्यानें जीं जीं औषधें घेण्यास सांगितलीं तीं त घेतलीं त्यापासून गुण न येतां मी अगदीं सुदामदेव झालों. व आतां ह्या वस्तीस रामराम ठोकून परलोकचा रस्ता धरावा असें मला वाटूं लागलें. ह्याप्रमाणें माझा क्रम चालला होता.

आतां मी तुह्मास थोडक्यांत निवेदन करतो कीं बरा कसा झालों ह्याचें कारण आपणास कळवावें हें अगदीं रास्त आहे. लंडनांत माझा एक स्नेही होता. त्याच्या कानावर माझी गोष्ट पडल्याबरोबर त्यानें सांगितलें कीं मदर सिजेलचा रोगहारक सिरपा (ह्मणजे माता सिजेलचा रोगहारक पाक) तुह्मांस फारच गुणाकारी होईल.

माझा कांहीं त्याच्या ह्मणण्यावर भरंवसा बसेना. परंतु एक बाटली तर थोडे दिवस घेऊन पहावी ह्मणून विचार केला. मला ह्या औषधापासून इतका जल्द गुण आला कीं मला खातांना बरें वाटलें व झोंप चांगली यावी. मला हें पथ्यावर पडल्यामुळें इतकें बरें वाटलें कीं मी ह्या औषधाच्या आणखी चार बाटल्या पार केल्या.

मी बरा झालों. हें औषध दैविकासारखें वाटलें मला खचित वाटलें कीं हें औषध ईश्वराच्या प्रेरणेनेंच मला मिळालें.

मी आतां पुन्हा ताजातवाना झालों व त्यामुळें ज्या मला आनंदाच्या उकळ्या फुटल्या त्या सांगतां पुरवत नाहींत. आतां केव्हां तरी थोडेसें अपचन झालें कीं, जें सर्वांस होत असतें, त्या वेळेस मी ह्या औषधाचा लहान घोट घेतों व लागलीच मला त्यापासून आराम वाटतो.

ह्याचा तत्काळ गुण आल्यामुळें मला नजरबंदीच्या खेळाची आठवण होते परंतू खरोखर माता सिजेलच्या क्युरेटिव सिरपांत डोळ्यात माती टाकण्यासारखा कांहीं प्रकार नाहीं. मला अनुभवावरून खात्रीनें सांगतां येतें कीं कितीहि जुनाट अग्निमांद्य व अजीर्ण अगदीं वाईट स्थितीपासून असो तरी ह्या औषधा पासून हटकून गुण यावयाचाच.

मी तुमचा उपकार मानणारा
( सही ) जे. सी. सिमसन
२१ ह्यानोवरचा रस्ता, न्युकासल अंडर लाईन, स्टाफर्ड शिपर इंग्लंड.

B. T.

---

## नाग, नरसे, पिठोरी व जिवत्या.

आह्मी येथें विक्री करितां नाग, नरसे, जिवत्या व पिठोरी किंवा पाठोरा हीं चित्रें ठेविलीं आहेत. चित्रें फारच सुरेख व पहिल्या पेक्षा त्यांत फरक करून किंमतही कमी करून उत्तम प्रकारचीं छापलीं आहेत. ज्याना पाहिजे असतील त्यांनीं खालील पत्यावर पैसे पाठविले असतां सदर्हू चित्राचे कागद पाठवून देऊं. किंवा व्हॅल्यूपेबलनेंही पाठवूं. चित्राचा दर शेंकडा १।, रुपया प्रमाणें. शिवाय टपालहशील पडेल.

बाळकृष्ण अनंत कंपाझीटर
वऱ्हाडसमाचार आफिसांत मिळतील.

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण शुद्ध ५ शके १८१६

हिंदुस्थान सरकारचा खजिना रिकामा आहे ह्मणून सरकारचें मंत्रिमंडळ खजिना भरून काढण्याच्या प्रयत्नांत आहे. प्रत्यक्ष कर नवीन बसविण्याची सीमाच उरली नाहीं. ह्मणून अप्रत्यक्ष मार्गांनीं नवीन कर काढण्याची युक्ति योजण्यांत आली आहे. जकातीचा कायदा पसार झाल्यामुळें विलायतचा कपडालत्ता खेरीज करून सर्व पदार्थ जकातीच्या बोजामुळें महाग झाले आहेत आणि त्या त्या पदार्थांच्या उपयोगद्वारा इंडियाची प्रजा हा नवीन कर भरीत आहे. पैशाची तूट तर वाढतच आहे त्या अर्थीं सध्यां वगळलेल्या विलायती कपड्यावर जकात बसविण्याची वाटाघाट चालूं आहे. म्यांचेस्टरचे गिरणीवाले आपल्या मतलबासाठीं डोळ्यांत तेल घालून बसले आहेत. त्यांचा आग्रह आहे कीं विलायती कपड्यावर जकात बसविली तर त्याच्या अगोदर हिंदुस्थानांत उत्पन्न होणाऱ्या कपड्यावर जकात ठेविली पाहिजे. लार्ड किंबरले स्टेट सेक्रेटरी होते तेव्हां यांनीं आपले मानपत्रांत स्टेट सेक्रेटरीस जकात न बसविण्या विषयीं विनंती केली. त्या लोकांची भीड पडली, पार्लमेंटांतील त्या लोकांचे प्रतिनिधीस दहशत बसली कीं म्यांचेस्टरच्या विरुद्ध न्यायाचें तराजूं झुकलें तर आपली पदच्युति होईल आणि अखेर त्याच जोरदार लोकांचा पगडा हिंदुस्थानच्या राज्यकारभारावर बसला! विलायतचा कपडा आरंभीं जकातीच्या कायद्यांतून पार पडला खरा पण आतां जकात बसविणें सद्यस्थिती वरून भाग झालें आहे. जकात ठेविली तर आमच्या लोकांस कपडालत्ता महाग मिळत जाईल परंतु राष्ट्रीय राज्यकारभाराच्या कार्यीं निमित्त प्रसंग विशेषीं आयात मालावर जकात बसविणें हा एक अप्रत्यक्ष कराच्या रूपानें पैसा गोळा करण्यास सुलभ मार्ग आहे.

विलायतचे गिरणीवाले ह्मणतात कीं विलायती कापडावर जकात बसविल्यानें इंडियाच्या व्यापारास उत्तेजन मिळेल व स्वकीय व्यापार बसेल तेव्हां अर्थशास्त्रदृष्टीनें हिंदुस्थानांतल्या कपड्यावर जकात बसवावी. वास्तविक ही गोष्ट अर्थशास्त्रदृष्टीनें चुकीची आहे आणि तिचा भक्कम पाया स्वार्थपरायणतेवर बसविला असून त्या आपमतलबी लोकांच्या गुलामगिरींत आह्मी माना डोलवून स्वस्थ आहो. अप्रतिबंध व्यापाराचें तत्व चांगलें आहे पण तें ज्या देशांस लागू करावयाचें असेल त्यांची स्थिती समसमान असून उभयतामधील उपकरण साधनें सारखींच असलीं पाहिजेत. तोलास तोल देणाऱ्या देशामध्यें स्पर्धा व सामना घडला पाहिजे. नाहीं तर इसापनीतींतील पितळेच्या भांड्याशीं स्नेहभावानें टक्कर मारणाऱ्या मातीच्या भांड्याची गती झाली त्या प्रमाणें विलायतच्या लोकांचा फायदा व या देशाचा व्यापार व हुन्नर यांस अक्षता अशी स्थिती आली आहे दुसरें, या देशाची आधिभौतिक व सांपत्तिक स्थिती सुधारावी असा खरा हेतु असल्यास त्यांतील गिरणींच्या मालावर जकात उपयोगी नाहीं. जगावरील कोणत्याही देशांत परकीय देशाच्या कल्याणा साठीं स्वदेशी मालावर जकात बसविल्याचें आढळांत नाहीं पण इंडियाच्या भूमीवर नवलाच्या व अद्भुत गोष्टी काय काय होणार नाहींत ! मुंबईस या प्रश्नाचा खल चालला असतांना मि. डग्लास नांवाचे मुंबईकर गिरणीवाले ह्मणाले कीं इंडियाच्या कपड्यावर जकात बसविल्यानें सरकारच्या आजपर्यंतच्या राजनीतीवर पाणी पडल्या सारखें होणार आहे. देशी माल सरकारी खात्यांतून उपयोगांत आणिला जावा व रेलवेकडेही देशी वस्तु वापराव्या ह्मणून सरकारचे निरनिराळे ठराव झाले आहेत. या ठरावांचे मूलतत्वावर जकाती मुळें गदा बसणार नाहीं काय? जकात न बसविण्यास तिसरें कारण असें कीं विलायती कपडा बारीक सुताचा असून देशी कपडा जाडाभरडा व ओबडधोबड असतो. वास्तविक दोन्ही मालामध्यें चढाओढ व स्पर्धा बिलकूल नाहीं तेव्हां देशी कपड्या वरील जकातीनें विलायतच्या गिरणीवाल्यांचा कांहीं फायदा होण्या सारखा नाहीं. चवथें कारण, देशी कपड्यावर जकात बसविली तर अडक्याचा बाजार व बारा रुपयांचा गोंधळ असा फार्स होणार आहे. सरासरी पावलाख रुपये अशा जकाती पासून उत्पन्न होतील तर ती जकात गोळा करण्याचा खर्चही एवढ्या उत्पन्नानें भागण्या सारखा नाहीं. पांचवी गोष्ट विशेषें करून ध्यानांत ठेविली पाहिजे ती अशी कीं या देशाला फक्त विलायतेशींच टक्कर द्यावयाची नाहीं तर चीन व जपान या दोन देशांशीं नवीन चाढाओढ सुरूं झाली आहे. चीन व जपान येथील यंत्रालयें, व गिरण्या हीं मोठ्या झपाट्यानें चालली आहेत तेव्हां तिकडील मालापेक्षां स्वस्त व चांगला माल या देशांत निघाला पाहिजे आणि तसें झालें नाहीं तर इंडियाचा व्यापार ठार बुडेल. त्या अर्थीं एतद्देशीय व्यापारास उत्तेजन ज्या दिशांनीं मिळेल त्या दिशांनीं तें दिलें पाहिजे. हुंडणावळीच्या भावांतील चलबिचलीमुळें व्यापार पुष्कळ कमी झाला आहे आणि देशी कच्चा मालावर जकात बसल्यानें येथील गिरणीवाल्यांचें ज्यास्त भांडवल गुंतून गेलें आहे. अशा प्रकारें मांडावलेल्या देशी व्यापाराच्या अगदीं बाल्यावस्थेंत निराळ्या जकातीच्या रूपानें जो आघात बसेल त्यामुळें सरकारचें हें बहुत नुकसान आहे.

महाराणी सरकार कोणाच्या धर्मांत हात घालणार नाहीं तेव्हां कोणी परधर्मियाचे फारशी पर्वा करूं नये, त्याचा पूर्व हक्क, चालीत, व मानपान हलका झाला तथापि कांहीं हरकत नाहीं. स्वेच्छाचारी वर्तनाचा परवाना प्रत्येका जवळ आहे असेंही पुष्कळास वटूं लागलें आहे आणि त्या चुकीच्या ग्रहामुळें कोणी कोणाला फारशी भीक घालीत नाहीं. अशा बेपरवाईच्या स्थितींत पूर्व धर्मबंधनें व भिन्न भिन्न चालीरिती मोडण्याच्या खटपटींतही पुष्कळजण एक देव, एक धर्म असा प्रकार करूं पहात आहेत. तशांत कांहीं आंग्लो इंडियन अधिकारी हिंदूवर सुप्रसन्न, कांहीं मुसलमानांवर दीलखुष आणि कांहीं दोहों जातींचा बीमोड करून पाद्री धर्मप्रसारांत निमग्न असे असल्यामुळें ज्याचा हात जसा फावतो तसा तो आपली तरवार गाजवितो आणि कोणत्या तरी धर्माचा पुढाकार व बाकीच्या धर्मांची अवहेलना करूं लागतो. इंग्लंडांत क्याथोलिक व प्राटेस्टंट धर्मांच्या संबधानें किती आहुति पडल्या आहेत व राजक्रांत्या झाल्या आहेत हें आठवलें ह्मणजे सांप्रतचे दंगे विशेष नवलाचे वाटणार नाहींत. इंडियन लोकांच्या मुदैवानें मुसलमानी धर्म संग्राहक आहे ह्मणजे पाहिजे तो मनुष्य मुसलमान होतो किंवा मुसलमानी धर्म सोडूं शकतो. हिंदुधर्म संग्राहक नाहीं तथापि त्याचें मूलबीज ज्याचा त्यानें आपला उपजत कुटुम्बीय धर्म पाळावा, व अन्य धर्मांचा योग्य मान राखावा असा संगमनयोग्य व तत्वशः सर्वव्यापक धर्म असल्यामुळें हिंदुमुसलमानांची एकी झाली, व परस्परांस योग्य मान ते लोक देत आले.

शिवाय राजकीय प्रकरणांत उभयतां एका छत्राखालीं आहेत आणि दोघांचा राज्यकारभार शहाण्या न्यायाधीशाच्या हातांत आहे. पूर्व वैभवाची हिंदूस व मुसलमानास आवड आहे. उभय जाती राज्यकर्त्या होत्या. उभयतांनीं राज्यसत्ता उपभोगिल्या आहेत तेव्हां इंग्रजी राज्यांत उभयतांचा उपमर्द न होतां समसमान दृष्टीनें उभयतांच्या पूर्वापार चालत आलेल्या गोष्टी राज्यकर्त्यांनीं अव्याहत चालविल्यास राज्य चिरकाळ व अढळ राहील.

इंग्रजी राज्याचें मूलतत्व असें कीं ज्याचा तो धनी. मारील त्याची तरवार. पूर्वापार संबध व राजकीय मामुलींतले हक्क यांस कोणी विचारीत नाहीं. व्यक्तिस्वातंत्र्य फार माजलें आणि तें इतकें कीं जणू काय हिंदुमुसलमानांचा निराळा इतिहास इंग्रजीपासूनच सुरू झाला. पूर्वीच्या गोष्टीवर इंग्रजी राज्यकर्ते तिळांजली सोडण्यास तयार आहेत पण त्यांचा अधिकार मूळ गोष्टी लोकांच्या आठवणींतून घालविण्या इतका अद्याप चालत आणि तोंपर्यंतच ठीक आहे. अखेरची मजल हटली ह्मणजे आह्मी उभय जातवाले गुलामगिरींत कालक्षेप करूं लागलों पाहिजे किंवा राजक्रांती झाली पाहिजे. तिऱ्हाइतपणानें उभय लोकांमध्यें मध्यस्ती करून गोडीगुलाबीचा व्यवहार चालूं ठेविला तर मात्र इंग्रजी राज्य अविनाशी व अभंग राहील.

तेव्हां प्रश्न हा कीं खरोखर सरकारची राज्यपद्धती मोकळेपणाची व मध्यस्थाची आहे किंवा नाहीं. आह्मास वाटेंत कीं कधीं तशी असेत व कधीं तशी नसते. उदाहरणार्थ, गोवध घ्या. इंग्रजांस ही गोष्ट आवडेत तेव्हां त्या संबंधाचे हिंदूचे हक्क कोण जुमानतो ! माशिदी पुढें वाद्यें वाजविणें सरकारच्या नफ्या नुकसानीची बाब नाहीं तेव्हां वाद्य वाजविलें किंवा न वाजविलें तरी सारखेंच आणि अशा प्रश्नाच्या वेळीं सरकारचे मुख्य डोळे ह्मणजे अधिकारी जसे धर्मी, विधर्मी अथवा समधर्मी विचारशील असतील त्या मानानें त्या प्रश्नाचा निकाल लागत असतो. तेव्हां त्या निकालांत वास्तविक कोणाचा मानापमान होतो याचा खोल विचार सरकार करितच नाहीं. आणि त्यामुळें वादास व युद्धास प्रारंभ व कारणें होत असतात,

हिंदुलोकांच्या अंगीं कांहीं पाणी आहे तसें मुसलमानांच्या अंगीही पाणी आहे. वादामध्यें आणि मुख्यत्वेंकरून पूर्वापार चालत आलेल्या गोष्टीमध्यें विसंगतपणा व शिरजोरपणा घडला तर त्याचा प्रतिकार करण्यास लोकांनीं कां लढूं नये हें आह्मास कळत नाहीं. दंगे झाले तर तो अपराध सरकाराकडे जात नाहीं काय ! कारण बुडाशीं उत्पन्न करून दिल्यानंतर त्यांचें कार्य हिंदुमुसलमानांच्या दंग्याच्या द्वारें उजेडांत आलें तर त्यांच्यावर बंदुकीनें गोळीबार काढून व त्यांस तलवारीनें छाटून, किंवा देहान्त शिक्षा अगर काळे पाणी या शिक्षा देऊन कांहीं निकालास गोष्ट लागेल असें आह्मास वाटत नाहीं. गारगोटी वर चकमक झाडली तर विस्तव निघावयाचा यांत दोष कोणाचा ! गारगोटीचा किंवा चकमकीचा ? उभय लोकांस सरकारानें निष्पक्षपातबुद्धीनें व समदृष्टीनें वागविलें तरच राज्य निभेल. हिंदुमुसलमान आपसांत लढले तर त्यापासून राज्य सुयंत्र न चालतां राज्यक्रांती होईल आणि उभय जातवाले लोक राज्यक्रांती करण्या इतके पराक्रमी व बाणीदार आहेत.

'केसरी' वर्तमान पत्रकर्त्यांनीं लिहिल्या प्रमाणें अपकार केला असतां त्याचा प्रतिकार करण्याचें ज्याला सामर्थ्य नाहीं तो मनुष्य मृतप्राय आह्मी समजतों. येशु ख्रिस्ताचा उपदेश व्यवहारांत चालत नाहीं. एका गालांत भडकावली तर दुसरा गाल पुढें करणारा निरुपद्रवी अजागळ मनुष्य रामराज्यांत निभावला असतां पण तो आमच्या समाजाला बिलकूल उपयोगी नाहीं. आह्मी हिंदु व मुसलमान भाईंस असें कळवितों कीं त्यांनीं अपमान सहन करून स्वस्थ बसूं नये. आपल्या योग्य हक्काच्या स्थापनार्थ हर प्रयत्न करावा आणि तसें करितील तरच इंग्रजींत उभय लोकांची थोडी बहुत डाळ शिजेल.

---

वेश्यांगना आपला देह बाजारांत मांडतात आणि त्यालाहि गिऱ्हाईक पुष्कळ मिळतें. परंतु या देहविक्रयामुळें दुकानदार व गिऱ्हाईक पापांत बुडून सर्व सुखाला अंतरतात इतकेंच नाहीं तर त्यांच्या संसर्गानें व सानिध्यानें आसपासच्या शेजाऱ्या पाजाऱ्यांस फार उपद्रव होतो. लोकवस्तीच्या मानानें हा उपद्रव कमी किंवा ज्यास्ती होतो. पटकीचा वाखा, रक्तपिती, किंवा अन्य महारोग या सारखा हा शेजार स्पर्शजन्य पापाला अत्यंत कारणीभूत होतो आणि सुखवस्तु, संभावित, व अब्रूदार लोकांच्या घरादारांस पण्यांगनेच्या शेजारानें भारी त्रास होतो. कलकत्ता, मुंबई वगैरे शहरीं रंडीबाजांचे थवेच्या थंव व त्यांस मोहांत पाडणारीं बोलकीं पांखेरें यांच्यामुळें आसपासच्या लोकांस अत्यंत पीडा होते. ही पीडा दूर करावी व रूपयौवनाच्या बाजाराची वस्ती उठवावी ह्मणून कलकत्यास मिशनरी व इतर गृहस्थांनीं मोठी खटपट करून बंगाल सरकारापाशीं दाद मागितली.

सरचार्लस इलियट साहेबांनीं या प्रकरणांत एक उत्तम सरक्युलर काढलें आहे त्याचा मतलब असा कीं वेश्यांच्या वस्तीमुळें ज्या शेजारी गृहस्थास त्रास होईल त्यानें मुख्य पोलीस अंमलदारास खबर द्यावी, आपल्या त्रासाचें वर्णन द्यावें व साक्षी पुरावा विदित करावा. पोलीसची चौकशी अंतीं खात्री झाली तर तें विऱ्हाड त्या वस्तीच्या भागांतून काढविण्या विषयीं तजवीज केली जावी.

आकोला व उमरावती या दोन शहरीं वरील सरक्युलरा सारख्या एखाद्या हुकुमाची आवश्यकता आहे असें कित्येकांच्या मनानें पक्कें घेतलें आहे. भर रस्त्यावर सांकेतिक अभिनयानें किंवा हात धरून लोकांस आपल्या घरांतून ओढून नेण्या इतक्या इकडील वेश्या निर्लज्ज व कवडीमोल झाल्या नसतील तथापि त्यांचा शेजार ज्यांना बाधक होतो त्यांनीं त्यांस आपल्या जवळून घालविण्या विषयीं सरकार पाशीं कां मदत मागूं नये किंवा वेश्यांस लोकवस्तीच्या मध्यभागीं राहू न देण्या विषयीं घरवाल्या मनुष्यावर कां सक्ती केली जाऊं नये हें आह्मास कळत नाहीं. आकोला व उमरावती येथील मुनसिपालीट्या वेळेवरच योग्य तजवीज करितील तर वावगें होणार नाहीं.

---

चीन व जपान यांची लढाई जुंपली. लढाई हा विषय ऐकण्यास मोठा गोड वाटतो पण जे लोक लढतात त्यांची व त्यांच्या देशाची स्थिती अत्यंत कष्टमय असते. आणि जय अगर अपजय येईल त्या प्रमाणें लाभ हानि होईल ती तर निराळीच! चीनच्या एका आरमाराला जपानानें बुडविलें आणि हजार दोन हजार लोकांस जलसमाधि दिली. जपानाचाही एक दोन वेळ पिच्छेहाट व पाडाव झाला. अखेरीस काय निष्पन्न होतें पहावें. युरोपियन राष्ट्राचा शह बसला नाहीं ह्मणजे बरें!

---

मुंबई ता० २७।७।९४

"एक मासलेदार गंमत."

राजनीति तत्वाला अनुसरून ह्मणा अथवा स्पष्टपणें आमच्या विषयीं राज्यकर्त्यांचा जो गैरविश्वास त्याला अनुरूप त्यांना जी पदोपदीं धास्ती वाटत आहे तिचा समूळ नाश करण्याच्या इराद्यानें ह्मणा आमच्या समदृष्टी व न्यायी मायबाप सरकारनें "हत्यारांचा कायदा" केलेला आहे हें सर्वांस अवगत आहेच. त्याचप्रमाणें ज्यांना ह्मणून हत्यारांची अत्यंत जरूर आहे त्यांनीं खटपट केल्यास हत्यारें बाळगण्याचा परवाना त्यांना वरिष्ट अधिकाऱ्यां पासून मिळतो हेंही सर्वांस विदित असेलच. कारण जंगल खात्यामध्यें जे काम करणारे, ज्यांना जंगलांतच हिंडण्या फिरण्याचें काम करावें लागतें व ह्मणून अनेक प्रसंगीं श्वापदांशीं ज्यांना सामना करावा लागतो, व प्रसंग विशेषीं आपल्या शरीराचा बळीही त्या वनपशूंना ज्यांना अर्पण करण्याचें नशिबीं येतें, अशा लोकां पाशीं हत्यारें असणें व तीं वापरण्याची त्यांना परवानगी देणें फारच जरूरीचें आहे हें कोणीही सूज्ञ कबूल करील! असें असतांही कित्येक अधिकाऱ्यांचें–ते देहभानावर नसतात ह्मणून समजा अगर गौरकायाचे ठायीं कृष्ण वर्णीयाबद्दल जें अहिनकुलां प्रमाणें दृढ प्रेम असतें त्याचा एखादा घोट ज्यास्ती झाल्यामुळें जी निशा चढते तिच्या झटक्यांत असल्यामुळें ह्मणून समजा-जे कांहीं अकलेचे तारे तुटतात ते फारच विलक्षण असतात हें ही पुष्कळांना माहीत असले पाहिजे. असाच एक मासलेदार अकलेचा तारा तुटलेला नुकतांच आमच्या अवलोकनांत आला आहे. त्याच्या विषयीची माहिती वाचकांना कळावी ह्मणून देत आहों.

रा. रा. सदाशिव निळकंठ बागले ह्मणून कोणी एक गृहस्थ बेळगांव जिल्ह्यांतील कोणच्याशा एका गांवीं रहात असतात. त्यांनीं एम्. एम्. आर. (सदर्न मराठा रेल्वे) रेल्वेला जंगलांतील जळाऊ लांकूड पुरविण्याचा मक्ता घेतला होता. लांकडा साठीं जंगलांत जाण्या येण्याचे हमेष प्रसंग! हें मनांत आणून त्यांनीं सन १८९० साली बेळगांवचे कलेक्टर डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेट मि. म्यूर साहेब यांजपासून जोड नळीची रायफल बाळगण्याचा परवाना घेतला. कारण अरण्यांतील नेहमींची कामासाठीं वस्ती! वाघा सारख्या हिंस्त्र पशूंची तसल्या ठिकाणीं हटकून गांठ पडणार! जिवावरचे प्रसंग हरघडी गुदरणार! तेव्हां हत्यारा वांचून निभाव लागणार नाहीं ह्मणून मि. बागले यांनीं जें केलें तें योग्यच होतें. परवाना घेतल्यावर त्यांनां प्राणप्रसंग बरेच आले. एकदां एका उग्र व भयंकर शार्दूलाशीं सामना करण्याचा घोर प्रसंग येऊन ठेपला. त्यांच्या हाताखालीं जीं मजुरी करणारीं माणसें होतीं त्यांतून एक दोघांनां वाघोबांनीं यमाजी भास्कराच्या घरीं तर रवाना केलेंच. नंतर खुद्द बागलयांचाच समाचार घेण्याचें बोवाजींनीं मनांत आणिलें. पण बागले वेळ साधून त्याच्या तडाक्यांतून निसटले व अंतरावर जाऊन वाघावर त्यांनीं गोळी घातली. दैवयोगानें त्या वाघाला केलेल्या कृत्याबद्दल जबाब देण्यासाठीं यमनगरीचा रस्ता धरावा लागला. असो! ही गोष्ट झाल्या नंतर लवकरच परवान्याची मुदत संपत आली. तेव्हां १८९२ सालचे अखेरीस नवा परवाना मिळविण्यासाठीं मि० बागले हे बेळगांवास गेले. पण दुर्दैवानें म्यूर साहेबांची बदली झाली व त्यांच्या जागेवर मि० चार्लस ह्मणून नवीन एक गौरकाय विराजमान झालेले होते. त्यांना परवान्याचा एक अर्जाचा खलिता पाठविला. पण बागलयाचा जो खलिता गेला होता त्याला वेळ चांगली लागली नव्हती. ह्मणून त्यांना तुह्माला परवाना मिळत नाहीं ह्मणून जाब आला. बागलयांनां असें कसें झालें ह्मणून मोठें आश्चर्य वाटलें! नंतर त्यांनीं शिफारसपत्राचें एक पुडकें साहेब बहादुरा कडेस रवाना केलें. त्यालाही वाटाण्याच्या अक्षता! तेव्हां बागले फारच घोटाळले 'मग स्वता गेल्या शिवाय याचा निकाल लागत नाहीं असें पाहून बागले स्वतां कलेक्टर साहेबांच्या भेटीस गेले. व सर्व ह-

कीकत खाविंदाच्या चरणीं सादर केली. तव्हां बहादुरांनीं उत्तर दिलें तें असें. " मि० वागळे हत्यार ( बंदुक ) बाळगण्याचा जो परवाना तुह्माला दिला होता तो वाघ मारण्या साठीं नव्हता तर आपलें संरक्षण करण्या साठीं दिलेला होता. " यावर मि० वागळे यांनीं साहेब बहादुरांना त्यांच्यावर आलेल्या बिकट प्रसंगाची कच्ची हकिकत सांगितली. पण साहबांचे कान त्या वेळेस बधिर झालेले होते. नकार तो नकारच ! आत्म संरक्षणाचा " अर्थ साहेब बहादुर वरच्या सारख्या जीवावरच्या प्रसंगीं काय घेतात तें कळेल असतें ह्मणजे बरें !

The Berar Samachar

MONDAY AUGUST, 6, 1894

Indian apathy is sometimes proverbial. Fate predetermines the issues of events to come. This argument, however impracticable for a man of the world, seems to be the ruling idea in the important political questions of the day. The Simultaneous Civil Service question met with a deadly foe in the Secretary of State and the disappointment is so great that there is a lull or a stop of all movements in the political sphere. A misconception prevails that the State-Secretary's despatch is that of the *final* appellate court and that no course is left whereby to resent the action of the India Government. But there ought to be nothing of the kind. Public spirit though very dull requires an awakening as to the emergency of the question. 'Fight uphill' should be the watchword of the nation if India is ever to attain to the dignified position. In the uttermost of their disappointments people forget that difficulty is a severe instructor. It is the touch—stone whereon hangs the decision of great problems. One victory though taxing the patience and energy of the people will bring a new power into play which will overcome mountains.

Now is the day to agitate and organize. If the nation sleeps now never will the good time return. Public meetings by hundreds and thousands should be the order of the day. Let people one and all express their dissent & call upon the House of Commons to question the injustice, selfishness and the utter absence of right principles that are embodied in the disastrous resolution of the Hon. Mr. Fowler. The Civil Service question is one out of many. The decision of one if left to stand unquestioned will perhaps settle the other questions in the same fashion. The danger lies in the repitition. To make amends for the past is to improve in future. Right indignation to avenge insults and injuries is the index of due self respect and self—respect when prudent and circumspect builds nations. We hope that people will rise to the occasion and make themselves heard all through England. The previous agitation will strengthen the hands of the National Congress at its next sessions in December next We hope that the embers of political fire are alive in the Berars and the province will not lack behind to catch time by the fore,—lock. In politics Messrs. Joshi and Mudholkar have won a special distinction and the people will not let slip the good chances. The citizens of Poona has done a noble deed in memorializing the Secretary of State in this connection and it is for the rest of India to follow in its wake and make the memorial appear as one of the whole nation.

---

Foreign importation is the greatest evil of India. Everthing that is *English* has a good pass-port in India. Englishmen, their manufacture, their customs and their politics have the greatest demand in the Indian market. India pays for all that and enriches England at the cost of her own people. Englishman is a tumbling block in the line of service. Administration is not open for Indians wherever the Englishman treads. Manchester goods are exempt from the import duty and cannot be taxed unless the Indian wares are *crippled* by new legislative measures. In short wherever the issues are conflicting between foreign and Indian interests the latter dwindle down to a vanishing point. Foreign importation has transplanted indegenous industries and energies in every sphere of work and the time has come when India should adopt a *protective* policy to maintian her own. Self—denying aptitude is the only possible remedy when no move from the Government enlivens our hopes of the future.

---

On some three months' privilege leave the Resident Mr. Plowden is going to England. During his absense the mantle of that dignified and responsible office falls on the shoulders of our popular Commissioner Colonel Mackenzie. Another important transfer follows in the sequel. Colonel Szczepanski becomes the Commissioner of the province. This elevation was but his due a long time ago and it is a pleasure to note that he attains the goal of his ambition. He is a thorough gentleman; and the oldest Sardar of his benevolent nature and administrative capacities is 'the right man in the right post'.

---

The *besetting sin* of the Berar Police is, according to the opinion of the Judicial Commissioner, the improper abstenance from investigation in petty crimes. His remarks are useful in so far as they note down an evil but we do not quite agree with the whole of his arguments. Mr. Bullock says:—

"I notice a great tendency to rely on confessions and the evidence of approvers; it is a tendency which the officers of the police should struggle against consistently. It is inevitable for judicial officers who have experience of the people of the country to regard with suspicion confessions which have been made after prolonged enquiry by the police, when the accused has been, if not formally in arrest, subjected to such close supervision as to raise doubts as to the spontaneity of his confession, and when the approver has been equally closely guarded. The valuable elements of a confession are, first, the assurance that it is made freely, and, secondly, that it is corroborated by subsequnetly discovered facts. These facts cannot be too frequently urged on investigating officers by Superintendents of Police. It is useless to complain that Courts require more evidence, unless it can be shown that they acquit after sufficient evidence, and this I have not yet discovered. These remarks are prompted by my observation of several cases which I have had before me, in which I attribute the ill-success of the police to insufficient enquiry, and exceseive reliance on suspicious evidence, attained after indiscreet detention of witnesses and accused persons. In my judgment this is the besetting sin of the Berar police in comparison with the police of other provinces."

From the above one thing is certain that the criminal tribunals weigh evidence properly though the Resident warns them with his general advice to avoid over-scrupulousness on the other hand. The Police officers fail to investigate successfully and to produce the best avilable evidence for the appreciation of the judges. It seems often that a mere thread of a possibility serves them for a good reliable story and the chief men are not trained to decipher a proper and useful evidence that will sustain a prosecution. The main cause of this failure of the police—department is due to incompetent men that abound in the whole service. Educational qualifications are not attended to. Besides the service is not attractive in a two-fold manner. It is often a drudgery to serve under and please unworthy superiors and besides the pay and chances of promotion are not sufficiently promising. Let merit alone be the test and the Police—department like any other institution in the world will thrive well.

## वऱ्हाड.

अलिशान रेसिडेंट मि. प्लौडन साहेब हे ता.७ सप्तेंबर पासून तीन महिन्यांच्या हक्काच्या रजेवर विलायतेस कांहीं राजिक प्रकरणा निमित्त जात आहेत.

---

अत्यंत आनंदाची गोष्ट कीं कर्नल मेकंझी कमिशनर हे सध्या रजेवर न जातां रेसिडेंट होऊन हैदराबादेस जात आहेत.

---

आणि त्याहून ही परम आल्हादाची व न्यायाची दुसरी बातमी अशी कीं कर्नल स्पानस्की यांस त्या तीन महिन्यांत कमिशनर नेमण्यांत आलें आहे.

---

कर्नल मेकंझी साहेब यांची स्वारी आकोल्यास सोमवार पासून शनिवार पर्यंत होती. मुनसिपालिटीची स्पेशल सभा भरविण्यांत येऊन गटार बांधण्या संबंधानें विचार झाला. किरकोळ तपासणी व जाहागीर प्रकरणें चाललीं होतीं.

---

रजेवर असलेले सिव्हील सर्जन डाक्टर रेली हे आज आपल्या कामीं दाखल होतील. हे या पुढें तरी आपला वर्तनक्रम लोकप्रिय व आदरार्ह करितील अशी आशा आहे.

---

शिंदखेडच्या मारहाणीची चौकशी अगदीं पुळपुळीत व ढिलाईनें चालली असून आरोपी मुसलमान इतर साह्य मिळवून हिंदु लोकांस अर्जवानें व जरबीनें मिळवून घेत आहेत. न्यायाला आलेली गोष्ट निकरानें तडीस नेणें प्रत्येक हिंदूचें काम आहे. शिंदखेडकर 'स' चें दुसरें पत्र पुढील अंकीं छापूं.

---

वऱ्हाड सार्वजनिक सभेची बैठक गेल्या २९ वे तारखेस भरली होती तेव्हां असें ठरलें कीं एक जाहीरसभा नोवेंबरांत आकोल्यास भरवून नंतर लोकांच्या नजरेस आवश्यक गोष्टी आणावयाच्या व त्या बद्दल प्रांतिक सरकारापाशीं दाद मागावयाची. शेतसाऱ्याची वाढ, शेतकऱ्यांच्या पेढ्या, धंदे शिक्षण, न्यायखातीं, सरकारी चाकरी इत्यादि विषयांचा विचार होणार असून जाहीरसभेचें काम तीन दिवस चालेल. जाहीर सभा ही प्रांतिक सभा ह्मणून भरणार आहे.

---

डाक्टर रो सानिटरी हे अमृतसर शहराला जात असून त्यांचा हेतु तेथील लोकांची व गांवची स्थिती पाण्याच्या पुरानें कशी काय झाली आहे हें पाहण्याचा आहे.

---

## नोटिस.

रा. रा. भावसिंग देशमुख राहणार कसबे कसारखेडें तालुके बाळापूर जिल्हा अकोलें यांस नोटीस देणार चंद्रभान वल्लद हरसिंग देशमुख राहणार मानकी तालुके बाळापूर जिल्हा अकोला नोटिसीनें असें कळवितों कीं, रुसुमाचा पैसा तीन वर्षाचा तुह्मी घेतला. व त्यांतील आमच्या हिशाचे तीन वर्षांचे रुपये [ ४८ ] आज पावेतों दिले नाहींत. रुसुमाचा पैसा मिळणें कारितां फिर्याद करण्यास कायद्या प्रमाणें दाखला मेहरबान डेपुटी कामिशनर साहेब यांचा मिळावा लागतो त्या प्रमाणें आह्मी दाखला फिर्याद करणेस मिळविला आहे. परंतु आगोदर आपणास कळवितों कीं, नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत रुसुमाचे तीन वर्षांचे रुपये ४८ आमचे आह्मास देऊन पावती घेऊन जावी. असें झालें नाहीं तर रुसुमाचे रुपये ४८ बद्दल फिर्याद करून फिर्यादीचे व ह्या नोटिशीचे खर्चा सुद्धां निकाल होई पर्यंत सर्व नुकसानीसह सर्व रुपये भरून घेऊं. ह्मणून दिली नोटीस सही. तारीख २ माहे अगष्ट सन १८९४ इसवी.

( सही )

सहीची निशाणी— मोहर

चंद्रभान वल्लद हरसिंग

देशमुख याची असे.

---

## नोटिस

नोटीस बेशमी देवराव खुशालराव देशपांडे प्रगणें दर्यापूर यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं दर्यापूर प्रगण्याचा लवाजमा जो सरकारातून आपणास मिळत असतो त्यांत माझा हिसा एक आणा चार पै चा असून लवाजम्याचे हिशाची रकम मी अज्ञान असल्यामुळें आज पावेतो सदाशिव लक्ष्मण देशपांडे हे घेत आले परंतु हल्लीं मी सज्ञान झालो आहे सबब नोटिशीनें कळवितो कीं हालसालचा पैसा जो तुमचे कडे शिल्लक आहे तो सदाशिव लक्ष्मण देशपांडे यांस न देता मजला देऊन रसीद घ्यावी व तशीच पुढें ही वहिवाट ठेवावी. लवाजमा घेण्यास बरेच दिवस झाले आहेत तरी हिशाची रकम देऊन पावती माझे सहीची घ्यावी तसें न केल्यास तुमचेवर फिर्याद करणें भाग पडेल कळावें तारीख २ अगष्ट सन १८९४ इसवी.

( सही ) प्रल्हाद बळीराम देशपांडे

राहणार दर्यापूर दस्तुर खुद.

---

## वर्तमानसार.

संप करून कामें बंद करण्याचा प्रकार युरोपांत दिवसेंदिवस वाढत चालला आहे.

इंग्लंडांतील शेतकीची उन्नति व्हावी ह्मणून तिकडे जारीनें खटपट चालली आहे.

दिल्ली येथील पुरातन व फारच नामांकित जुम्मामशीद वीज पडून छिन्नविछिन्न झाली आहे.

दक्षिण ब्रह्मदेशांत गुरांचा रोग फार फैलावला आहे.

तिबेटांत युरोपियन लोक व्यापारासाठीं गेले आहेत. पण तेथें त्यांचें बस्तान अजून बसत नाहीं.

मध्य एशियांतील रशियाची रेल्वे, समरकंदपासून पुढें वाढविण्याचा आणि तिचीच एक शाखा ताशखंड पर्यंत नेण्याचा विचार, रशीयन सरकारनें केला आहे. यांत बरेंच राजकीय धोरण आहे असें ह्मणतात.

हत्याराच्या कायद्यांत कांहीं सुधारणा होणार आहे असें ह्मणतात.

सबंद पंजाब व कुर्रम घाट येथें लष्करी बंदोबस्त अगदीं नव्या तऱ्हेचा होणार आहे.

हल्लीं हिंदु साधुवर देखील सरकारच्या गुप्त पोलिसाची टेहळणी आहे असें प्रसिद्ध झालें आहे.

लढाईच्या वेळीं मनुष्यापेक्षांही जास्त उपयोगी पडेल असा एक मनुष्याच्या आकाराचा विजेचा पुतळा, स्पेन देशांत एकानें तयार केला आहे. या पुतळ्यांतून १५ मिनिटांत पांच हजार गोळ्या जातात. आश्चर्य!

स० वि०

नवाब मेधी हसन यांस आह्मी आपल्या चाकरींतून काढून टाकलें या करतां तुमच्या कडील नाग्यावर त्याचा आतां कांहीं हक्क नाहीं असें हिंदुस्थानसरकारानें निझामसरकारास सांगितलें. नवाब मेधी यांच्या त्या गोऱ्या बायकोस निझामाकडून जें ३०० रुपये पेन्शन आहे तें आतां चालू राहतें कीं नाहीं कोण जाणें.

लखोट्यावरील टिकिटावर रबराचा वगैरे शिक्का मारूं नये. साधी सही करण्यास हरकत नाहीं असा पोस्ट खात्याचा ठराव झाला व तो १ नोवेंबर १८९४ पासून अमलांत येणार. तसा छाप मारलेलें टिकिट पोष्टखातें त्या तारखेपासून कबूल करणार नाहीं.

चीन व जपान यांच्या दरम्यान लढाई होण्याचें ठरलें अशी शांघाई येथें बातमी आहे.

तहावरून जीं बंदरें चीनच्या ताब्यांत आहेत त्या बंदरांत जपाननें आपलीं गलबतें आणूं नये असें चीनेंच ह्मणणें आहे, पण जपान तें ऐकत नाहीं.

इंग्लंड व अमेरिका यांचे कांहीं लढाऊ लोक तेथें असणाऱ्या आपापल्या लोकांच्या संरक्षणाकरतां सोल येथील बंदरावर उतरले आहेत.

चीनची आणखी १०,००० फौज कोरिया येथें जाण्याकरतां निघाली.

उसंगबार खाडी हवी तेव्हां अडविण्याची चीनची तयारी आहे.

लढाई सुरू झाल्या बरोबर चीनसरकारनें प्रत्येक प्रांतानें प्रत्येकी २०,००० प्रमाणें फौज लढाईच्या कामावर पाठविली पाहिजे. असें ठरलें आहे.

याशिवाय ज्या १०,००० चिनी फोजेस कोरिया येथें जाण्याचा हुकूम झाला आहे ती वेगळाल्या आठ गलबतांतून जाणार.

चीनानें इंग्रज वाकिलामार्फत जपानास कांहीं सूचना केल्या, पण जपाननें त्या नाकारल्या.

सेवल येथें असणाऱ्या कोरियन फौजेनें चिनी रसिडेंटाच्या चिथावणीवरून तेथील जपानी फौजेवर हल्ला केला, पण जपानी फौजेनें त्यांचा पराभव केला.

एका जपानी क्रुझरानें चीन सरकारचें एक गलबत बुडविलें.

जपानी फौज चिनीफौजेकडे चाल करून जात आहे व त्यावरून सामना सुरू होण्याचा रंग आहे.

चीन व जपान यांच्या दरम्यान लढाई सुरू होण्याचा होण्याचा जाहिरनामा प्रसिद्ध झाला आणि चीनच्या कित्येक लढाऊ गलबतांवर हल्ला ही झाला असें ता. २७ रोजीं रूटरच्या शांघाई येथील बातमीदारास समजलें आहे.

तार तोडल्यामुळें कोरिया येथील बातमी कळण्यास मार्ग नाहींसा झाला आहे. ठा. अ.

"रामी झाडाचे तंतु वेगळे करून ते बाजारात येऊन सस्ते मिळाले असतां विणण्याच्या कामासाठीं त्याला फार मागणी येईल. ह्या झाडाची लागवड करणें कठीण नाहीं. इंग्लंड व हिंदुस्थान देशांत पिंजण्याच्या कामाचा ज्यांस फार चांगला अनुभव आहे त्यांचें असें मत आहे कीं, रामी झाडाचा तंतु बळकट असून तागापेक्षां तो फार तेजस्वी असतो, ह्मणून रामी झाडाचा तंतु उपयोगांत आला असतां तो तागास मागें टाकील. दिसण्यांत तो रेशमासारखा तकतकीत आणि नितळ दिसतो तेव्हां रेशमाच्या कारखान्यांतही त्याचा उपयोग होण्यास अडचण नाहीं. हें झाड हिंदुस्थानांत होतें कीं नाहीं हें जाणणें फार अगत्याचें आहे." शु. सु

चीन व जपान याच्यांतील वाद अगदीं, निकरावर आला असून लढाईचा जाहिरनामा देखील लागला, असें ता. २७ मिनहूच्या शांघाईच्या तारेवरून कळतें. युरोपांतील बलाढ्य राष्ट्रेंही यांत शिरण्याचा रंग दिसत आहे. तसें झाल्यास परिणाम चांगला नाहीं. सध्यां या लढाईमुळें, त्या देशाशीं असलेल्या हिंदुस्थानच्या कापडाच्या व्यापारास मात्र बराच धोका येण्याची भीति आहे. नशीब हिंदुस्थानचें !

श्रीक्षेत्र काशी येथें एक लग्न नावेंतून जात असतां नांव बुडून ३० मनुष्यें प्राणास मुकलीं.

यंदां मोहोरमांत दिल्लीस ताबूद इतके ऊंच केले होते कीं, ते रस्त्यांतून जात असतां सरकारी अधिकाऱ्यांनीं टेलिग्राफच्या तारा काढून त्यांना रस्ता मोकळा करून दिला व मग ताबूद गेले. सरकारच्या मुसलमाना बद्दलच्या प्रीतीचें हें एक चांगलें उदाहरण आहे.

क० त०

नोटीस

किसन वल्लद कंगाजी इंगळे राहणार अमकापूर तालुके अकोलें यास नोटीस देणार राधी मर्द किसन इंगळी हल्लीं राहणार बाजार सांगवी तालुके अकोलें नोटिशीनें असें कळविते कीं तूं माझा लग्नाचा नवरा असून तुझे पासून मजला दोन मुलेंही झालीं आहेत व तीं तुझे व माझे कमनशीबानें मरण पावलीं तुह्मी मजला अकोलेकडे ७ सात वर्षें झालीं माझे मायचे घरीं आणून घातली. परंतु माझ्या अन्नवस्त्राबद्दल कांहीं तजवीज ह्या वेळ पर्यंत करीत नाहीं. मी तुमचे नांवावर आजपावेतों रुपये ३०० तीनशें रुपये काढून खाल्ले आतां मजाला कर्ज कोणी देत नाहीं तुझा मजला पत्ता ह्या सात वर्षांत नाहीं मी फार तपास करून थकले. मी उपाशीं मरूं लागलें राहण्यास घर नाहीं पोटास भाकर नाहीं. कोठेंच कांहीं ठिकाण नाहीं ह्मणून मजला अमकापरचा पाटील नामें मारुती पाटील यानें माझे मायचे घरीं पोचती केली. माझा जन्म व्यर्थ जात आहे. ह्मणून वगैरे कारणा मुळें तुह्मास हो नोटीस देऊन कळविते कीं नोटीस पावल्या पासून सात दिवसांत मजला ह्या वेळपर्यंत झालेला खावटी खर्च रुपये ३०० तीनशें व पुढें माझे पोट पाण्याची बरोबर तजवीज करून चार जातभाई पंचाची खात्री करून मजला घेऊन जावें. असें नाहीं ह्मणजे मी तुमचे पाशीं राहण्यास तयार आहे. असें झालें नाहीं तर मी निरुपाय होऊन माझा जन्म व्यर्थ जातो ह्मणून वगैरे कारणा मुळें दुसरा घरठाव करीन मग तुझा नवरेपणाचा हक्क मजवर कोणत्याही प्रकारानें राहिला नाहीं. ह्मणून दिली नोटीस सही. तारीख ३० माहे जुलाई सन १८९४ इसवी.

सही

सहीची निशाणी बांमडी राधी
मर्द किसनसिंग इंगळे इच्या
हातची असे.

नोटीस

मि. कडतू वल्लद गंभीरजी पागधुणे राहणार धामणे तालुके अकोला मयत वारस पुत्र नरसू वल्लद कडतू अज्ञान पालन करणार त्याची आई नामें मुकताई मर्द जयराम पाटील हल्लीं मुक्काम कारंजा तालुके बाळापूर (जयराम हा मुकताबाई हिनें कडतु मयत जाल्यावर पाटाचा नवरा केला) यास नोटीस देणार रामप्रताप रामसुकदास मारवाडी दुकान अंदुरें तालुके बाळापूर. नोटीसीनें असें कळवितों कीं कडतु वा गंभीरजी याच्या खातेचें शेत, सर्वे नंबर ६७ एकर १८ गुंठे ३४ सरकार देणें रुपये २५ हें शेत आह्मास कडतु वा गंभीरजी यानें तारीख १२ माहे मे सन १८९३ रोजीं खरीदी करून दिलें व रीती प्रमाणें दस्तैवज खरेदीचा नोंदून दिला. व या शेताचें खातें आमचे नांवें करून देण्याचें ठरलें होतें. त्या प्रमाणें मयत कडतु यांस तो जिवंत असतां चार वेळ विचारलें परंतु त्यानें आज करूं उद्या करूं असें सांगत असतां मयत जाला. त्या नंतर अज्ञान नरसु याची पालनकरणार आई इजलाही दोन वेळां विचारलें परंतु ह्या वेळपर्यंत खातें करून दिलें नाहीं. ह्मणून नोटीस दिली आहे तर ही नोटीस पावल्या पासून एक महिन्याचे आंत सदरहु शेताचें खातें वर लिहिल्या प्रमाणें आमचे नांवानें करून द्यावें. तसें न केल्यास रीती प्रमाणें कोर्ट मार्फत फिर्याद करून सर्व खर्च तुह्मास देणें भाग पडेल. ह्मणून दिली नोटीस सही. कळावें तारीख १ माहे अगष्ट सन १८९४ इसवी.

[ सही ]

रामप्रताप रामसुकदास मारवाडी
दुकान अंदुरें तालुके बाळापूर
दस्तुर खुद्द.

NEARYL READY

**CRIMINAL COURT MANUAL**

*for the*

Hyderabad Assigned Districts
by
Mr. R. Obbard
assisted by
Syed Meer Alum,

Containing the uncancelled Notifications of the Government of India extending Laws and promulgating Local Laws (with reprints of Forest Law, Abkari Rules, Municipal Act, Courts Law, Rules, regulating Legal Practitioners and other Local and Special Laws), the Notifications and rules published under the authority of the extended Laws, the uncancelled Circulars and Orders of the Government of India, Resident, Commissioner, and Judicial Commissioner relating to Crimial matters, and full information in regard to the prescribed registers, returns and forms, to be used in and by Criminial Courts, with notes by Mr. R. Obbard, and a copious Index.

PRICE RUPEES 5

Subscriptions registered by Syed Meer Alum at the office of the Civil and Sessions Judge, Amraoti Camp Berar.

## घड्याळ.

किं. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचे (ह्मणजे चक्रांचें खालीं वर हिरे बसविलेले आहेत) चावी देण्यास मोगरा. कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक चिनीचे काचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेले. या वर आमचें नांव आहे. हें खिशांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षें दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. सचित्र क्याटलाग मागवा. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशीक

किंमत १० आणे

## गुरुचरित्र

पांच किंवा जास्त प्रती एकदम घेणारास
दर प्रतीस
आठ आणे

हा ग्रंथ आज पर्यंत ८।१४ आण्यास मिळत होता. त्याच्या आतां फारच थोड्या प्रती शिल्लक आहेत ग्राहकांनीं त्वरा करावी.
आर्य भूषण छापखाना, पुणें.

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

Single copy ........................ 4 as
किरकोळ अंकास ................ ०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस .... ०।

Advertisement
Below 10 lines...2 Rs.
per line over 10...4 as.
Repitition per line 3 as.

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXVIII AKOLA MONDAY 13 AUGUST 1894 NO. 32
वर्ष २८ आकोला सोमवार तारीख १३ माहे आगष्ट सन १८९४ इ० अंक ३२

### सर्व नजरबंदीच्या माकडचेष्टांस ह्मणून पाडतां येतें.

मी रस्त्यांत जेव्हां झोकांडी खात चालत असे तेव्हां लोकांनीं माझ्याकडे बोट दाखवून ह्मिणावें कीं पहा काय बेटा झिंगून गेलेला आहे आणि प्रथम दर्शनीं तुझासही खास त्यांच्या सारखेंच वाटेल असतें. परंतु ते सर्व चुकत होते. मर रस्त्यांत मला चालतांना झोकांड्या येतात ह्मणून आपण मला विचाराल तर त्याचें समर्पक उत्तर देण्यास माझ्या आयुःक्रमाच पूर्व मार्गावर थोडेसें गेलें पाहिजे आज तागाईत एखाद्या आनंदी व रंगेल मनुष्या प्रमाणें मी सुखी प्राणी होतो परंतु चार पांच वर्षापूर्वी मला वाटूं लागलें कीं माझ्यांत कांहीं कांहीं तरी कमी जास्त होत आहे. जेवतांना पूर्वीसारखी माझी क्षुधा राहिली नव्हती. मला भूक लागे व खाण्याची इच्छा होई परंतु तोंडात घास गेला कीं लागलीच पक्काशय उमळून येई व जसें कांहीं बंडावा करून माझ्या हुतूस ह्मणूत पाडे'. हें मला अरिष्ट नवीनच व त्याचें मला मोठें आश्चर्य वाटे. मी जेव्हां ह्मणून खाण्याचा आव घाली तेव्हां तेव्हां मला फारच तिटकारा येई. कदाचित पोटांत कांहीं अन्न गेलें तर तें अन्न किंवा मांस न वाठतां एखाद्या शिशासारखें जड वाटे त्या मुळें निजायाला जातांना आपल्यास जशी सुस्ती व्हून थकवा येतो त्या प्रमाणें मला होत असे. ह्यामुळें रात्रीं झोपेचा कल अगदीं बदलला. झोप थोडी पण चांगली येई. कधीं कधीं बरोबर येत नसे, व धुंद झाल्या सारखें मला वाटल्यामुळें मी केव्हां केव्हां आफू किंवा इतर अमली पदार्थ घेत असे. मी जीभ पहातो तों तिच्यावर थर जमलेला आणि काम करण्याची हौस बिलकूल नहींशीं झालेली असे.

माझ्या बरगड्यांत आणि पाठींत सपाटून दुखत असे व कधीं कधीं ह्या वेदना खांद्यांत भाला टोंचल्या सारख्या वाटत. मी आरशांत पाहिलें तों माझे डोळे पिवळे दिसूं लागले. आणि माझ्या दांत व हिरड्या सभोंवती कीट जमलेला दिसे व मुखमार्जन करण्यास पाणी न मिळाल्यामुळें किंवा इतर साधनें दांताजवळ नसल्यामुळें माझ्या तोंडाची घाण फारच येइ. माझा कोठा फारच जड झाला आणि पक्काशयांत घाणेरडा वायू उ[illegible] होऊन तोंडावाटे ढेंकर देतांना निघून [illegible]ई ह्या वेळेस मला किती वाईट वाटत होतें हें मी कधीं विसरणार नाहीं. ह्या वेळीं रस्त्यांत चालत असता एकदम घेरी यावी; हलके वाटावें. आणि गरगर फिरल्यासारखें वाटून झोक ज्या देत चालावें व जमिनीवर सवंशाल पडून नमस्कार घालावा लागत असे. माझ्यानें हें विघ्न जितकें टाळता येईल तेवढें टाळून घेई व आतां दें गेले असें समजून तो दिवस घालवीत असे.

माझ्या मित्र मंडळीनें व वैद्यानें जीं जीं औषधें घेण्यास सांगितलीं तींत घेतलीं त्या पासून गुण न येतां मी अगदीं सुदामदेव झालों. व आतां ह्या वस्तीस रामराम ठोकून परलोकचा रस्ता धरावा असें मला वाटूं लागलें. ह्याप्रमाणें माझा क्रम चालला होता.

आतां मी तुह्मास थोडक्यांत निवेदन करतो कीं बरा कसा झालों ह्याचें कारण आपणास कळवावें हें अगदीं रास्त आहे. लंडनांत माझा एक स्नेही होता. त्याच्या कानावर माझी गोष्ट पडल्याबरोबर त्यानें सांगितलें कीं मदर सिजेलचा रोगहारक सिरपा (ह्मणजे माता सिजेलचा रोगहारक पाक) तुह्मांस फारच गुणाकारी होईल.

माझा कांहीं त्याच्या ह्मणण्यावर भरंवसा बसेना. परंतु एक बाटली तर थोडे दिवस घेऊन पहावी ह्मणून विचार केला. मला ह्या औषधापासून इतका जल्द गुण आला कीं मला खातांना बरें वाटलें व झोप चांगली यावी. मला हें पथ्यावर पडल्यामुळें इतकें बरें वाटलें कीं मी ह्या औषधाच्या आणखी चार बाटल्या पार केल्या.

मी बरा झालों. हें औषध दैविकासारखें वाटलें मला खचित वाटलें कीं हें औषध ईश्वराच्या प्रेरणेंच मला मिळालें.

मी आतां पुन्हा ताजातवाना झालों व त्यामुळें ज्या मला आनंदाच्या उकळ्या फुटल्या त्या सांगतां पुरवत नाहींत. आतां केव्हां तरी थोडेंसें अपचन झालें कीं, जें सर्वांस होत असतें, त्या वेळेस मी ह्या औषधाचा लहान घोट घेतो व लागलीच मला त्यापासून आराम वाटतो.

ह्याचा तत्काळ गुण आल्यामुळें मला नजरबंदीच्या खेळाची आठवण होते परंतु खरोखर माता सिजेलच्या क्युरेटिव सिरपांत डोळ्यात माती टाकण्यासारखा कांहीं प्रकार नाहीं. मला अनुभवावरून खात्रीनें सांगतां येतें कीं कितीही जुनाट अग्निमांद्य व अजीर्ण अगदीं वाईट स्थितीपासून असो तरी ह्या औषधा पासून हटकून गूण यावयाचाच.

मी तुमचा उपकार मानणारा
( सही ) जे. सी. सिमसन
२१ ह्यानोवरचा रस्ता, न्युकासल अंडर लाईन, स्टापर्ड शिपर इंग्लंड.

B. T.

---

## नाग, नरसे, पिठोरी व जिवत्या.

आह्मी येथें विक्री करितां नाग, नरसें, जिवत्या व पिठोरी किंवा पाठोरा हीं चित्रें ठेविलीं आहेत. चित्रें फारच सुरेख व पहिल्या पेक्षा त्यांत फरक करून किंमतही कमी करून उत्तम प्रकारचीं छापलीं आहेत. ज्यानां पाहिजे असतील त्यांनीं खालील पत्यावर पैसे पाठविले असतां सदहू चित्राचे कागद पाठवून देऊ. किंवा व्हेल्यूपेबलनेंही पाठवूं. चित्राचा दर शेंकडा ११ रुपया प्रमाणें. शिवाय टपालहशील पडेल.

बाळकृष्ण अनंत कंपाझीटर
वऱ्हाडसमाचार आफिसांत मिळतील.

---

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण शुद्ध १२ शके १८१६

### हैदराबाद दरबार

( निझाम हैदराबादेंच तक्तावर असलेल्या आमच्या महंमदीय युवराजास दोन उपदेशपर शब्द )

जनन व मरण ह्या दोहोंमध्यें जो येग्य काळ जातो तेवढ्या मध्यें मनुष्याला चारवेळ स्थित्यंतर करावें लागतें. बाल्य, यौवन, प्रौढि व वार्धक्य हे चार तऱ्हेचे वेष होत. आणि त्या त्या वेषाला अनुरूप अशीं कर्मकांडें मनुष्याला लावून दिलीं आहेत. हल्लींच्या आमच्या निझाम सरकारांनीं दुसऱ्या प्रकारचा वेष घेतलेला आहे. त्या नैसर्गिक वेशाला व ऐहिक परिस्थितीला उचित असें साहस, धैर्य अंगसामर्थ्य इत्यादि गुण त्यांच्यामध्यें वसत आहेत असें ऐकून कोणालाही आनंद झाल्याविना रहावयाचा नाहीं. यांना मृगयेचाही फार नाद आहे असें समजतें. मोठमोठ्या जंगलामध्यें जाऊन व्याघ्रासारख्या महाबलवान, उग्र व भयंकर हिंस्र शूंची शिकार करण्यामध्यें त्यांचा अगदीं हातखंडा आहे. नुकतेच ते एका अरण्यामध्यें मृगयाविहार करण्यासाठीं गेले होते. व तेथें एका शार्दूलाला आपल्या पराक्रमाचा तडाखा दाखवून त्यांनीं आपली मृगयापिपासा शांत करून घेतली. परंतु ही मृगयापिपासा युवराजानां अत्युत्कट लागलेली आहे असें आमच्या कानावर आलें आहे. हें मात्र ठीक नाहीं. यामुळें अत्यंत जबाबदारीचीं जीं कर्तव्य कर्में तीं तशींच भिजत पडतात; व तीं बजाविण्याविषयीं वासना कधींही उत्पन्न व्हावयाची नाहीं. युवराजांची स्थिति आमच्या सारख्यापेक्षा फारच भिन्न आहे. ते आज मोठे सत्ताधीश आहेत. भरतखंडाच्या एका भागाचे अधिपति आहेत. आणि ह्मणून सहस्रावधि जनांचें सुख दुःख, हिताहित, शिक्षणाशिक्षण, न्यायान्याय इत्यादि अत्यंत महत्वाच्या गोष्टी सर्वतोपरि त्यांच्या वरच अवलंबून आहेत. परंतु यौवनावस्थेंत युवराजाला अपरिहार्य अशा जो, ऐषआराम, नाचरंग अंगनांपांगनाविलास, विजासी, गुडगुडीचे झुरके यासंबंधी लालसा तिचे कोड पुरविण्यामध्येंच आमच्या निजाम सरकारचा कालक्षेप होत नाहीं तथापि आपल्या प्रजेची किती दैनावस्था आहे. याचा समशेर बहादरांनीं खोल विचार केला आहे काय? युवराजांनीं शिकार करूं नये असें आमचें ह्मणणें नाहीं. शौर्य धैर्यादि गुणांना हल्लींच्या काळीं अशा तऱ्हेनें जागृत ठेवलेंच पाहिजे कारण पुढें मागें प्रसंग विशेषी त्यांचाच जास्त उपयोग होईल. परंतु तेवढ्या करितां शिकारी सारख्या गोष्टींचीं पारायणावर पारायणें करण्याची कांहीं जरूरी नाहीं. हल्लींचा मनु फार निराळा आहे. त्याला शोभेल असा वर्तनक्रम ठेवणें हें स्तुत्य होय. हल्लीं युवराजांनीं आपल्या राज्यांत सर्व प्रकारची सुधारणा करण्यामध्यें स्वतः पुढाकार घेतला पाहिजे. प्रजाजनामध्यें जेणें करून विद्यावृद्धि होऊन तिची अभिरुची उत्पन्न होईल, प्रेमभाव वाढेल; वैमनस्याचा बी मोड होईल. व्यापार वाढून सांपत्तिक स्थिति सुधारेल, सौख्यातिरेक होईल असे उपाय युवराजांनीं योजिले पाहिजेत. या बाबतींत त्यांनीं इतर संस्थानिकांचें अनुकरण करावें हें उत्तम. म्हैसूर संस्थानचें उत्तम व अनुकरणीय उदाहरण त्यांच्या पुढें आहेच. गायकवाड, होळकर, शिंदे वगैरे मोठ्या संस्थानिकांनीं आपल्या प्रजेला उच्च शिक्षणाचा लाभ व्हावा ह्मणून कालेजें स्थापिलीं आहेत. व त्यामध्यें कांहीं ठिकाणीं उच्चशिक्षण फुकटच देण्यांत येतें! हें आमच्या युवराजांना अवगत असेलच. मग या सत्कृत्यामध्यें युवराजांनीं उदासीनता कां दाखवावी हें आह्माला कळत नाहीं.

आमच्या कर्णरंध्रावर असें हो धाडकन आपटल्या सारखें वाटतें कीं युवराजांनीं राज्यशकट चालविण्याचे जीं कांहीं नियोगाधिकारमंडळें आहेत त्यामध्यें शत्रुमुखांची बऱ्याच प्रमाणानें योजना केली आहे! हें काय ह्मणून? त्यांच्या राज्यांत शत्रुमुखा खेरीज एतद्देशीयांत लायक असे लोक सांपडत नाहींत काय? जाणून बुजून आपल्या घरांत सर्पाची पिलें ठेवण्यासारखें होत आहे असा खरा खोटा लोकांचा आक्षेप आहे! सैन्याच्या व लढाईच्या खर्चासाठीं ह्मणून अमानत घेतलेला वऱ्हाड सारखा सुपीक व सघन मुलख खर्च भागून बरींच वर्षे झालीं तरी युवराजांस परकीयांच्या हातून परत मिळाला आहे काय? ही असली अद्दल घडत असतानां असले स्वकार्यसाधु लोक आपल्या राज्यांत बाळगतात तरी कसे? युवराज या परकीयांशी दोस्तीनें दुरूनच व्यवहार करा; यांना जवळ बाळगिले ह्मणजे हे कांहीं तरी ढवळा ढवळ केल्याविना राहावयाचे नाहींत. ज्यांची अत्यंत जरूरच आहे त्यांना जागा दिल्यास एकवार हरकत नाहीं. पण सर्व तऱ्हेनें सर्व खात्यांत त्यांचा शिरका। होऊं देणें हें फार धोक्याचें व राजनीतितत्वा विरुद्ध आहे असें आह्मांला वाटतें. ज्यानें अश्रांत श्रम करून युवराजांच्या राज्याला या दशेला आणून पोंचविलें त्या महा मुत्सद्दी सर सालरजंगाचा सदुपदेश युवराज विसरले नसतील! युवराजानां हिंदुस्थानचा निदान आपल्या राज्याचा इतिहास माहीत असेलच. तेव्हां निझामचें राज्य ज्यानें स्थापिलें व

त्याच्या नांवानेंच ते आज गाजत आहे त्या इतिहासप्रसिद्ध निझाम उल-मुलकाचा आदबशीर व टापटीपीचा वर्तनक्रम युवराजाच्या स्मरणांतून गेला नसेलच. असें असून मग असें कसें होतें याचेंच आह्मांला राहून राहून आश्चर्य वाटतें व खेदही वाटतो. अशा आचरणानें प्रजाही एका प्रकारानें नाखुष होते इंग्लिश कामगारांना आजिबात फाटा देण्यास आह्मी युवराजांना सांगत नाहीं व तसें सांगणेंही योग्य नाहीं. पण त्यांचा दर फार माफक असावा असें आमचें सविनय युवराजापाशीं मागणें आहे.

---

रजपुतान्यांतील बुंदी संस्थानानें निर्यात कपाशीवर मणामागें एक रुपया अशी जकात बसविली आहे. या जकातीविषयीं त्या संस्थानचा मूळ उद्देश असा कीं त्या संस्थानांतील फ्याक्टरींत कापसाचे गठ्ठे बांधण्याचें काम मुबलक मिळावें आणि संस्थानचे कारखाने अगोदर नीट चालावे. या जकातीसंबंधानें आसपासच्या व्यापाऱ्यांनीं व कारखानदारांनीं पुष्कळ ओरड केली परंतु संस्थानाच्या या जकातीच्या व्यवस्थेंत इंडिया सरकारचा पोलिटिकल एजंट मार्फत हात घालण्यास कांहीं योग्य कारण दिसत नाहीं असा रोख व खरमरीत जबाब मिळाला !

---

कलकत्याच्या चेंबर आफ कामर्स सभेनें हिंदुस्थान सरकारास अर्ज केला आहे कीं सरकारानें देशी धंद्यास उत्तेजन अवश्य द्यावें. देशी माल व चीजवस्तु मिळण्या सारखी आहे ती विलायतेहून मागविण्यांत येऊं नये. पुष्कळ पदार्थांचा पुरवठा दरसाल विलायतेहून होत असतो तो बंद करण्यांत यावा. रलवेकडील वस्तु देखील देशीच वापरण्यांत याव्या अशा विषयीं सक्तीचा हुकूम सरकारानें काढला पाहिजे. सरकार हेंच मुख्य गिऱ्हाईक देशी कारखान्यांस पाहिजे ह्मणजे लोक कोणत्याहि धंद्यांत भांडवल घालतात. इंडियांत राजाश्रय विलायतच्या कारखानेवाल्यास मिळतो आणि देशी धंदे गिऱ्हाईकांच्या अभावामुळें ठार बुडत चालले आहेत. बंगालच्या या व्यापारी सभेचा प्रयत्न फार स्तुत्य आहे आणि तिची मागणी सरकार लवकर कबूल करो !

---

पण हिंदुस्थान सरकार ह्मणजे आमचे हितशत्रू आहेत. कल्याणदृष्टी आपल्या जातभाईंवर ठेवावी आणि सर्व उपद्व्याप हिंदुस्थानच्या सुखाकरितां ह्मणून व्यर्थ ओरड करावयाची ! लार्ड सभेंत लार्ड रे ह्मणतात कीं हिंदुस्थानचें नफानुकसान मनांत वागविलें पाहिजे आणि लार्ड राबर्ट स्पष्टपणें बोलले कीं विलायतच्या पायीं इंडियाचा नाश होत आहे हें ठीक नाहीं. पण यावर कार्यसाधु व स्वार्थलोभी लार्ड किंबरले याचा तारा तुटला कीं विलायतच्या लोकांचें हिताहित विसरतां कामा नये. तेव्हां इंडियाच्या व विलायतच्या झगड्यांत विलायतच्या पायीं इंडिया रसातळास पोंचला तर त्याची विचारपूस परमेश्वराशिवाय कोण करणार! विलायती कपड्यावर जकात नको ह्मणून मांचेस्टरवाल्यांनीं आकाश पाताळ एक केलें आहे ! लार्ड डान्स डाऊन सारख्यास देखील हें अकांड तांडव मान्य नाहीं. परंतु सर्वच भालेराई व आपमतलबीपणा !

---

मुक्काम शिंदखेड, २९।७।९४

तारीख ११।७।९४ इसवी रोजीं शिंदखेड ता० मेहेकर येथें मुसलमान लोकांनीं दंगा केला व निर्वास्तपणें सरकारची भिती न धरता कांहीं लोक आपले घरीं आले व बाकीचे कांहीं मेहेकरास आपले पूर्वीचे लोक १९ जे हिंदु बरोबर हुकूम आणावयास गेले होते ते तेथेंच जामीन न दिल्यामुळें राहिले होते त्यांस हा मजकूर कळविण्याकरितां गेले. कांहीं लोक लपून बसले व कांहीं मोंगलाईंत गेले. देऊळगांवराजा, जालना, अंढेरा, बुलढाणा येथील पोलीस आले. चिखलीचेही पोलीस इन्स्पेक्टर साहेब आले होते. आमचे इन्स्पेक्टर साहेब यांस जशी जशी मदत येत चालली तसतसें त्यांस ही चौकशी करण्यास अधिक बळ येत चाललें. ता. ११।७।९४ रोजीं सर्व हिंदूस दुपारी ४ वाजतां बोलावणें पाठवून आणिलें, व मारलेले लोकांकडून अर्ज घेऊन मुसलमान लोकांपैकीं जे जे ओळखितां आले त्यां ९५।९६ लोकांची यादी घेतली. आणि येथें असलेले लोकांस बोलावणें पाठऊन १००।१०० चे जामीन घेतले परंतु यादी प्रमाणें लोक मुळींच हजर झाले नाहींत. त्यांचें कांहीं एक झालें नाहीं. हें आश्चर्य नव्हे काय! ज्या हिंदूस ज्यास्त मार बसला त्यांस देऊळगांवचे डाक्तराकडून सर्टीफिकिटें आणावयास पाठविलें. मग डाक्तरचीं सरटीफिकिटें मिळालीं. परंतु लवकर न पाठविल्यामुळें तीं जशीं मिळावीं तशीं मिळालीं नाहींत. एकास मात्र दिड महिन्याचें मिळालें. हा मनुष्य तर फारच मांदा आहे. नंतर हिंदूचे साक्षीदार लोक घेऊन हा मोकद्दमा मे. सें. क्ला. माजिस्ट्रेट मेहेकरकर यांजकडे ता. २०।७।९४ रोजीं पाठविला. त्या प्रमाणें लोक गेले परंतु त्यांणीं पुढें तारीख ८।८।९४ रोजीं नेमली आहे पहावें काय होतें तें! इकडे मुसलमान लोकांचे पूर्वी गेलेले १९ इसम मेहेकरास होते ते आले. यामुळें सर्वांच्या भेटी होऊन आच्छा किंया? आच्छा किया! अशा प्रकारची शाबासकी देऊन पुनः हिंदूंचे घरोवर येण्या जाण्याचा प्रकार चालू केला आहे. देखो. "तुम कैसे बो करो" "आपसमे समजो" क्यं मरयो. असे प्रकारचीं भाषणें गोड व कांहीं जरबीचीं होत आहेत. आणि गांवातील प्रमुख हिंदूस घेऊन साक्षीदार लोक फोडीत आहेत. असा प्रकार सवड सापडल्यामुळें घडून येत आहे. इकडे सरकार विशेष लक्ष देईल अशी आशा आहे. जे साक्षीदार लोक आहेत ते लोक मुसलमानांचे जरबीनें भीत आहेत. अगे देखो आज तुमकू सरकारक भूषण आहे. कल तुमसे और हामसे गाठ है फेर क्या करेंगे? असें ह्मणत आहेत. तूम और हाम एकीच है. असें गोड आणि जरबीचें बोलणें आमच्या वेड्या हिंदूस खरें वाटतें. शिंदखेडच्या पाटलास मूर्च्छा येईंपर्यंत मारलें हें इनस्पेक्टर समक्ष लोकांनीं पाहिलें परंतु पाटील ह्मणतात कीं मला मारलें परंतु कोणी मारलें हें लक्षात नाहीं. परंतु अगोदर मला अमक्यानें मारलें असें कबूल करीत असतां धाकानें असें ह्मणतात तसेंच गोविंदराव डांगें यांचे बंधूस त्यांच्याच शिपायानें खूप मारलें परंतु मुसलमानाचा पक्ष ज्यास्त आहे. साक्षी पुरावा कोठला होतो? चांगले लोक घाबरूं लागले तर गरिबांची स्थिति कशी व्हावी? अखेर गरीब हिंदूंचें दैवानें जें होणार तें होईलच. संकटाचे समयीं कोणी नाहीं. एक ईश्वरच खरा. फ० क्लास माजिस्ट्रेट मेहकर यांचे हुकुमाप्रमाणें हे लोक वागले नाहींत याबद्दल हे लोक सरकारचे गुन्हेगार किंवा हिंदुलोकांचे गुन्हेगार याबद्दल खुलासा व्हावा. कळावें.

---

The Berar Samachar

MONDAY AUGUST, 13, 1894

## THE PRESENT FISCAL CRISIS

The declaration made only a week ago in the House of Lords by the Ex-Governor in Council of Bombay that "according to latest reports, the State of Indian finance appears more hopeful" has been received throughout the nation with an amazing surprise. The name of Lord Reay is so universally adored and respected that this statement from him can hardly reconcile his general strength as an administrator of the first type. Whatever it be, the sanguine anticipations of the Under—Secretary of State are not shared by those who are familiar with the facts of the situation in India. The effects of the large import trade of last year upon the rupee may have died away, and exchange, low, though it is, may be resting upon a more healthy basis. The stimulus of exports however is the direction in which we have to look for the improvement of existing rates, but at present we shall look in vain, for trade is exceedingly hampered by variety of unsatisfactory combinations. Small mercies are no doubt being shown for the great hardships inflicted. The tentative conversion scheme may afford some relief, it has at least not affected exchange to any considerable extent. More than half the 1842—3 loan has been tendered for conversion. But the out—look for other Government paper is not equally sanguine. Should the present policy be continued longer money will probably become dearer and three and a half per cent paper will go down to a very low level. So numerous incomes are affected by the Government scheme that a good deal of easiness prevails and holders of "optional" paper are very doutful whether they should convert their paper. The imports of silver again have not been large during the past month or three weeks as were anticipated.

The imposition of the five per cent duty has not had much effect in stopping the influx of silver, and if there has been any falling off in this direction, the explanation is readily found in the condition of trade, rather than in the duty now payable by importers. The Government of India persist, from most mysterious principles of Economies in regarding silver as an ordinary export. In consequence of this incredible blunder it allowed to slip by the proposal of the ruling Government beyond the seas of putting a prohibitive import tax an silver. No doubt the main objection to such an impost is that the tax is exceptionally imposed not for the sake of obtaining revenue but for the sake of giving an unnatural and artificial value to the price of the rupee. By value of a rupee we mean its power of purchasing commodities and by its price we mean its worth measured in money as a medium of exchange and standard of the values of all other commodities. The exceptional difficulties of artificially raising the value of rupee require equally exceptional remedies. What was the motive which actuated the Government of India to close the mints only twelve months ago? Is silver an import of any material benefit? Save for monetary purposes is it not a luxury rather than a necessity? Is it not monstrous to allow a comparatively useless commodity which defeats the whole currency policy of a large nation to come in entirely un—checked? What is then, the use of Lord Reay's most sanguine statements? Things must mend when they are at the worst. British Government is well aware that unless exchange advances, during the busy season, to such an extent as to justify Mr. Westland's fourteen penny basis, for his Budget, the deficit in India must be so alarming that it will be no longer possible to stave off the evil day when their compact with the Lancashire members must end by yielding to the unanimous voice of every trade, every interest, and every community in India. British Statesman—ship would certainly have been most credited if the Cabinet had early faced the situation that presented itself at the commencement of the year, and had refused to prohibit the Government of India from extending the import duties to cotton goods. The confidence which, we, as a nation, have in the good wishes and philanthropy of our rulers would have continued longer. The greatest foible which Anglo—Indians boast of having discovered in native character, is, according to them trickiness, intriguing spirit, and falsehood. Our rulers are in fact, these officers. Their implied wishes are to us a law. Our position is such that the thinking as well as the unthinking are obliged to depend on the mercy and good grace of our benign executive officers. Necessity and long continued thraldom may be nothing to our transcendental executive rulers who may or who often do take advantage of our weakness and nevertheless inwardly despise us for it. But we can console ourselves that all have to a greater or less extent the defects attributed to us. Not that they should be therefore safely indulged in. Happy will be the times when these defects are honestly condemned and sincerely despised; when the convention of our national morality rises to that pink of perfection when such characteristic defects are felt like some unbearable wounds and vital sores. But what must these our fault—finding rulers have thought when they might have read Lord Kimberley's attempt in the House of Lords to prove that dark was luminous! Had the British Statesmanship judged and weighed the little remote future which is inevitable, it could have, safely till some next trying opportunity succeeded in duping the people into a persuasion that the Paramount Power existed for no other earthly object than that of elevating a fallen humanity and of exalting the moral and intellectual ideal of the people. But an exposure untimely discovered itself as on previous occasions, such being not unfrequent or few.

---

In his report on Sanitation in Berar for 1893 Doctor Little ably accounts in a scientific manner for the decrease in the total number of births. His general remarks about numerous births and heavy deaths in India in comparison with the birth-rates of England will be interesting to those who listened the other day to the learned lecture of Mr.

Vishnu Moreshwar Mahajani on the laws of the growth of population. Doctor Little observes thus:—

"In Europe it is observed that the highest birth-rates occur in crowded cities amongst the poorest and unhealthies classes, and that they generally coincide with high death-rates.

"This high birth-rate prevailing in cities has been attributed to the fact that in urban populations a greater proportion of women of the child-bearing ages are married, and that they marry younger than is the case in the country. This factor in raising the birth-rate in the cities of Europe would not, however, apply to India, where almost every girl comes under coverture at puberty, irrespective of town or country. Another cause, however, which tends to stimulate the birth-rate in cities is the general prevalence of high rates of infant mortality, the intervals of child bearing being shortened by the early deaths of the new-born.

"It has been contended, however, that births will never be as numerous in our Berar towns (which are not much more than large villages) with their non-agricultural population, as in small villages, where the population is almost exclusively agricultural. In towns there is always a large population unmarried, or living as unmarried, while in villages it is the object of every cultivator to get a family to assist him in his work. Still, however,, as birth registration in towns has improved, the town rates have approached country rates."

"The Sanitary Commissioner is however particular in assigning special causes that have affected the birth—rates of the year 1893. These causes intensify our apprehensions as to the distressing and starving condition of the masses and the insanitary and unhealthy surroundings make life as miserable as possible. His remarks run thus:—

The main factors, in determining an Indian birth-rate, are assumed to generally depend on variations in har vest in the seasons preceding the birth and on the absence or other—wise of abnormal health conditions,—such as the prevalence in epidemic form of cholera, fever, influenza, &c., causes, which, by impairing health and physical vigour, result in diminished fecundity. The year 1891 was abnormally unhealthy, the mortality reaching to 40-6 per 1,000 as compared with a mean rate of 35.3 for the previous 10 years. It must be remembered that the number of people who die in an unhealthy year is but a small proportion compared with those whose physical powers are weakened and impaired by sickness, so that the abnormal sickness of 1891 would be sufficient to ccheck reproduction in 1892.

Again, the staple food of the province (jowari) was considerably dearer in 1892, than in the previous year, which would operate by delaying a return to physical vigour of those enfeebled by illness, especially amongst the labouring poor, whose labour does not generally provide more than just sufficient to afford a bare subsistence so that the check on reproduction brought about by the abnormal sickness of 1891, extended into 1893."

## वऱ्हाड.

हवामान— अभ्रें फार येतात, कधीं केव्हां तरी थोडा पाऊसही पडतो. एकंदर पाऊस २० इंच झाला. हवा रोगट आहे.

मि० आबर्ड सेशन जज्ज यांची स्वारी येत्या १८ वीच्या सुमारास परत वऱ्हाडांत येईल.

मि० निकोलेट, डेपुटी कमिशनर, उमरावती हे रजेवरून परत आपल्या जागीं दाखल झाले.

आकोल्याचे सिव्हील जज्ज रा. रा. विश्वनाथ नारायण दांडेकर यांच्या उत्तम कामा बद्दल जुडिशिअल कमिशनर यांनीं आपल्या रिपोर्टांत मुद्दाम त्यांचा निराळा नामनिर्देश केला आहे हें कळविण्यास आनंद वाटतो.

सन १८९४ चा आक्ट ९ म्हणजे तुरुंगाचा कायदा हा वऱ्हाड प्रांतास लागूं केल्या विषयीं गव्हरनर जनरलचा हुकुम झाला.

सन १८९१ चा आक्ट २ म्हणजे बायलर इनस्पेक्शन आक्ट या अन्वयें या प्रांतासाठीं कांहीं विशेष नियम अलिझान रेसिडेंट यांनीं तयार करून तें या प्रांतास लागू केले.

यंदा वऱ्हाडच्या वकिली साठीं ४४ उमेदवार असून १ उमेदवार रेसिडेन्सी कोर्टांतील वकिलीसाठीं आहे. परीक्षा पुढील चैाथ्या तारखेस उमरावतीस सुरू होईल.

हत्याराचा कायदा वऱ्हाडास लागूं केला आहे त्या अन्वयें असें ठरलें आहे कीं कोणतें ही हत्यार, बंदूक वगैरे सन १८९५ च्या एप्रिलच्या १ ले तारखे पासून पुढें लोकांनीं परवान्या शिवाय आपल्या जवळ बाळगूं नये.

रा. रा. वामन गणेश बोरखेडीकर तहशीलदार यांची बदली वणीहून दारव्ह्यास झाली आणि दारव्ह्याचे तहशीलदार रा० रा. विनायक आपाजी हे वणीस बदलण्यात आले.

गेल्या ५ वे तारखेस रा० रा० बाळकृष्ण श्रीधर कोल्हटकर यांचें व्याख्यान शारीर शास्त्रांतील कांहीं गोष्टी संबंधानें झालें. श्रोतूसमाज लहान होता म्हणून निराशा वाटली परंतु भाषण चांगलें झालें व त्यांत माहिती पुष्कळ होती.

जिल्हा बोर्डा कडील कामें सुरळीत व सुयंत्र चालावीत म्हणून प्रत्येक जिल्हा बोर्डास १०० रुपये पगाराचा एक ओव्हरसिअर, ४० चा ड्राफ्टसमन व प्रत्येक तालुका बोर्डाला ५० चा सब ओव्हरसिअर असे अंमलदार देण्यांत यावे अशी कर्नल मकेंझी यांची सूचना आहे आणि ती पसार करणें त्यांच्याच हातीं येणार आहे.

म्याट्रीक्युलेशनच्या वर्गांत बसणाऱ्या विद्यार्थ्यांचें वय १८ हून जास्त नसावें आणि हाच नियम प्रत्येक इयत्तेला एकेक वर्ष याप्रमाणें खालील इयत्तांस लागू करावा असें सरक्युलर राव बहादूर जठार यांच्या वेळीं निघालें असून त्याची अंमलबारी पुढील साला पासून होणार आहे असें 'वैदर्भा'वरून कळतें. वयाचें मान या पेक्षां फार मोठें असतें म्हणजे कदाचित् हें सरक्युलर घातुक झालें नसतें! वया संबंधानें प्रातिबंधक नियम वऱ्हाडाला नकोत परंतु ते दुसरे कोठें चालूं नसले तरी येथेंच चालतात हें वैपरित्य नवलाचें आहे!

अकोल्यास नोव्हेंबरांत जी प्रांतिक सभा भरणार आहे तिच्या संबंधानें व्यवस्था करण्या करितां येत्या रविवारीं दुसरीं येथील प्रमुख लोकांची सभा भरणार आहे. अकोल्याच्या लोकांस सार्वजनिक कामाची मोठी हौस असते तेव्हां हा समारंभ चांगला पार पडेल अशी आह्मांस उमेद आहे.

येथील रेलेवर असलेले हेड आकौंटंट मि. शामरेट यांस जलोदरानें तारीख ३ रोजीं देवाज्ञा झाल्यामुळें त्यांच्या जागीं मि. आर जे. थामसन यांस कायम करण्यांत आलें.

## नोटिस

नोटीस बेशमी मोतीराम बिन मणीराम जात कनोजे ब्राह्मण मौजे उमरी महमदाबाद प्रगणे अंजनगांव तालुके दर्यापूर जिल्हा एलिचपूर खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी मजजवळून मौजे उमरी महमदाबाद येथील सर्वे नंबर ७७।८५ची जमीन वहितीस साल मजकुरी पासून सन १३०९ वर्षापर्यंत वहितीस केली असून तुह्मी सदरील शेताची किस्तगारी न करितां ती जमीन पडीत पाडून गादिवली सबब मी तुह्मास टपाल मार्गानें नोटीस जमीन वाहण्याबद्दल केली नोटीशीचा जबाब न देतां आपसांत पुढील वर्षांचे हक्क न ठेवितां ती जमीन सालमजकूर पासून माझे स्वाधीन करून देऊन कबजांत दिलें व असें केल्याबदल माझे सहीची तुह्मी पावती घेतली सबब मी त्या जमीनीची किस्तगारी केली तिजला सुमारें दीडशें १५० रुपयें खर्च लागला आणखी पुढें रगीचे पेरणीस जास्त खर्च लागेल तर ती जमीन तृणानें गादली आहे वरून मालकीचे रुपये व खर्चांचें रुपये असें मिळून सदरील जमिनींत पीक होण्याचा संभव दिसत नाहीं सबब नुकसान आल्यास कोर्टमार्फत भरून घेतलें जाईल कळावें तारीख ९-८-९४ इ०

(सही) राजाराम वल्लद बाळाजी पटवारी
उमरी महमदाबाद दस्तुर खुद्द.

## नोटिस.

नोटीस बेशमी माधोजी वल्लद भवानजी जंवजाळ जात कुणबी राहणार मौजे सासन रामापूर तालुके दर्यापूर जिल्हे एलिचपूर यास खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुझी लग्नाची बायको असून सुमारें बारा तेरा वर्षांपासून तूं दोन्ही डोळ्यांनीं आंधळे झाल्यामुळें मला टाकून दिल्यामुळें मी मौजे पारडी येथें माझे बापाचे घरीं राहण्यास गेले. तेही गरीब असल्यामुळें अलग राहून निर्वाह केला. आज पावेतों मला सावकार लोकांचें कर्ज शंभर रुपये झालें आहे व त्यांचा पाठीमागें सक्त तगादा आहे करितां नोटीशीनें कळवितें कीं ही नोटीस पावल्यापासून एक महिन्याचे आंत वरीलप्रमाणें रकम देऊन मजला घेऊन जावें. तसें न केल्यास सदरील रकमेबद्दल तुमचेवर फिर्यादकाराणें भाग पडेल व मजला तुह्मी वागवित नाहीं असें खात्रीनें समजून दुसरा नवरा करीन कळावें. या नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावें तारीख ९ माहे आगस्ट सन १८९४.

( सही )
भागिरथी मर्द माधोजी जंवजाळ राहणार
पारडी इची नि० खुद्द बांगडी असे,

## नोटीसीचे उत्तर

ताजबी मर्द फैजुला हल्लीं रहाणार वडनेर भोलजी कारंजपुरा तालुके मल्कापूर ईस खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं तुमची तारीख २-८-९४ ची वैदर्भ पत्रांतील नोटीस पावली. आह्मी तुह्मास आपले घरीं नांदविण्यास तयार आहे. तुह्मास कधींच टाकून न देतां आपले बापाचे घरीं राहण्या करितां परवानगीही दिली नाहीं. सन १८९२ चे फेब्रवारी महिन्यांत तुमचा धाकटा भाऊ शेख महेबुब याचें लग्न असल्यामुळें तुमचा बंधु शेख मस्तान हा घेऊन जाण्या साठीं आल्यावरून त्याजबरोबर तुह्मास पाठविलें होतें व लग्न झाल्यावर परत येणें होतें त्याच प्रमाणें तुमचे बंधुनींही कबूल केलें. लग्न झाल्यावर तुह्मास आणण्यासाठीं चार आह्मी आपले बापास तुह्माकडे आणि तुमचे बापाकडे पाठविलें असतां तुह्मी आला नाहीं व तुमचे बाप आणि भाऊ यानीं पाठविण्यास इनकार केला. शेवटीं आह्मी जातीनें आलों तरी हाच परिणाम झाला. तुमचे नोटिशींतील सर्व लिहिणें खोटें आहे. आह्मी नांदविण्यास तयार आहों. सबब तुह्मी एकदम तुह्माजवळ असलेल्या डागिण्यासह निघून आमचे घरीं यावें. कर्ज केल्या बद्दल लिहिलेली गोष्ट खोटी आहे व खरी असल्यास आह्मी जबाबदार नाहीं. आमचा इरादा तुह्मावर फिर्याद करण्याचा होता पण तुह्मी अगोदरच नोटीस दिली वरून आतांही दोन आठवड्यांत आल्यास बरें आहे नाहींपेक्षां सदर्हू वर लिहिले प्रमाणें कोर्टांत जाणें भाग पडेल व तेथें खरें खोटें उघाडीस येईल. कळावें तारीख ८ माहे ८ सन १८९४ इ०

सही
फजुला वल्लद महमदखा दस्तूर खुद्द
राहणार खामगांव खाटिकपुरा
दस्तूर खुद्द.

## वर्तमानसार

आमिरांकडे टपाल नेणाऱ्या दोन टपाल वाल्यांना ठार मारिलें असें म्हणतात.

इंग्लंडात यंदा १। कोट टन गवत उत्पन्न झालें असें समजतें.

अफगाणिस्थानचे अमीर साहेब आपलें जीवनवृत्त लिहीत आहेत.

सांगली संस्थानचे कारभारी रा० ब० वैद्य हे आपलें पाऊल त्या संस्थानांतून बाहेर काढूं पहात आहेत अशी बातमी आहे.

पुणें येथें यंदाच्या गणेशोत्सवाचा समारंभ ऐटबाज करण्याच्या तयाऱ्या चालल्या आहेत. त्या वेळीं म्हणण्या करितां मारुतीची व गणपतीची कांहीं पदें तयार झालीं आहेत. स.

नेपाळ.–( ता. २९-७-९४ ) यंदा इकडे पाऊस थोडा झाल्यामुळें शेतें वाळत चालली.

सोलापूर.– पावसानें मोठें ताणल्यामुळें शेतीची त्रेधा उडाली आहे

लढाई.– चीनच्या यसन येथील छावणीवर जपानी लष्करानें दोनवेळां हल्ला केला होता, परंतु त्यांत त्यास यश मिळालें नाहीं असें कळतें. चीनपेक्षां जपानचें लष्कर जास्त प्रबळ आहे असें एका दोहीं लष्करांत राहिलेल्या मनुष्यानें आपलें मत कळविलें आहे. प्रसिद्ध रीतीनें ही लढाई सुरू केली असल्या बद्दल जपान सरकारानें जाहीरनामा काढला आहे. या लढाईंत कोणत्याही पक्षांत न पडतां आपापल्या रक्षणाकरितां मात्र तयार होऊन बसावयाचें अशा प्रकारचे ठराव युरोपांतील राष्ट्रें करूं लागलीं आहेत. त्याप्रमाणें इंग्रजांनींही आपली मौनवृत्ति स्वीकारली असून, स्वतःच्या रक्षणासाठीं मात्र तयारीत रहाण्याविषयीं लष्करास चहूंकडे हुकूम फिरविला आहे.

सरहद्दीवरील चित्राळ संस्थानांत, एक इंग्रज अधिकारी रशियाची हालचाल पहाण्यासाठीं ठेवण्यांत येणार आहे.

बिहार प्रांतांत यंदा पर्जन्याचा अद्याप दुष्काळ पडला आहे.

गोहना तलाव फुटेल तेव्हां गेला फारच मोठा पूर येऊन, तिच्या आसपासच्या चार पांच कोसापर्यंतचा प्रदेश जलमय होईल असें अनुमान करण्यांत आलें आहे.

मद्रासच्या दोन व विजयानगरची एक अशा तीन तरुण व खुबसूरत वारांगनांनीं, 'भारत' नांवाच्या मद्रासी पत्रास अशीं पत्रें पाठविलीं आहेत, कीं "सुंदर, श्रीमान व सुशील असा कोणी पुरुष असेल तर त्याशीं लग्न करून, गृहस्थाश्रमांत राहण्यास आमची खुषी आहे."

हिंदुस्थान सरकारच्या तिजोरीस गळती लागण्याचें खरें कारण, नाण्याचाच कायदा नसून, दिवाणी व लष्करी खर्चांत हद्दबाहेर जो उधळेपणा होत आहे तो मुख्यत्वेंकरून कारण आहे.

गोहना तलावाचें पाणी एक सारखें वाढत चाललें आहे तिकडे युरोपियनांनीं आतां तलाव पहाण्यास जाऊं नये असा सरकारी हुकूम झाल्याचें कळतें.

लाहोर येथें नवेंबर अखेर जो मोठा दरबार होणार आहे, त्यास काश्मीर वगैरे ठिकठिकाणचे बरेच राजे लोक जाणार असून त्यांच्या व ब्रिटिश फौजा मिळून, हा दरबार फारच मोठा होणार आहे. पूर्वी महाराणींनीं हिंदुस्थानचा कारभार आपल्या हातीं घेण्याचे वेळीं दिल्लीस जो दरबार केला होता त्यासारखाच हा मोठा दरबार होऊन, पैशांचा खूप खर्च होईल असें दिसतें.

निजाम हैदराबादेंत ताबुताच्या संबंधीत 'लंगरा' चा मोठा उत्सव होत असतो. या वेळीं मोठ्या थाटानें लष्करी स्वारी निघत असते. ती या वर्षी समाधानानें पार पडली. अदमासें एक लक्ष लोक या उत्सवाचे वेळीं होते.

कानपुरास पटकीचा जोर फार वाढला आहे व तेथें आणि प्रयाग व बेळगांव येथें या रोगाचा प्रादुर्भाव. लष्करी लोकांत दिसूं लागला असून, सोजीर लोकांत निराळ्या जागेची व्यवस्थाही करून देण्यांत आली आहे. हल्लीं ह्मणतात खरी कळकळ !

चीन देशांत हांगकांग येथें जशी नव्या तऱ्हेच्या भयंकर रोगाची सांत पसरली आहे तशीच सांपत ब्रह्मदेशांतही सुरू झाली असून या सांतीनें ब्रह्मदेश उध्वस्त होऊन जाईल अशा प्रकारचें एक पत्र, मंडाला येथील बुद्ध देवाच्या छातींतून निघालें असल्याची बातमी तिकडे पसरली असल्यामुळें. लोक फार घाबरून गेले आहेत. रंगून येथें याच्या शांत्यर्थ बळी देण्याची तयारी झाली आहे.

चिकागो पोस्ट ऑफिसास हल्लीं जी जागा अडली आहे, तिची किंमत ९६ वर्षांपूर्वी १६०० रुपये झाली होती. पण तिलाच हल्लीं एक कोटी साठ लक्ष रुपये किंमत ( नुसत्या जमिनीची ) येऊ शकते. कालचक्र !

सगळ्या पृथ्वींत एकंदर ११४२ बोगदे आहेत अशी गणती काढण्यांत आली आहे. आणि त्या सर्वांची मिळून एकंदर लांबी २९७ कोसांची आहे. स० वि०

पंजाब सरकारानें त्या इलाख्यांतील शाळांत लघुलिपी चालू करण्याचा हुकूम फर्माविला आहे ह्या लिपीचा आरंभ प्रथम लाहोर व अमृतर येथील शाळांत करून तेथें ती लिपी लोकप्रिय झाल्यास सर्वत्र चालू करावी असा विचार आहे.

दिवसेंदिवस हिंदुस्थानांतून फ्रान्सकडे शेंगा अतिशय जात असून तिकडे त्यांचे उत्तम तेलाचा पुष्कळ निरनिराळ्या कामांत उपयोग होतो हेंच तेल, सुधारलेल्या पद्धतीप्रमाणें इकडेच काढण्याचा प्रयत्न होईल तर त्या पासून हा धंदा करणारांस खचित मोठा फायदा झाल्याशिवाय राहणार नाहीं. पोटाकरितां भलतेच धंद करणारांनीं अशा कामीं लक्ष दिलें तर फार चांगलें होईल.

न्या० सु०

पार्शी इंजनेर— कूपर हिल कालेजात पास झालेला खारेघट नांवाचा मनुष्य लौकरच पब्लिकवर्क्स खात्यांत नोकर होऊन येणार आहेत.

युरोपियनास शिक्षा—९ व्या मुंबई पायदळ पलटणींतील लेफ्टनंट चिटी यांच्या पोषाखाचे कांहीं सामान मि. आर्थर माइरस याणें चोरल्याची पूर्ण शाबिती झाल्यावरून कराचीचे सिटी माजिस्ट्रेट यांणीं त्यांस एक वर्ष सक्त मजुरीची शिक्षा दिली.

नबाबी हुकूम—सितापूर ( वायव्य प्रांत ) चे डे. क. कमीशनर मि. राजर्स याणीं सीतापूर म्युनिसिपल हद्दींत हिंदुलोकांनीं लग्न समारंभांत वाद्यें वाजवूं नयेत असा हुकूम केला असून तो ते सक्तीनें अमलांत आणीत आहेत. ज्ञा० सू०

पोर्ट हामिल्टन हें इंग्रजांस आपल्या ताब्यांत घेण्यास रशिया परवानगी देणार नाहीं, कारण तसें केल्यानें दुसरा एक जिब्राल्टर तयार होईल आणि रशियाच्या आरमारास आडकाठी होऊन रशियाच्या एशियांतल्या राज्यास अपायकारक होईल असें एका प्रमुख रशियन पत्रांचें ह्मणणें आहे.

शांघाईची तार सांगते कीं, कोरियाचा राजा हा हल्लीं जपानचा कैदी झाला आहे.

जपान सरकारानें आपल्या रिझर्व ह्मणजे राखून ठेवलेल्या फौजेस व आरमारास या लढाईच्या कामावर येण्याचा हुकूम केला आहे.

खासगी माहिती वरून रुटर कंपनीचा शांघाईचा बातमीदार कळवितो कीं, चीन व जपान यांच्या आरमाराची ता० ३० रोजीं आणखी एक लढाई झाली व चांगला कडक सामना होऊन त्यांत जपानी आरमारानें चीनचे आणखी एक गलबत बुडविलें.

चीनची मोठीं अशीं लढाऊ दोन गलबतें जपानी फौजेनें कैद केलीं किंवा बुडविलीं अशीही बातमी आहे.

चीनच्या फौजेच्या यासान नावाच्या छावणीवर जपानी फौजेनें वेगळाले दोन हल्ले केले, पण दोन्हीवेळ त्यांचा पराभव होऊन त्यांत जपानचेंच फार नुकसान झालें.

लढाई जर रितीप्रमाणें सरूच झाली तर चीन अगदीं शेवटपर्यंत निकरानें लढेल असें चिनी प्रिन्स ली हुंग चंग याचें ह्मणणें आहे.

जपानानें चिनाबरोबर लढाई करण्याचा रीती प्रमाणें जाहिरनामा प्रसिद्ध केला.

चीन व जपान यांची लढाई सुरू झाल्यावर इंग्लंड तिऱ्हाइताप्रमाणें उगीच तमाशा पाहत बसणार!

चीन व जपान यांच्या फौजेची यासान येथें जी लढाई झाली ती ता. २७।२८ रोजीं झाली व त्यांत जपानचे २,००० लोक ठार झाले.

चीनची मांचुरिया येथील २०,००० फौज कोरियाच्या हद्दींत जाऊन दाखल झाली.

चीनचीं जीं गलबतें जपाननें बुडविलीं त्यांतील हानिकन हा जर्मन आफीसर बचावला.

चीन देशांतील चिनी व्यापाऱ्यांनीं वर्गणी करून लढाईचा फंड ह्मणून रकम जमविण्याचें सुरू केलें आहे.

तेलाच्या पिपांत मुंबई पोलिसानें बंदुकीचे कांहीं कैप पकडले आहेत व त्याबद्दल जास्त तपास चालू आहे.

राजा कृष्ण प्रसाद हा निझाम सरकारचा लष्करी प्रधान आहे त्याणें आपल्या भाऊबंदांच्या ताब्यांतलें एक खेडें जुलमानें आपल्या ताब्यांत घेतलें अशी तकरार आल्यावर चवकशी चालू आहे.

सक्करच्या पलीकडे महापुरानें रेल्वेचा रस्ता बंद झाला आहे.

सिमला कालका रस्त्यावर पावसाच्या अति वृष्टीनें इतके डोंगर कोसळून पडले आहेत कीं, त्यामुळें आणखी महिना तरी त्या रस्त्यानें गाड्या जाण्या येण्याची सुरवात होणार नाहीं.

औंध रोहिलखंड रेल्वेचा रस्ता महापूरानें बिघडून गाडी बंद आहे.

देरा दुम प्रांतात ता० २९ पासून ३१ पर्यंत २१ इंच व २८।२९ या दोन दिवसांत १९ इंच पाऊस पडला व त्यामुळें शाहरणपूर— देरा रस्ता वाहून गेला.

सिमल्याच्या कालका रस्त्यावर सहा कोसांत मागच्या रविवारीं वेगळाल्या आठ ठिकाणीं डोंगर ढासळून रस्त्यावर पडले.

जीहाद ह्मणजे धर्मयुद्ध सुरू होण्याकरतां आफ्रीकेंत उपदेश करीत असलेला सेनेगलचा माराबोटा यास फ्रेंचफौजेनें लढाई करून ठार मारला. त्याचे साथी असे १०० लोकही ठार केले. फ्रेंचांचे ९ मेले व सहा आफीसरांसह १९० घायाळ झाले. हें सर्व कशाकरतां तर आफ्रिकेंतल्या त्या मुसलमानांची स्वतंत्रता हिरावून घेऊन आपले पोटजाळण्याची सोय करण्याकरितां ! ! आणि असें अत्यंत क्रूरकर्म करणाऱ्यासच राजा ह्मणण्याची हल्लीच्या जगाची प्रवृत्ती आहे! अ.द.

NEARYL READY

**CRIMINAL COURT MANUAL.**

*for the*

Hyderabad Assigned Districts
by
Mr. R. Obbard
assisted by
Syed Meer Alum,

Containing the uncancelled Notifications of the Government of India extending Laws and promulgating Local Laws (with reprints of Forest Law, Abkari Rules, Municipal Act, Courts Law, Rules, regulating Legal Practitioners and other Local and Special Laws), the Notifications and rules published under the authority of the extended Laws, the uncancelled Circulars and Orders of the Government of India, Resident, Commissioner, and Judicial Commissioner relating to Crimial matters, and full information in regard to the prescribed registers, returns and forms, to be used in and by Criminial Ccurts, with notes by Mr. R. Obbard, and a copious Index.

PRICE RUPEES 5

Subscriptions registered by Syed Meer Alum at the office of the Civil and Sessions Judge, Amraoti Camp Berar.

## घड्याळ.

कि. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएल्सचें ( ह्मणजे चकाचें खालीं वर हिरे बसविलेले आहेत ) चावी देण्यास मोगरा, कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक चिनीचे कांचेचें मुदाम युरोप मध्यें करविलेलें. या वर आमचें नांव आहे. हें खिशांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।१२ वर्षें दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. सचित्र क्याटलाग मागवा. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशीक

किंमत १० आणे

## गुरुचरित्र

पांच किंवा जास्त प्रती एकदम घेणारास दर प्रतीस

आठ आणे

हा ग्रंथ आज पर्यंत ८१४ आण्यास मिळत होता. त्याच्या आतां फारच थोड्या प्रती शिलक आहेत ग्राहकांनीं त्वरा करावी.
आर्य भूषण छापखाना, पुणें.

☞ हें पत्र आकोलें येथें कै० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालअखेर " ७ " १८८
किरकोळ १० अंकास ............... ८४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
ठे दर ओळीस ८१८६
दुसरे खेपेस .... ८१

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Single copy ........................... 4 as

Advertisement
Below 10 lines...2 Rs.
per line over 10...4 as.
Repitition per line 3 as.

VOL XXVIII AKOLA MONDAY 20 AUGUST 1894 NO. 33

वर्ष २८ आकोला सोमवार तारीख २० माहे आगष्ट सन १८९४ इ० अंक ३३

## ह्या राजश्रीनें केव्हां तरी पळ काढला असावा.

एका गृहस्थास त्याच्या वर्म वेडामुळें एका जुलमी सरकारानें कारागृह दाखविला तो ज्यांत कोंडला होता त्याच्या मजबूत दगडी भिंती पाहून त्याच्या मनाची खात्री झाली कीं आतां आपलें राहिलेलें आयुष्य ह्या एकांत व भयाण कारागृहांत घालविलें पाहिजे. जरी त्याला आतां पुढची गत चांगली नाहीं असें भासत होतें तरी त्याला दुःखांत सुख इतकेंच वाटत होतें कीं मला जुलमामुळें वेळी व्हावें लागलें परंतु सद्वर्तनाचें उल्लंघन केल्यामुळें कांहीं नाहीं. जर त्याच्या स्वाधीनची गोष्ट असती तर ह्या संकटांतून तो सहज पार पडला असता.

असें असून त्या बिचाऱ्यास सतत सोळा वर्षें हाल काढीत रहावें लागलें. हीं वर्षें संपतात तों त्याच्या मनांत आलें कीं ह्या भिंतीवर पुढें आलेल्या दगडाच्या आधारानें वर चढावें व त्यानें खिडकीच्या वरून काय दिसतें ह्मणून वर डोकें केलें. आणि असें केल्यामुळें त्याला वाटलें कीं पुढें लोखंडाचे गज आहेत ते काढून टाकतां येतील व त्या चौकटीची आगळही लाविली नव्हती. त्याच्या मनांत घोळूं लागलें कीं, काय मी पळ कां न काढावा? त्यानें खिडकी तर उघडली आणि सहा फूट उडी जमिनीवर मारली आणि त्या प्रदेशास शेवटचा राम राम ठोकला. जर त्यानें त्याच्या ठाम झालेल्या विचारास एकीकडे ठेवून विचाराची दोरी जर सैल सोडली असती तर ह्या स्थळीं इतके दिवस कुंथत रहावें लागलें नसतें.

ह्या स्वातंत्र्यार्थ प्राण अर्पण करणाऱ्या या बिचाऱ्याची दैवघटित गोष्ट साधक व बाधक आहे. त्याच्या मनाची धांव बंद केल्यामुळें साधक; त्याला ज्या कारणास्तव बंदींत टाकावयाचा होता तें नसल्यामुळें बाधक.

ही गोष्ट पत्र रूपानें जी सर्वांस आवडते त्या प्रमाणें खालीं थोडक्यांत व साध्या शब्दांत सांगतो. एक लेखक बाई ह्मणते कीं, आज सोळा वर्षें झालीं, पित्त क्षोभानें व अशक्तपणामुळें फारच गांजून गेले आहे. नेहमीं थकून जाऊन अगदीं हलक होऊन जाई. माझी अन्नावरची वासना उडाली, पुढें आणलेले ताटास हात लावीन तर शपथ. कित्येक दिवस माझ्यानें एक घास देखील खाववत नसे, कधीं कधीं मला मळमळ सुटे. पोटाच नगारा होई आणि तोंडावाटे मोठा घट्ट बेडका येई.

मला फारच त्रास दायक खोकला होऊन व बरगड्यांत फारच वेदना होत व दम बरोबर छाटत नसे. मी फारच हलक झाले आणि दुकानांत आंत बाहेर करण्याचा माझा तकवा अगदीं निघून गेला. सन १८९१ च्या दिसेंबरांत माझ्या एका गिऱ्हाईकानें मदर सिजेलचा क्युरेटीव सीरपा ( माता शिजेलचा रोगहारक पाक ) बद्दल बरेच गुणानुवाद गाईल्यामुळें मीं तें औषध घेण्यास सुरूं केलें. मी थोडे थेंब घेतल्या बरोबर मला बरेंच समाधान वाटलें आणि पुढें पंधरा दिवस औषध घेतलें नाहीं तरी मला बरें वाटत होतें. मला असा धीर आला ह्मणून मी अगदीं बरी होई तों पर्यंत ह्या औषधाचा उपयोग केला. आमचे चिरंजीव आरथरास एक वर्ष सतत जेवल्यावर जड झाल्या सारखें व वेदना होत होत्या आणि पोटाची दामटी होऊन खळगा पडल्या सारखें वाटे. त्याला हें औषध घेण्याची मी गळ घातली आणि त्याचा शेवट ह्मणाल तर माझ्या सारखाच झाला. मला पक्कें माहीत आहे कीं ह्या प्रदेशांतल्या बऱ्याच मंडळीनें दुसरे नाना उपाय करून थकेल व जेव्हां ह्या शिरपाचा ( पाकाचा ) उपयोग केला तेव्हां तात्काळ गुण आला. ह्या औषधाचा ( ह्मणजे माता सिजेलच्या सिरपाचा ) मला रामबाण गुण आला तो इतर पिडीतास ह्यामुळें यावा असें आपणास वाटत असेल तर हें पत्र आपण बेलाशक छापावें.

मी तुमची
( सही ) ( मिसीस ) एम वार्ड
१९४ इकस्टन रोड
शडफर्ड. नौटिंगहाम
ता० १ ली माहे एप्रिल सन १८९२

मीसीस वार्ड बाई साहेब ह्या त्रास दायक व भयंकर रोगा पासून बऱ्या झाल्या ह्मणून आह्मी तीस अभिनंदन करतो. आपल्या आयुष्यांत सोळा वर्षांचा वाटा सतत शारीरिक व मानसिक वेदनेंत घालवावा ह्मणजे फारच खराब समजावयाचें. कुबेराचे सोबती होणें फारच थोड्याच्या ललाटीं लिहिलेलें असतें. परंतु सुदृढता ही सूर्यप्रकाशा सारखी सर्व जगभर जिकडे तिकडे सारखी पसरते तद्वत ही पसरली पाहिजे. ही कमी राखावी हें ज्याला अवगत आहे तर तो त्याची काळजी घेईल व तो दूर झाल्यास आपल्या स्वाधीन करून घेईल.

ह्या बाईचा रोग पचनीय पिंडाचा ह्मणजे अग्निमांद्य व अजीर्णाचा होता. जो रोग फारच धोक्याचा व दुःख देणारा आहे कारण कीं ह्या रोगाचा पगडा इतका बसतो कीं शरिरांतलीं सर्व अंगें ह्याच्या बळी पडतात व रक्ताभिसरणामुळें ह्या रोगाचें विष सर्व शरिरांत पसरतें. ह्या रोगाचें मुख्य कारण निरनिराळ्या नांवानें होणारे परिणाम व चिन्हें हीं होत. ती जें औषध सांगते त्याच्या गुणाची ज्यास चांगली माहिती झाली आहे त्यास नवल वाटण्यास नको. मोठ मोठाले असाध्य रोग ह्या औषधास शरण येतात.

आमचे वीर जे आपल्या गुहेंत कसातरी वेळ काढीत होते त्यास बाहेर निघून जाण्याची गुरु किल्ली माहित नव्हती.

जर ह्या ओळी अवलोकन करणारे दुःखाचे गुलाम झाले असतील तर त्यास तसें राहण्यास कांहीं कारण दिसत नाहीं.

तिच्या सचोटीच्या आटोक्यांत लिहिलेल्या पत्रा वरून रोगाचें शमन कसें होईल ह्याचा रस्ता दाखवून देते. हें आमच्या पत्र व्यवहार करणाऱ्या गृहस्थाच्या लेखा वरून समजेल. H. D.

## नाग, नरसे, पिठोरी व जिवत्या

आह्मी येथें विक्री करितां नाग, नरसे, जिवत्या व पिठोरी किंवा पाठोरा हीं चित्रें ठेविलीं आहेत. चित्रें फारच सुरेख व पहिल्या पेक्षा त्यांत फरक करून किंमतही कमी करून उत्तम प्रकारचीं छापलीं आहेत. ज्यांनां पाहिजे असतील त्यांनीं खालील पत्यावर पैसे पाठविले असतां सदर्हू चित्राचे कागद पाठवून देऊं. किंवा व्हेल्यूपेबलनेंही पाठवूं. चित्राचा दर शेंकडा ११, रुपया प्रमाणें. शिवाय टपालहशील पडेल.

बाळकृष्ण अनंत कंपाझीटर
वऱ्हाडसमाचार आफिसांत मिळतील.

## जाहिरात.

सर्वत्र लोकांस या जाहिरातीनें हरी आपा वल्लद गोविंदआपा लिंगाइत राहणार लाखनवाडा तालुके बाळापूर जिल्हे अकोलें हे असें जाहीर करतात कीं अदमासें चार महिने होत आले मी बाळकृष्णभट बिन पांडुरंगभट जोशी राहणार खामगांव यास कुलमुखत्यार पत्र देऊन कुलमुखत्यार केलें होतें परंतु सदर्हू भटजी यांणीं माझ्या कामामध्यें गैर व्यवस्था केल्याबद्दल आढळल्यावरून त्यास आह्मी आमचे कुलमुखत्यारीचे कामावरून दूर केलें आहे व त्यांचें कुलमुखत्यारपत्र आज तारीख १४-८-९४ इसवी पासून रद्द केलें आहे तर सर्वत्र लोकांस असें कळवितों कीं माझे करितां कोणत्याही प्रकारची देवघेव सदर्हू बाळकृष्ण भट यांच्याशीं करूं नये. केल्यास त्याबद्दलचे जबाबदार कोणत्याही प्रकारानें आह्मी नाहीं. आणखी असेंही कळवितों कीं आमच्या शेतीवाडी बद्दल कोणत्याही प्रकारचा व्यवहार आमच्या संमतीशिवाय सदर्हू भटजी यानबरोबर करूं नये केल्यास ज्याचा तो जबाबदार आहे. आणखी कोणत्याही प्रकारचा व्यवहार सदरहू भटजी यांच्याशीं कोणी आमच्या संमतीशिवाय करूं नये केल्यास आह्मीं जबाबदार नाहीं. ह्मणून दिली जाहिरात सही. ता. १३-८-९४.

(सही) हरी आपा वल्लद गोविंद आपा लिंगाइत राहणार लाखनवाडा द. खुद्द.

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण वद्य ४ शके १८१६

आमच्या नेटिव लोकांच्या अंगात कांहीं पाणी पाहिजे. म्यानचेस्टरवाल्यांचे इंडियाच्या राज्यकारभारांत देखील वर्चस्व कायम राहिलें खरें पण त्यांचा पाडाव करणें लोकांच्या हातीं आहे. विषवृक्ष वाढण्याच्यापूर्वीं त्याचा मूलच्छेद करून टाकिला पाहिजे. नेटीव लोकांत राष्ट्रीयत्व कांहीं जागृत असेल तर सर्व राष्ट्रवाल्यांनीं विलायतचा कपडा वापरावयाचा नाहीं असा संकल्प केला पाहिजे. निर्धार असा पाहिजे कीं प्राण जावो अथवा राहो, विलायतचा कपडा हातीं धरावयाचा नाहीं. लबाड लोकांस त्यांच्याच युक्तीनें दांतीं तृण धरण्यास लाविलें पाहिजे. सर्वत्र हिंदुस्थानच्या एका टोंका पासून दुसऱ्या टोंका पर्यंत एक कट पाहिजे. एकी, जूट, सख्यत्व, हीं जेथें वास करितात तेथें लक्ष्मी पाणी भरते पण यांच्या अभावीं हिंदुस्थानची याहून अधीक दुर्दशा कां होऊं नये हें आह्मास कळत नाहीं.

धान्य हिंदुस्थानांत पिकतें पण हिंदुस्थानचे लोक अन्नाविना मरतात. आमच्या लोकांचा उपासमारा व हालअपेष्टा पाहिल्या ह्मणजे कोठ्यावधि खंडी धान्य जातें कोठें असा प्रश्न सहजीं निघतो. ज्या धान्यावर उदरनिर्वाह चालावयाचा तीं धान्यें खंडोगणती परद्वीपीं रवाना होत आहेत. ही शोचनीय स्थिती दूर होण्यास उपाय दुहेरी आहे. एक लोकांच्या हातीं असून दुसरा सरकारी आहे. लोकांनीं आपल्या जवळील धान्य बाहेरच्या व्यापाऱ्यांस विकूं नये आणि सरकारनें निर्यात धान्यावर जबरदस्त कर बसवावे. दहा वीस वर्षांपूर्वीं जो गल्ला लोकांच्या पाशीं होता त्याचा लक्षांश देखील शिल्लक नाहीं. हंगाम झाला कीं सर्व धान्य देशांतून बाह्य खंडास रवाना झालेंच. थोडासा दुष्काळ पडला कीं एका वर्षा पूरता देखील लोकांच्या जवळ पुरवठा नसतो. किंबहुना आमच्या वऱ्हाड प्रांतांतील लोकांस नवल वाटेल कीं गेलीं चार पांच वर्षें शेंकडो खंडी गहूं, जवारी तुर वगैरे धान्यें बाह्य प्रांतांतून येत आहेत. लोकांच्या पाशीं शिल्लकींत धान्य निलकूल नसतें. महाराष्ट्रांत पंधरा सोळा वर्षांपूर्वीं दुष्काळ पडला होता त्यावेळीं वीस वीस वर्षांचीं पेवांतील धान्यें लक्षावधि रुपयांचीं या प्रांतांतून त्या मुलखांत गेलीं पण सध्याचा मनु अगदीं चमत्कारिक आहे. सर-

कारनें व लोकांनीं पाद्रीपीं घान्याची रवानगी न होण्यासाठीं झपाट्यानें चळवळ केली पाहिजे.

---

"अमृतबझार पत्रिकें"त सन १८७८ सालचा एक सरकारी हुकूम प्रसिद्ध केला आहे. त्याचा मतलब असा कीं नेटीव लोकांस रेल्वे कडील मोठ मोठ्या हुद्याच्या व जबाबदारीच्या अधिकारावर नेमण्याची निरनिराळ्या कंपन्या मार्फत व्यवस्था करण्यांत यावी. १८७८ सालीं असा ठराव झाला पण त्याची अंमलबजावणी गेल्या चौदा वर्षांत काडीमात्र झाली नाहीं. कागदांवर वाटेल तितके घोडे नाचवितां येतात पण खऱ्या प्रसंगाच्या वेळीं वरील जागा भरण्याच्या पद्धती अगदीं भिन्न आहेत. रेल्वे, पोस्ट आफिसें, तारायंत्रें इत्यादि खाती अशा व्यवस्थेखालीं आहेत कीं त्यांच्या मध्यें काळ्या मनुष्याचा शिरकावच होऊं शकत नाहीं. प्रत्यक्ष सरकारी खात्यांतून अंदाधुंदी आढळून येते तर रेल्वे सारख्या अर्ध्या खानगी स्वरूपाच्या कंपन्या आमच्या नेटीवांस बिलकूल थारा देणार नाहींत यांत नवल तें कोणतें!

---

राष्ट्रीय सभा निजली किंवा कांग्रेसवाली मंडळी अदृश्य झाली, किंवा लोकांच्या अंगीं खऱ्या चळवळीची शक्ती नाहीं असे अनेक नाना तऱ्हेचे कुतर्क आंग्लो-इंडियन पत्रकर्ते काढू लागले आहेत. सिव्हील सर्व्हीस परीक्षे विषयीं मि. फौलर स्टेट सेक्रेटरी यांनीं जो ठराव केला तो ठराव लोकमतानें हवेंत उडवून दिला जाईल अशी आंग्लो. इंडियनांस दहशत पडली होती व जणू काय ते तो चमत्कार पाहण्यास टपून बसले होते. परंतु सध्यां लोकाचा स्वस्थपणा व अचेतनस्थिती हीं पाहून त्यांस आमच्या लोकांचें पाणी कळून आल्या सारखें भासत आहे. निराशेच्या परमावधी मुळें लोक शुन्याकार व चैतन्यरहित झाले आहेत तथापि जो अपमानाचा अग्नि धुमसत आहे तो केव्हां पेट घेईल व त्याच्या आगीचे लोळ केव्हां बाहेर पडतील याचा नेमच आहे.

पुण्यास जंगी जाहिरसभा भरली व लोकांनीं आपल्या अर्जानें लोकमत दर्शविलें. पण त्या नंतर इतर ठिकाणीं म्हणण्या सारखा प्रयत्न झाला नाहीं ही शोचनीय स्थिती खरी! लवकरच सर्व देशभर सभांची धुमाकूळी माजेल तेव्हां स्टेट सेक्रेटरीस आपल्या अपक्रियेचें यथार्थज्ञान होईल. पार्लमेंटांत लढाई जिंकली तरच हिंदुस्थान सरकारची खबर घेतल्या सारखें होईल. नाहीं तर दातीं तृण धरून शरणागत आलेल्या मृतप्राय मनुष्याच्या प्रमाणें स्थिती आहे! इंग्लिश राज्याची बळकटी आमच्या कल्याणांत आहे आणि विलायतच्या तलवारीच्या जोरावर नाहीं ही गोष्ट नेहमी विसरल्या सारखी होत असते!

---

वऱ्हाडच्या जमेदार लोकांची सभा नामशेष झाली असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. ही वतनदार सभा अस्तित्वात आली तेव्हां तिचा इतक्या स्वल्प काळांत अस्त होईल असें आह्मांस वाटलें नव्हतें. वऱ्हाडचे वतनदार इतके नामर्द, शक्तिहिन, व अपात्र आहेत असें आह्मांस त्यांच्या आरूपायिके वरून बिलकूल समजलें नाहीं. एकत्र जमण्याची, संस्था चालविण्याची, व अनेक कार्यें सुखावह करण्याची अजब शक्ति वतनदारां पैकीं कोणामध्यें नाहीं, वतनदारांत कोणी सामर्थ्यवान पुढारी नाहीं, व लोक कार्याला तं एकंदरीनें योग्य नाहींत हो मोठा दुःखद स्थिती आहे. सार्वजनिक संस्थांची दशा अशीच वारंवार दिसून येते हें वाईट आहे. व्यक्तिमात्राच्या स्वप्नामध्यें जें कर्तृत्व शक्य नाहीं त कर्तृत्व समाजाच्या अंगीं अदृश्य रूपानें वसत असतें. फक्त हें कर्तृत्व लोकदृष्टीस आणण्यास योजक, मार्मिक, व धुरीण असा गृहस्थ उदयास आला पाहिजे. वतनदार सभेचें अस्तित्व चिरकाळ न राहण्यास मूळ कारण पुरेसा फंड नव्हता. कोणतीही संस्था असली तरी तिच्या कायमपणाचा पाया बहुत प्रकारें तिच्या धनबळावर रचलेला असतो. तो कच्चा पडला तर सर्व इमारत ढासळेल यांत आश्चर्य तें कोणतें!

मद्रासेकडील जमेदार सभेची हकीकत वाचतांना वऱ्हाडच्या वतनदार सभेची आठवण झाली व बहुत वाईट वाटलें. कित्येक उपयोगी सूचना व कल्पना उत्तरोत्तर त्या सभेमध्यें निघत आहेत त्याचें मनन केलें ह्मणजे आमचे जमेदार लोक एका ऐक्याभावामुळें त्यांत आंचवले हें फार वाईट होय. बंगालच्या व मद्रासच्या सभांतून एक उपयुक्त सूचना सरकारास झाली आहे आणि ती सरकारानें कबूल केली नाहीं तथापि सुधारणेची दिशा धरली ह्मणजे कालावधीनें यशश्री प्रयत्नावानास माळ घालतेच. त्या सभांचे सरकारपाशीं मागणें आहे कीं जुन्या गर्भश्रीमान पिढीजाद्या घराण्यास हिंदु धर्मशास्त्रांतील दायविभागाची पद्धत लागू करूं नये ह्मणजे वाटण्या बंद झाल्यानें संपत्ति वाढूंगत झाली नाहीं तथापि ती संचित असेल तेवढी कायम राहील, घराण्याचा मानपान चिरकाळ चालेल व जमीदार मंडळी सुखवस्तु व लोकमान्य राहतील. सूचना फार योग्य आहे आणि खरोखर सांप्रतच्या स्थितीला असा नियम अगोदर लागू केला पाहिजे. शिवाय वऱ्हाडच्या जमेदार लोकांचे पुष्कळ हक्क सरकारांतून जुने नवे करून ध्यावयाचे आहेत. अशा होणारी गोष्टी सभेच्या द्वारें साध्य आहेत पण दुर्दैव आडवें पडतें त्यामुळें सभाच चालत नाहीं!

---

हिंदुस्थानच्या खजिन्याला जी ओहटी लागली आहे ती मोठी चिंता उत्पन्न करणारी आहे. पैसा खर्चण्याचे दरवाजे सर्व खुले असून नवीन वाटा पाडण्यांत येत आहेत. खर्चाला कांहीं ताळ नाहीं. राष्ट्रीय संकट असून पैसा जमविण्याच्या युक्त्या फक्त नेटिवांच्या येलीच्या भोकें पाडण्याच्या आहेत. येवें येवें तळें सांचतें खरें पण असंख्या क्षुद्र पखवलानीं व तलावांनीं समुद्राच्या ओहटीला कांहीं प्रत्यवाय होईल अशी आशाच नको. आंग्लो-इंडियन लोकांचे पगार, लष्करी खर्च, हुंडणावळीची मनोती, इंडिया आफिसचा खर्च इत्यादि शतावधि प्रवाहांनीं या देशांतील संपत्ति वाहून चालली असतां लार्ड एलजिन व्हाइसराय यांनीं लोकांना पिळून काढण्याची कल्पना मोठी नामी योजिली आहे. सरकारांत ज्या लोकांच्या ठेवी आहेत त्यांच्यावर दरसाल चार टक्के व्याज देत असत तेथें त्या ठेवी ३॥ व्याजाच्या करण्याचा तडाखा चालविला आहे. सन १८४२-४३, १८५४-५५, १ मे १८६५, १८७९ या सालीं काढलेलीं कर्जें ३॥ व्याजानीं केलीं आणि आता नवी जाहिरात प्रसिद्ध झाली आहे कीं १८६५ सालच्या सर्वच ठेवीवर पुढील सालच्या फेब्रुवारीच्या १ ले तारखे पासून ३॥ व्याजाच्या दरा प्रमाणें व्याज आकारलें जाईल.

सरकारच्या इभ्रतीवर, विश्वासावर व चिरस्थायीपणावर लोकानीं ठेवी ठेविल्या पण सरकारनें त्या ठेवणाऱ्यास अखेर दगा दिला ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. सरकारनें वचनाला बट्टा आणिल्यामुळें लोकांच्या उपजीविकेच्या, कुटुंबांतील व्यवस्थेच्या, व इतर भविष्यकालीन निरवानिरवीच्या योजना सर्व फुकट गेल्या. चार व्याज मिळेल या पूर्ण भरंवशावर लोकांनीं ठेवी ठेविल्या. होत्या. खजिन्यांतील तूट भरून काढण्या साठीं चार व्याजाच्या ठेवी साडे तीन व्याजांत बदलण्याचा जो चरक सरकारनें चालू केला आहे त्यांत किती ठेववाले पिळले जातील याचा नेम नाहीं. लोक ठार बुडतात पण अशा उपायांनीं सरकारचा खजिना कालत्रयीं भरणार नाहीं. खर्चाचीं तोंडे मिटलीं नाहींत तर सांप्रतचा प्रश्न उलगडेल अशी तिळप्राय आशा नको!

---

या आठवड्यांत पार्लमेंटा समोर इंडिया बजेटाचा प्रश्न आला आहे. नामदार मि० स्मिथ व नामदार दादाभाई या उभयतांनीं या बजेटावर कडाक्यानें वादविवाद केला. सिव्हील व लष्करी खात्यांचे खर्च अनिवार आहेत, आंग्लो-- इंडियन कामगारांचे पगार भारी आहेत आणि लोकांच्या जवळ त्राण नाहीं तेव्हां पार्लमेंटानें बजेटात दुरुस्ती अवश्य केल्या पाहिजेत. या वादाच्या वेळीं संमती वयाच्या कायद्याचे जनक सर आनड्रयू स्कोबल यांनीं तुतारी वाजविली कीं इंडियांत दंगे चालले आहेत, राज्यकारभार धोक्यांत असून अति जबाबदरीचा झाला आहे. आणि लढायांचीं चिन्हें दिसतात त्या अर्थीं खर्च कमी करण्याची बिलकूल सोय नाहीं!

मि० फौलर स्टेट सेक्रेटरी यांनीं उडवाउडवीचा जबाब दिला परंतु अखेर कांहीं चौकशी करण्याचें अभिवचन दिलें.

खरोखर या देशाला आंग्लो इंडियनाचा राज्यकारभार नको. माजी फडणीस सर बारबर यांनीं या आंग्लो इंडियन राज्यकारभाराची सरकट बिनजबाबदारी व बादशाही पणा चांगला व्यक्त केला आहे. विलायतचे लार्ड लन्सडाऊन सारखे स्वार्थसाधु लोक इकडे राज्यशकट चालविण्यास येतात, ते आपापली पांच पांच वर्षांची कारकीर्द सुखोपभोगांत घालवितात आणि आपण गेल्या बरोबर इंडियाची दुनिया डुबली तरी त्यांस फिकीर असूं शकत नाहीं. हिंदुस्थान सरकारावरील स्टेट सेक्रेटरीचा पाताळयंत्री व लपंडावीचा रुत्ताधीशपणा हिंदुस्थान सरकारची पाठ थोपटण्याकडे खर्च केला जातो ह्मणजे बहुतेक प्रकार अहो रूपम् अहो ध्वनिः अशा परस्पर प्रशंसनेंतलाच असतो. इंग्लिश लोकांनीं राज्य करावें हीच आमच्या हिताची गोष्ट खरी परंतु सर्व राज्यसूत्रें वास्तविक पार्लमेंटाच्या हातीं ठेविलीं पाहिजेत. आणि नेटीव लोकांची खरी स्थिती पार्लमेंटास कळण्यास तसे मार्ग केले पाहिजेत. आंग्लो इंडियनांचा शहाणा कारभार विघ्नपरंपरा कशी संचित करितो हें राष्ट्रीय सभेनें स्पष्ट केलें आणि तो बदलल्या शिवाय राज्य नीट चालणार नाहीं! पार्लमेंटांत इंडियन पक्ष सबळ व विजयी झाल्या खेरीज ही गोष्ट साध्य नाहीं ह्मणूनच नामदार दादाभाई यांनीं आपली विजयपताका तेथें महत्प्रयासानें आरोपित केली आहे. परमेश्वर त्यांस यश देवो!

---

थोर गृहस्थाला कोणी चैन पडूं देत नाहीं वऱ्हाडांतील नांव लौकिकवान, अनुभवी व कार्यदक्ष मे० महमद मुबारकअली एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांना पेनशन घेऊन थोडे महिने झाले तोंच माळव्यांतील जावरा संस्थानांत चीफ जज्जाचे जागीं त्यांस विचारणा झाली. ज्यांचें आयुष्य कामकाजांत व सार्वजनिक गोष्टींत जातें त्यांस वृद्धापकाळीं अगदीं स्वस्थपणा व निरुद्योगीपणा आवडत नाहीं. मि मुबारकअली यांची जावरा संस्थानांत त्यांच्या गुणाबद्दल चांगली चहा व्हावी असें आह्मी इच्छितों.

जावरा संस्थानांत आमच्या प्रांतांतील जुन असिस्टंट कमिशनर खान बहादूर यार महमद खान हेही मोठे कामदार आहेत. हे १८८७ साला पूर्वी उमरावती व इलिचपूर येथें होते. हे त्या संस्थानांत चांगले श्रीमंत, हुशार व सरदारी बाण्यानें असतात.

---

यांत्रिक कलेचा व विद्युत्शक्तीचा प्रभाव किती अगम्य व विलक्षण आहे याची कल्पना देखील पूर्वीच्या विद्वानास नसेल! एका शतका पूर्वीचा कोणी गृहस्थ अकस्मात् निद्रिस्ता प्रमाणें पुन्हा जागा होऊन आसपास पाहूं लागेल तर त्याला या नव्या सृष्टीच्या विचित्रपणा विषयीं व अद्भूतपणाविषयीं कांहीं कल्पना येईल पूर्वीची वाहनें कोणीकडे आणि हल्लींचे वन्हिरथ कोणीकडे! तारायंत्रें काय, पोस्टआफिसें काय, विद्या, कारखाने, नळांचें पाणी, इमारतकामें वगैरे सर्व त्यांस विचित्र व अदृष्टपूर्व वाटतील. ही कल्पना आपणास इतिहासावरूनही चांगली बसवितां येईल. आणि खरोखर त्या विचाराच्या दृष्टीनें सर्वत्र नवीनपणा व नवल वाटेल आणि आपल्या नित्याच्या परिपाठांतल्या गोष्टीविषयीं देखील विस्मय व आल्हाद वाटेल. जग नवें जुनें होतच आहे परंतु त्याच्या सांखळ्या एका पिढीपासून दुसऱ्या पिढीशीं अदृश्य, अकल्पित व घट्ट बोळवलेल्या दुव्यांनीं जोडलेल्या आहेत. हे दुवे उखलून पाहाल त्यास ईश्वरी अगाध लिलेची व सृष्टीच्या अजरामरतेची थोडी बहुत खुण पटेल.

प्राचीन व अर्वाचीन मानवी गोष्टींत यांत्रिककला व विद्युतशक्ती यांनीं कांहीं अपूर्व चमत्कार करून ठेविले आहेत. हा मर्त्य लोक खरा परंतु एडिसन नांवाच्या कल्पकानें मनुष्यसृष्टी कानाडोळ्या संबंधानें अमर्त्य व अमर करण्याचा घाट घातला आहे. ध्वनिग्राहक विद्युद्यंत्रानें त्याला मनुष्याचें बोलणें राखून ठेवितां येतें ह्मणजे वाटेल त्यावेळीं वाटेल त्या मनुष्याचे मागील बोल पुन्हा उमटावयास ये-

तोंत. त्याच शोधकाच्या दुसऱ्या यंत्रानें मनुष्याचें चलनवलन सभोंवतालच्या उपाधिसह हुबेहुब प्रतिबिम्बानें चित्ररूपांत दाखवितां येतें. सारांश, या दोन्ही यंत्राच्या साह्यानें मनुष्याचे मेरे पर्यंतचें बोलणें व व्यापार जशाच्या तसे नाटकरूपानें तेच दाखवितां येतील. सृष्टामध्यें काय आहे आणि काय नाहीं हें ज्ञान मनुष्याच्या आटोक्या बाहेरचें आहे तथापि त्यांतही योलकस्तत्र दुर्लभः हें कांही खोटें नाहीं.

The Berar Samachar

MONDAY AUGUST, 20, 1894

## THE PRESENT FISCAL CRISIS
No 11

We have shown in our last issue that the delusion of the British statesmen in whose hands have been placed the destinies of a vast empire-long a prey to the aggrandisements of unsatiated conquerors. The illusion will never be realised and the inclusion of cotton duties however unpalatable to a certain interest will be a matter of extreme necessity to which they must resort. This time we propose discussing the merits of such an inevitable inclusion on the principles of Free Trade.

Compelled as they will be by the irresistible force of circumstances to allow the Indian Government to impose a duty on cotton imports, the Ministers will try to conciliate the Lancashire interest by insisting on the levy of a countevailing duty on the products of the Indian Mills! But will such a step produce the desired effect? The industries of India are struggling hard and fast with foreign competition. They are in fact in their infancy and they will be simply crippled by such an unwise demand not only unjust but quite detrimental to their interest made simply to benefit the importers of a particular place. It will be favoring one class to enrich itself at the expense of another. It will be an unmodified State Socialism. The traders of Lancashire appear to be altogether deficient in common sense. This enquiry can only be answered in one way. Regarding themselves as masters of the situation, they laid down what they considered prohibitive terms as the price of their acceptance of the principle of allowing India the same freedom in her fiscal policy as the colonies. When it was found that a majority of the members of the India Council were disposed to regard this as a way out of an awkward dilemma the Lancashire merchants speedily found occasion to pull down the flag of truce and the Committee of Manchester Chamber of Commerce, with the approval of members, forwarded an intimation to the Secretary of State that the Chamber would continue its opposition to import duties on cotton even though a countervailing duty be levied on articles of Indian manufacture." In any case therefore a Cabinet which allows import duties to be levied on cotton goods is doomed to risk the patronage of Lancashire members, and this being so, the law of self-preservation should no longer be regarded as a reason for taxing the products of the Indian Mills. Mr. Cotton the Chairman of the Bombay Chamber of Commerce, and several other gentlemen have proved to a demonstration that the coarse cotton manufactures of India can not interfere with the finer counts exported from Lancashire. The proposed import duty would therefore not be a protective one and the lovers of Free Trade ought to know that the Cobden principles are far more set at naught by a partail import duty than they would be if the cotton manufactures of Lancashire were treated on the same terms as the woolspinners, the same in fact as all other traders who export from England to India Even the most astounding statements of Lord Kimberley admit that "when an emergency arises in India we must then have regard in the first place to the interests and needs of India herself". This statement however actuated and whatever it may mean can only be interpreted in one unmistakable language. The emergency of which Lord Kimberley appears to have no idea is sure to come when the time for preparing the next year's Budget comes. It is of the extreme importance fort the people to let the Government of India know that the interests and needs of the Empire are such as to render it extremely unwise on the part of the Cabinet to permit for the vain hope of party advantage, the mill industry of India to be hampered and injured by an excise duty.

The whole native pres has expressed its utter discoutent for the exclusion of cotton. The idea of a countervailing duty absurd as it is will be most vehemently, opposed as is natural enough. In an age of covert and palpable disdain ot the ruled desprived even of means of self—protection and harmless enjoyments such impositions must be accepted but all security, which wise rulers propose to themselves, so far as confidence is security, is violently shaken.

---

Colonel Lane is the only veteran officer at the head of the police department that commands admiration for his straightforward, upright, and proverbially just administration. He is as it were an angelic custodian of all police interests. His proposals to strengthen the police force with men and money are good but they touch only the lower service. The following are the measures he advocates to remedy the present contingencies.

"In the face of financial necessities, full relief must be postponed, but I have pointed out three ways in which the pressure on the regular police can be to some extent relieved:—

1st.—By linking the village police closer to the regular police; at present they are entirely separate from the police. The steps I advocate in this direction at first are:—

That all correspondence about entertainment, dismissial, &c., of village policemen should go up to the District Magistrate through the District Superintendent of Police, and not through Tahisldars.

That the village police be paid through the Station-house officer, and not through the Tahisldar.

That as in the North-West Provinces detachments of village police be made available to assist in preserving order at fairs under the control of the superior police officer in charge of police arrangements, thus relieving the regular Police.

*2nd*—The establishment of road Police, a body intermediate between the regular and village police, located in chowkeys at regular distances along the main roads, and charged to the jaglia cess fund. The duty of protecting these roads is now performed by drafts from police reserves, which are not strong enough for the eoough for the purpose.

*3rd*.—Authority to be given to District Magistrates to charge to Banjara tandas of criminal character the cost of constables deputed to watch them, thus allowing constables deputed for this purpose to be replaced in the reserves. Not less than 30 constables are now taken away for this duty, and are not replaced."

We are however hopeful that Colonel Lane will lay down a minute for future guidance in regard to higher services. He must not have been a stranger to the manifold defects and short-comings of the superior service because he is so acute, keen, penetrating in his perception. Perhaps the remedy may be beyond his control but his opinion, if he notes down any. will be a helpful machine to make Government open the service to more competent and legible persons. The Educational department has manufactured a good stock of able, learned and energetic men available for Government serviee but no where as in Berar is the stock so ignored as to continue treading in the old patns of favoritism and undue influences.

---

## वऱ्हाड.

रा. रा. त्रिंबक गणेश परांजपे यांचो कायमचे एक्स्ट्रा असि. कमिशनरचे जागीं नेमणूक झाल्या कारणानें त्यांच्या १७५ पगाराच्या तहशीलदारीवर रा. रा. विठ्ठल नारायण काळीकर यांस बढती देऊन शेवटील १५० पगाराच्या तहशीलदारीवर रा. रा. रघुपत मोहनराव यांस नेमल्याचें कळतें.

रा. रा. गोविंदराव अप्पा एक्स्ट्रा असि. कमिशनर यांनीं तीन महिन्यांची हक्काची रजा घेतल्यामुळें त्यांचे जागीं उमरावतीस रा. रा. त्रिम्बक गणेश परांजपे यांस मोर्शीहून बदलणार आहेत. व त्यांचे मोर्शीचे जागीं रा. रा. नारायण पांडुरंग यांस यवतमाळाहून बदलणार असें कळतें.

मि. प्राईस एक्स्ट्रा असि. कमिशनर, वाशिम यांस अकोल्यास बदलल्याअन्वयें त्यांनीं परवां येथें येऊन कामाचा चार्ज घेतला.

कर्नल मेकेंझी साहेब हे रेसिडेंटाच्या जागीं जात आहेत ह्मणून त्याच्या अभिनंदनार्थ 'वऱ्हाड सार्वजनिक सभा' त्यांस ता. २३ रोजीं उमरावतीस टौलेजंग पानसुपारी देत आहे.

या आठवड्यांचे अखेरीस कर्नल स्पानस्की साहेब कमिशनरचे कामाचा चार्ज घेतील आणि मि. गाडविन आस्टिन असि. कमिशनर हे बुलढाण्यास डेपुटी कमिशनरचे कामावर जातील.

रा. रा. बळवंत नरसिंह मुधोळकर डेपुटी इनस्पेक्टर, बुल्ढाणा यास प्रकृतीच्या अशक्ततेमुळें पेनशन घेण्यास परवानगी मिळाली. राजश्री दादासाहेब मुधोळकर यांचें घराणें बाळबोध असून त्यांची वृत्ति आनंदी व मनमिळाऊ आहे. त्यांचा वृद्धापकाळ आपल्या कुटुम्बीयांचें अभिष्ट करण्यांत व लोकोपयोगी कार्यांत जावो आणि त्यांच्याउत्तम चाकरीची पेनशन त्यांस दीर्घकाल लाभो!

वरील रिकाम्या जागीं १५० पगारावर रा. रा. निळकंठ नारायण भट डेपुटी इनस्पेक्टर, यवतमाळ यांस बढतीवर बुलढाण्यास बदललें. आणि यवतमाळास रा. रा. वामन रघुनाथ जोशी प्रिन्सिपाल, ट्रेनिंग कालेज यांस डेपुटी इनस्पेक्टरच्या जागीं नेमण्यांत आलें आहे. या दोन्ही नेमणुका रावसाहेब पटवर्धन यांनीं चांगल्या केल्या असें सर्वजण ह्मणतात हें लिहिण्यास आनंद वाटतो.

डाक्टर गोविंद व्यंकाजी खोत यांनीं गेल्या १२वे तारखेस आकोल्यास इंग्रजींत सरस व्याख्यान दिलें श्रोतृसमाज चांगला जमला होता. व्याख्यान त्यांच्या धंद्यांतल्या रोगःविषयक गोष्टी संबंधोंने झालें. व्याख्यात्यांची अकोलेकर मंडळी अत्यंत ऋणी आहे.

अकोटचे तहशीलदार मि. सुब्रायलू नायडू यांज बरोबर मोहरमच्या वेळीं बराणुद्दीन नांवाच्या इसमानें गैरजाबता बोलाचाली केली व त्यास त्रेषास आणिलें ह्मणून बुराणुद्दीन यांस जिल्हे माजिस्ट्रेट मि. ड्रेअर यांनीं चौदा दिवसाची कैद व पंचवीस रुपये दंड केला. मि. ड्रेअर हे मुख्य न्यायाधीश असल्यामुळे सर्व लोकांस दाद मागतांना आनंद वाटतो.

आज पासून अकोल्यास सेशन भरणार आहे.

येथील चीफ कानस्टेबल रा. रा. राजय्या यांची खामगांवास बदली होऊन खामगांवचे एक नवीन गृहस्थ रा. रा. देविदास नारायण यांस येथें चीफ का० नेमिलें.

---

### जाहिरात

म्युनिसिपल नियमांतील नियम १२ प्रमाणें जाहीर करण्यांत येते कीं वार्ड नंबर २ चे निवडलेले मेंबर मि. सैफुद्दीनखान यांनीं राजिनामा दिल्यामुळें खालीं झालेली मेंबरची जागा भरण्या करितां तारीख १२ माहे सपटेंबर सन १८९४ इसवी रोजी सकाळचे ७ वाजे पासून सायंकाळचे ५ वाजे पर्यंत ग्रेन मार्केट आफिसांत निवडणूक होणार आहे. नियम १३ प्रमाणें उमेदवारांच्या नांवचे कागद मि० वि. ना. दांडेकर हे ता. ४ सप्टेंबरचे सायंकाळचे आंत घेतील.

ता० अकोला
१८ आगष्ट १८९४

D. G. Patvardhan
Secretary
M. C. Akola

### NOTICE

Under ruie 12 of the Municipal rules it is hereby published for general information that elections to fill up the vacancy caused by resignation of Mr. Saifuddinkhan an elected member for ward II shall take place from 7 A. M. to 5 P. M. on the 12th. September 1894 at the Grain Market office.

The nomination papers will be received by Mr. V. N. Dandekar before the evening of the 4th. September 1894.

Dated Akola
18th. August
1894

D. G. Patvardhan
Secretary
Municipal Committee
Akola

## वर्तमानसार.

एकदा एक गाढव भांगेच्या झाडापाशीं गेलें. भांगेचा वास घेतांच तें तेथून मागें परतणार तों तें झाड रागावून त्यास ह्मणालें, "अरे माझें सेवन देवाधिदेव महादेव सुद्धां करतात, मग तुलाच माझा इतका कां बरें तिटकारा असावा?. गाढव ह्मणालें "बाबारे, तुझ्या सेवनानें देवसुद्धां पशुगति बनतात; मग मी सेवन केल्यानें आणखी कोणत्या योग्यतेला जाईन बरें?"

सोलापूर येथील खाटकांनीं तेथील गिरणीचे एजन्ट शेट वीरचंद दीपचंद यांस अशी विनंति केली आहे कीं आह्माला दुसरा धंदा मिळाल्यास आह्मी खाटकाचा धंदा सोडण्यास तयार आहों. ह्या लोकांच्या उपजीविकेसाठीं तेथें एक रंगाचा कारखाना काढण्याची तजवीज चालू आहे. प्रयत्न स्तुत्य आहे. न्या. सु.

ऐरिश शेतकऱ्यांच्या जमिनी ज्या बडे लोकांकडे गेल्या होत्या त्या ज्यांच्या त्यांस द्याव्या अशा विषयीं पार्लमेंटमध्यें नुकताच एक कायदा करण्यांत आला. फार चांगलें झालें.

एका धर्मार्थ दवाखान्यांत एका मनुष्याला मेला कीं जीवंत आहे हें पाहण्यासाठीं खाटेवर घालून नेलें. त्या मनुष्या बरोबर त्याची बायकोही होती. डाक्टर साहेबांनीं त्या मनुष्याकडे लक्ष पूर्वक अवलोकन करून तो मेला खरा असें ठरविलें. इतक्यांत त्या मनुष्यानें हलकेंच डोकें वर ऊचलुन मी जीवंत आहे असें ह्मटलें! त्याला त्याचे जवळ बसलेली त्याची बायको ह्मणते 'चूप रहा' डाक्टरा पेक्षां तुमची परीक्षा जास्त आहे! !

मूर्खपणा तो हाच! बारामती येथें एका विश्वयोषितेच्या पोटांत दुखूं लागलें ह्मणून तिनें औषधोपचार चालविले. त्यांस तेथील सितारामपंत नांवाच्या कोर्टांतील उमेदवारानें तिचे पोटास भांडें लाविलें. त्यानें भांड्यास कांहीं वेळानें ओढ लागून राहिली. सदर औरतीनें त्यांस तें भांडें काढण्यास सांगितलें तेव्हां त्यानें आणखी थोडा वेळ दम धरण्यास सांगून आपण तोंड चुकविलें. नंतर कांहीं वेळानें तिचें पोट आंतड्यासह भांड्यांत गुंतलें आणि तिची मरणाची वेळ आली. पुढें येथील डाक्टर व नाझर वगैरे मंडळी येऊन त्यांनीं तें भांडें महत्प्रयासानें कातरून काढिलें. बाई वाचली खरी पण आजारी मात्र झाली. ज्याला जो विषय ठाऊक नाहीं त्यानें तो करणें ह्मणजे मूर्ख ह्मणतात व तेंच हें कृत्य! !

दी० बं०

बंगाल्यांत सिराज गंज येथें एक मुसलमान दुसऱ्या एका मुसलमानी स्त्रीच्या नादीं लागला होता. त्या उभयतांत फार प्रेम जडलें होतें. एके दिवशीं रात्रीं प्रियाला बिबीची आठवण झाली, व खिडकींतून वर जाऊन नवराबायको निजली होती त्यांत नवऱ्याला स्त्री समजून उठवूं लागला. नवरा जागा झाल्यामुळें उभयतांत मारामारी होऊन मित्र्यानें त्या दोघांसही ठार मारलें. हल्लीं त्याच्यावर खटला चालू आहे. पाप फार दिवस झाकत नाहीं ह्यांतील हें एक उदाहरण आहे. हें लक्षांत घेऊन होईल तितकें पापाचरणापासून दूर रहाण्याचा प्रत्यकानें प्रयत्न करावा इतकेंच आमचें सांगणें आहे.

कलकत्यास सात वर्षांच्या मुलास चोरीच्या आरोपावरून पांच वर्षांची शिक्षा झाली असें कळतें. खरें असल्यास हें फार चमत्कारिक आहे.

याशन येथें पेचांत सांपडलेल्या चिनी सैन्यावर जपानी सैन्यानें २९ वे तारखेस हल्ला केला. चिनी लोक ३००० होते. पांच तासपर्यंत लढाई झाल्यावर चिनी लोकांचा पराभव होऊन ५०० लोक मेले, जपानी लोकांनीं ४ तोफा व कांहीं लढाईचें साहित्य हस्तगत करून घेतलें. जपानी लोकांकडील ८० माणसें मेलीं.

जपानी लष्करानें चिनी लोकांस हरवून पाशान नांवाचा जो किल्याचा प्रदेश मिळविला होता, त्यांला ते आतां मजबूत करूं लागले आहेत. तो एक मोठा महत्वाचा प्रदेश त्यांना मिळाला आहे. जपानी लोक मोठ्या जोरानें लढाई करण्याच्या आवेशात आले आहेत.

जपानांतील कापड चीन देशांत जाऊं लागलें होतें; परंतु आतां लढाई जुंपल्यामुळें तें बंद होऊन, पुन्हा चीनांत हिंदुस्थानांतील कापड जाऊं लागलें आहे.

रशियांत कालऱ्याचा जोर असून, त्याचा उगम इंग्लंडमध्येंही झाला असल्याचें तारेवरून कळतें.

काश्मीर व पंजाबांतील जलप्रलय अद्याप थांबत नसून, दिल्ली जवळ यमुनेसही नुकाच मोठा पूर येऊन, कित्येक गांवांनां नुकसान पोंचलें अशी तारे मार्फत बातमी आली आहे.

एलूएल. बी. आणि दुसरी बी० ए० या परीक्षा घेण्याच्या ठरलेल्या दिवसांत फरक केला आहे. एलूएल. बी. ची परीक्षा ता.२६ नोवेंबर सोमवार रोजीं सुरू होईल व जुन्या पद्धतीची दुसरी बी. ए. ची परीक्षा ता. २९ नोवेंबर रोजीं सुरू होईल.

विलायती खोट्या व नकली रेशमामुळें, ब्रह्मदेशांतील २५ हजार रेशीमवाले उपाशी मरत आहेत. फारच दुःखाची गोष्ट.

कालऱ्याचा जोर पुष्कळ ठिकाणी दिसूं लागला आहे. उत्तर हिंदुस्थांत लखनौ आग्रा, आलाहाबाद, कानपूर वगैरे कित्येक ठिकाणीं असून, मध्यप्रांत व दक्षिणेंतही थोडा थोडा अढळूं लागला आहे. स०

सिंध प्रांतांत महापुरानें फारच प्रलय केला आहे. कांहीं ठिकाणची वस्तीही उठून जात आहे.

नबाब व्हिकार उलउमराव हे हैदराबादच्या दिवाणगिरीवर कायम झाले व त्यांस सर्व अधिकार देण्यांत आला.

काश्मीर दरबाराकडून इंडिया सरकाराचे पोस्टाबद्दलचे बोलणे मान्य केलें गेलें. पंजाबच्या पोस्टखात्याचा हा एक भाग होईल. व त्याप्रमाणें एकंदर ६० पोस्टहापिसें नवीन होऊन मनीआरडरी, सेव्हिंगब्यांक, व्ह्याल्यु पेबल्स वगैरे घेणें हें पोस्टखातें करील.

'मुसलमानाना एकही गाय न विकण्याचा हिंदूनीं निश्चय न केल्यास मी हिंदुस्थान सोडून सिलोनांत जाऊन राहण्याचा ठराव केला आहे. अशा मजकुराचीं जगन्नाथाच्या नांवाखालीं मोडणारीं पत्रें फत्तेपुराकडे पसरलीं आहेत.

टोळधाड— सातारा जिल्ह्यांत तासगांव तालुक्यांत टोळधाड आली असून तिनें शेतांधान्याचे कोंब खाऊन टाकले आहेत असें समजतें. प्रारब्ध ! पु. वै.

कृष्णशृंगः— मद्रास इलरूपांतील एका खेड्यामध्यें साळा वर्षांच्या वयाच्या एका मुलाचे डोकींत शिंगें फुटून तीं वाढत चाललीं होतीं! तीं नुकतीच कापलीं

यंदा बरसातीमुळें हैद्राबादेस मोहरम नीट झाला नाहीं ह्मणून फिरून करणार अशी बोलवा आहे.

मद्रासेस जी पुढील कांग्रेस भरावयाची आहे त्याच्या तयारीस तेथील मंडळीनें सुरवात केली, हें पाहून आम्हांस संतोष होतो. क०

डायना माइटची प्रचंड शक्ती— ऱ्होड बेटावर थोड्यादिवसां पूर्वीं २० फूट खोलीचे २७ सुरुंग एका मोठ्या खडकांत काढून त्यांत १००० पौंड डायना माइट भरला, आणि नंतर ते सुरूंग उडवून दिला. त्यामुळें १०००० टण दगड फुटून मोकळा झाला. ह्या दगडांत कित्येक फत्तर २५ टण वजनाचे आहेत. गु० सू०

हिंदुस्थानच्या कराराच्या कायद्यात सुधारणा करण्याचा विचार चालूं आहे.

पिनल कोडांत सुधारणा करण्यास स्टेट सेक्रेटरीची सल्ला मिळाली. आतां सुधारणा करण्याचें काम लवकरच सुरू होईल.

अन्न व चारा यांच्या महागाईच्या दरांत फेरफार करण्याचा विचार करण्याकरतां अलाहाबादेस लश्करी आफीसरांची एक कमेटी भरणार आहे.

जपानांत असणाऱ्या चिनी लोकांचें व चिनात असणाऱ्या जपानी लोकांचें संरक्षण करण्याचें युनायटेड स्टेट सरकारानें पतकरलें आहे.

स्पेनचें एक व जर्मनीचीं तीन अशा ४ लढाऊ गलबतांस कोरिया येथें जाण्याचा हुकूप झाला आहे.

याशन येथील वतलेली छावणी जपानी लोक मजबूत करीत आहेत.

क्यांटन नदी वरील किल्यावर चिनी गव्हर्नर जनरल कंग टंगू यांणीं नवे ५,००० लोक भरले आहेत.

अलहाबादेस पटाकीनें रोज बहुधा २०० माणसें लागतात व बहुत्येक मर तात.

मध्यप्रांतांतल्या दुष्काळच्या कामावर अजून १०,९०० माणसें आहेत.

औंधप्रांतांत चहूंकडे कालरा सुरू आहे.

हिंदुस्थानांतल्या सर्व रेलवेच्या गाड्यांच्या वेळांत ता. १ आक्टोबर पासून फेरफार होणार आहे.

अतिवृष्टीनें जलालाबादचा कांहीं भाग वाहून गेला व अतिवृष्टी अजून ही चालुंच असल्यामुळें जास्त नुकसान होण्याचें भय आहे.

पामीरच्या हद्दींत मिठाची एक मोठी खाण सांपडली आहे.

वाकटें पामीर व हुंजा यांच्या दरम्यान किलिकच्या उत्तरेस इंग्रज लोक दोन ठिकाणीं आपलीं ठाणीं स्थापन करीत आहेत व त्या कामावर काश्मिरी व हिंदू लोक नेमले आहेत कुंजूट व काश्वर आणि पामीर यांच्या दरम्यान हीं नवीं दोन ठाणी फार महत्वाचीं होणार आहेत.

विलायतची डाकेची आगबोट माल्टा यांत आग लागली होती पण पंप लाऊन पाण्याचा मारा करून विझविली. आग व पाणी यांच्या योगानें आगबोटींवरील पुष्कळ सामानाची खराबी झाली असें रंगूनचीं तार सांगते.

गोव्याचे गव्हरनर सीनोर डां अब्राद हे सोमवारीं मुंबईस आले. प्रकृतीच्या कारणानें ते परत पोर्टुगाल येथें गेले. ठा. अ.

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्या साठीं सरटीफिकीट मिळावें म्हणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहीरांत.

सन १८९० चा आक्ट ७ कलम ६ प्रमाणें.

दिवाणी क्लास १९ मिसल नंबर $\frac{१४}{१८९४}$

विद्यमान सिव्हिल जज्ज साहेब जिल्हा अकोला यांचे कोर्टांत.

नांव झिंगराई

मर्द महादाजी गांवंडे कुणबी

राहणार टिटव तालुके अकोला

जिल्हा अकोला यांस मयत

महादाजी बापाचें नांव देवाजी

राहणार टिटव तालुके अकोला जिल्हा अकोला यांचें कर्ज वसूल करीतां येण्या साठीं सरटीफिकीट मिळावें म्हणून सदरहू अर्जदार याणें अर्ज केला आहे त्याज करितां सदरहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तीचे कांहीं भागावर आपला हक्क आहे म्हणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यांनीं तारीख २९ माहे अगष्ट सन १८९४ इसवी रोजी सदरहू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपापले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख १३ माहे आगष्ट सन १८९४इ०

V. N. Dandekar.

सिव्हिल जयडज.


घड्याळ.

किं. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचे ( ह्मणजे चक्रांचें खालीं वर हिरे बसाविलेले आहेत ) चावी देण्यास मागरा, कांटे रासकोपप्रमाणें, आंकडे ठळक बिलोरी काचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेले. या वर आमचें नांव आहे. हें खिश्यांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।१२ वर्षें दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. सचित्र क्याटलाग मागवा. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—

गोविंद महादेव पोळ

वाच मेकर

नाशीक


☞ हें पत्र आकोलें येथें कै० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर ,, ७ ,, ०८
किरकोळ अंकास ................ ०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ....०१

Six monthly ......... 3 ,, 8 as
Single copy ................ 4 as.

Advertisement
Below 10 lines...2 Rs.
per line over 10...4 as.
Repitition per line 3 as.

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXVIII AKOLA MONDAY 27 AUGUST 1894 NO. 34

वर्ष २८ आकोला सोमवार तारीख २७ माह आगष्ट सन १८९४ इ० अंक ३४

### ह्या राजश्रींनें केव्हां तरी पळ काढला असावा.

एका गृहस्थास त्याच्या धर्म वेडामुळें एका जुलमी सरकारनें कारागृह दाखविला. तो ज्यांत कोंडला होता त्याच्या मजबूत दगडी भिंती पाहून त्याच्या मनाची खात्री झाली कीं आतां आपलें राहिलेलें आयुष्य ह्या एकांत व भयाण कारागृहांत घालविलें पाहिजे. जरी त्याला आतां पुढची गत चांगली नाहीं असें भासत होतें तरी त्याला दुःखांत ख इतकेंच वाटत होतें कीं मला जुलमामुळें बळी व्हावें लागलें परंतु सद्वर्तनाचें उल्लंघन करण्यामुळें कांहीं नाहीं. जर त्याच्या स्वाधीनची गोष्ट असती तर ह्या संकटांतून तो सहज पार पडला असता.

असें असून त्या बिचाऱ्यास सतत सोळा वर्षें हाल काढीत रहावें लागलें. हीं वर्षें संपतात तों त्याच्या मनांत आलें कीं ह्या भिंतीवर पुढें आलेल्या दगडाच्या आधारानें वर चढावें व त्यानें खिडकीच्या वरून काय दिसतें ह्मणून वर डोकें केलें. आणि असें केल्यामुळें त्याला वाटलें कीं पुढें लोखंडाचे गज आहेत ते काढून टाकतां येतील व त्या चौकटीची आगळही लाविली नव्हती. त्याच्या मनांत घोळूं लागलें कीं, काय मी पळ कां न काढावा? त्यानें खिडकी तर उघडली आणि सहा फूट उडी जमिनीवर मारली आणि त्या प्रदेशास शेवटचा राम राम ठोकला. जर त्यानें त्याच्या ठाम झालेल्या विचारास एकीकडे ठेवून विचाराची दोरी जर सैल सोडली असती तर ह्या स्थळीं इतके दिवस कुंथत रहावें लागलें नसतें.

ह्या स्वाधर्मार्थ प्राण अर्पण करणाऱ्या या बिचाऱ्याची दैवघटित गोष्ट साधक व बाधक आहे. त्याच्या मनाची धांव बंद केल्यामुळें साधक; त्याला ज्या कारणास्तव बंदींत टाकावयाचा होता तें नसल्यामुळें बाधक.

ही गोष्ट पत्र रूपानें जी सर्वांस आवडते त्या प्रमाणें खालीं थोडक्यांत व साध्या शब्दांत सांगतो. एक लेखक बाई ह्मणते कीं, आज सोळा वर्षें झालीं, पित्त क्षोभानें व अशक्तपणामुळें फारच गांजून गेले आहे. नेहमीं थकून जाऊन अगदीं हलक होऊन जाई. माझी अन्नावरची वासना उडाली, पुढें आणलेले ताटास हात लावीन तर शपथ. कित्येक दिवस माझ्यानें एक घास देखील खाववत नसे, कधीं कधीं मला मळमळ सुटे. पोटाच नगारा होई आणि तोंडावाटें मोठा घट्ट बेडका येई.

मला फारच त्रास दायक खोकला होऊन व बरगड्यांत फारच वेदना होत व दम बरोबर छाटत नसे. मी फारच हलक झाले आणि दुकानांत आंत बाहेर करण्य माझा तकवा अगदीं निघून गेला. सन १८९१ च्या डिसेंबरांत माझ्या एका गिऱ्हाईकानें मदर सिजेलचा क्युरेटीव सीरपा ( माता शिजेलचा रोगहारक पाक ) बद्दल बरेच गुणानुवाद गाईल्यामुळें मीं तें औषध घेण्यास सुरू केलें. मी थोडे थेंब घेतल्या बरोबर मला बरेंच समाधान वाटलें आणि पुढें पंधरा दिवस औषध घेतलें नाहीं तरी मला बरें वाटत होतें. मला असा धीर आला ह्मणून मी अगदीं बरी होई तों पर्यंत ह्या औषधाचा उपयोग केला. आमचे चिरंजीव आरथरास एक वर्ष सतत जेवल्यावर जड झाल्या सारखें व वेदना होत होत्या आणि पोटाची दामटी होऊन खळगा पडल्या सारखें वाटे. त्याला हें औषध घेण्याची मी गळ घातली आणि त्याचा शेवट ह्मणाल तर माझ्या सारखाच झाला. मला पक्कें माहीत आहे कीं ह्या प्रदेशांतल्या बऱ्याच मंडळींनें दुसरे नाना उपाय करून थकले व जेव्हां ह्या शिरपाचा ( पाकाचा ) उपयोग केला तेव्हां तात्काळ गूण आला. ह्या औषवाचा ( ह्मणजे माता सिजेलच्या सिरपाचा ) मला रामबाण गुण आला तो इतर पिडीतास ह्यामुळें यावा असें आपणास वाटत असेल तर हें पत्र आपण बेलाशक छापावें.

मी तुमची
( सही ) ( मिसीस ) एम वार्ड
१५४ इकसटन रोड
शडफर्ड. नोटिंगहाम

ता० १ ली माहे एप्रिल सन १८९२

मोसिस वार्ड बाई साहेब ह्या त्रास दायक व भयंकर रोगा पासून बऱ्या झाल्या ह्मणून आह्मी तीस अभिनंदन करतो. आपल्या आयुष्यांत सोळा वर्षांचा काळ सतत शारीरीक व मानसिक वेदनेंत घालवावा ह्मणजे फारच खराब समजावयाचें. कुबेराचे संपत्ती होणें फारच थोड्याच्या ललाटीं लिहिलेलें असतें. परंतु सुदृढता ही सूर्यप्रकाशा सारखी सर्व जगभर जिकडे तिकडे सारखी पसरते तद्वत ही पसरली पाहिजे. ही कमी रखावी हें ज्याला अवगत आहे तर तो त्याची काळजी घेईल व तो दूर झाल्यास आपल्या स्वाधीन करून देईल.

ह्या बाईचा रोग पचनीय पिंडाचा ह्मणजे अग्निमांद्य व अजीर्णाचा होता. जो रोग फारच धोक्याचा व दुःख देणारा आहे कारण कीं ह्या रोगाचा पगडा इतका बसतो कीं शरिरांतलीं सर्व अंगें ह्याच्या बळी पडतात व रक्ताभिसरणामुळें ह्या रोगाचें वीष सर्व शरिरांत पसरतें. ह्या रोगाचें मुख्य कारण निरनिराळ्या नांवानें होणारे परिणाम व चिन्हें हीं होत. ती जें औषध सांगते त्याच्या गुणाची ज्यास चांगली माहिती झाली आहे त्यास नवल वाटण्यास नको. मोठ मोठाले असाध्य रोग ह्या औषधास शरण येतात.

आमचे वीर जे आपल्या गुदेंव कसा तरी वेळ काढात होते त्यास बाहेर निघून जाण्याची गुरु किल्ली माहित नव्हती.

जर ह्या ओळी अवलोकन करणारे दुःखाचे गुलाम झाले असतील तर त्यास तसें राहण्यास कांहीं कारण दिसत नाहीं.

तिच्या सचोटीच्या आटोक्यांत लिहिलेल्या पत्रा वरून रोगाचें शमन कसें होईल ह्याचा रस्ता दाखवून देते. हें आमच्या पत्र व्यवहार करणाऱ्या गृहस्थाच्या लेखा वरून समजेल. H. D.

घड्याळ.

किं. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचे ( ह्मणजे चक्रांचें खालीं वर हिरे बसाविलेले आहेत ) चावी देण्यास मोगरा, कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक बिलोरी काचेचे सुदाम युरोप मध्यें करविलेले. या वर आमचें नांव आहे. हें खिशपांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।१२ वर्षें दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. व्हीं. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशीक

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण वद्य ११ शके १८१६

### वऱ्हाडचे दवाखाने

(१८९३ची हकीकत)

वऱ्हाड प्रांतांत सरकारी नोकरासाठीं ८ व खानगी लोकांसाठीं ३८ मिळून ४६ दवाखाने आहेत. सरकारी नोकरास फुकट औषध मिळतें तसें इतर लोकांसही फुकट मिळतें. सरकार आपल्या नोकराविषयीं इतके कृपाळु आहे कीं त्यांच्या बहल आरोग्यासाठीं औषधपाण्याचा खर्चही सरकारी खजिन्यांतून होतो. तेव्हां लोकांचे दवाखाने आहेत त्यांस धर्मार्थ दवाखाने अशी संज्ञा आहे पण आतां त्यांचें खरें मुळचें धर्मार्थपणाचें स्वरूप कायम राहिलें नसून तेथून औषध नेणाऱ्या रोग्यांस सालिना आपल्या वार्षिक उत्पन्नाच्या मानानें कांहीं वर्गणी औषधाची अगाऊ किंमत ह्मणून द्यावी लागते. शिवाय लोकांच्या दवाखान्याची उभारणी, खर्चवेंच, वगैरे भिक्षुकीवर परभारे भागला जावा असा सरकारचा विचार दिसतो. उत्तरोत्तर ज्या गोष्टी सरकारी पैशानें पूर्वींपासून होत आल्या आहेत त्या लोकांच्या दानशूरपणावर चालाव्यात असा अलिकडील राजनीतीचा कल आहे आणि तशाच गोष्टींपैकीं दवाखान्याची एक बाब आहे. आह्मी वर सरकारी पैसा असें ह्मटलें आहे पण वास्तविक तो लोकांचाच पैसा करांच्या रूपानें वसूल केलेला आहे. सरकारला सालिना जो वसूल मिळतो त्याचा राज्यकारभाराकडे खर्च होतो खरा पण इतर राजकीय व बंदोबस्ताच्या खात्यांचा खर्च इतका अवाढव्य वाढला आहे कीं लोकांच्या दवाखान्यांस देण्या इतकी रकम सरकारापाशीं खर्चण्यास नसते. सरकारचे राज्यशकट लोकांच्या संरक्षणासाठीं आहे तेव्हां लोकांच्या आरोग्या सारख्या सौख्याच्या व महत्वाच्या गोष्टीकडे सरकारची पैशासंबंधानें अवकृपा असेत हें नीट नाहीं. इतर खात्यांचे खर्च वाढतात त्या प्रमाणानें दवाखान्यांचे खर्च बाढले आहेत असें ह्मणवत नाहीं. आमच्या देशाची राहटी अशी पडली आहे कीं सर्व सार्वजनिक आरोग्याच्या व शांततेच्या गोष्टी सरकार मार्फत झाल्या पाहिजेत आणि आमच्या प्रांतिक सरकारचा रोख दवाखान्यांचा बोजा लोकांवर लादण्याचा आहे आणि त्यांतला गर्भितार्थ असा कीं दवाखान्यांचा खर्च लोकांच्या पिशवींतून निराळा काढला जावा.

दवाखान्यांच्या संस्था सरकारी आहेत आणि त्यांमध्यें आमच्या देशी वैद्यकाचा काडीमात्र शिरकाव नाहीं, आमच्या जुन्या शास्त्रोय रिती प्रमाणें पढलेल्या वैद्याच्या ताब्यांत एखादा दवाखाना सरकारनें देऊन त्याची उपयुक्तता पाहण्याची वेळ केव्हांच येऊन चुकली आहे. परतु देशी कोणत्याच कलेला सरकारांतून मान व उत्तेजन मिळत नाहीं. विलायत सरकारनें सर्व इंडियाभर विद्यापती कारभार करून सोडला आहे. आह्मास आपलेपणा व निराळेपणा वाटण्या सारखी आमची एकही संस्था अस्तित्वांत नाहीं ही मोठी शोचनीय गोष्ट आहे. निदान वैद्य क्रियेस लोकांच्या दवाखान्यांतून आश्रय मिळावा असें आमचें ह्मणणें आहे. स्वदेशी ह्मणूनच अमूक एक वस्तू पाहिजे किंवा जुनी ह्मणूनच एक वस्तु पाहिजे असें आमचें बिलकूल ह्मणणें नाहीं. परंतु आर्यवैद्यक फार उत्तम कोटींतलें आहे आणि तें अभ्यासाच्या अभावामुळें मलिन व अस्तंगत होत आहे तेव्हां त्याचें पुनरुज्जीवन योजेन्हुत व्हावें आणि आर्य व पाश्चात्य या दोन वैद्यकांच्या संमेलनानें जगाचा मोठा फायदा व्हावा हाच

मूळ हेतु आहे. या दूरवरच्या लाभावर नजर देऊन सरकार कांहीं व्यवस्था लोकांच्या दवाखान्यांतून करील तर बरें होणार नाहीं.

सरकारी दवाखान्यास युरोपियन लोकांकडून ७६ रुपये व नेटीवांकडून १० रुपये वर्गणी मिळाली आणि लोकांच्या दवाखान्यांस फक्त नेटीवांकडूनच रुपये ५६९१ १० आणे ८ पै. वर्गणी मिळाली आणि यांत युरोपियन लोकांची पै देखील नाहीं हें ध्यानांत ठेवण्या सारखें आहे. युरोपियन ह्मणजे हवेंतलीं पांखरें आहेत. या देशांत ते दाणापाण्याच्या संबंधानें झुंजत असतात. त्यांचें गृह, गांव व देश सात्ता समुद्रा पलिकडे आहे. त्यांचा या देशांतील संस्थांशी खरा कळकळीचा व अंतःकरणापासून संबंध विरळा आढळतो. संपत्तीच्या खाणींतील धन लुटण्या पलिकडे त्यांचा या देशाशी संबंध नसतो. त्यांचा सर्व ओढा बिलायतेस असतो आणि तिकडे त्यांच्या वित्ताचा प्रवाह वहात असतो. आमच्या देशांत त्यांचें वास्तव्य धर्मशाळेंतल्या बिऱ्हाडा प्रमाणें आहे आणि ह्मणूनच त्यांना इकडील लोकसंस्थास पदरच्या पैशानें मदत करावी असें वाटत नाहीं. ही स्थिती फार वाईट आहे आणि राज्यकर्ते हा देश आपलासा मानून वागतील तर त्यांत उभय पक्षांचें कल्याण आहे. लोकांचे दवाखाने वर्गणीनें चालवावे असा सरकारचा संकल्प असेल तर आमच्या मतें सिव्हिल हास्पितलें बंद करून सर्वच लोकांवर उत्पन्नाच्या मानानें दवाखान्याचा कर बसवावा ह्मणजे कांहीं समता व न्यायदृष्टी दाखविल्या सारखें होईल.

दरसाल प्रांतांतील दवाखान्यावरील हास्पिटल असिस्टंटच्या कामाचा उल्लेख होऊन ज्याच्या त्याच्या कामगिरी प्रमाणें बरा वाईट शेरा वार्षिक रिपोर्टांत लिहीत असत. ही माहिती सन १८९३ च्या रिपोर्टांत नाहीं ही गोष्ट सुमार होय. वार्षिक कामाच्या सिंहावलोकनानें हास्पिटल असिस्टंटास नव्या कामा विषयीं हुरूप येत असे व कामाची पारख होत गेल्या मुळें त्या लोकांस मोठा उल्हास वाटे. आमच्या मतें पूर्वींची पद्धत पुन्हां सुरूं होईल तर फार बरें?

सिव्हिल हास्पितलांत २०७१ रोगी औषध घेण्यासाठीं येऊन राहिले होते आणि ४८७४६ रोगी दवाखान्यांतून फक्त औषधें घेऊन गेले. शस्त्रक्रियेचे प्रयोग १७९ झाले त्यांत डाक्टर रेली यांचा नंबर पहिला आहे त्यांच्या खालीं अवध्येकरी मारिसन यांचा आहे. सिव्हिल सर्जनांचा पगार खेरीज करून एकंदर खर्च रु० २३१५० आ. ० पै ४ लागला.

धर्मार्थ दवाखान्यांत राहण्यास गेलेल्या रोग्यांची संख्या २२२७ असून दवाखान्यांतून औषधें घेणारे रोगी १७०,०२१ होते. गुदस्तापेक्षां साडे तेवीस हजार रोग्यांची वाढ आहे. रिपोर्टाच्या वर्षीं बडनेऱ्यास तेथील उदार पार्शी गृहस्थ मि० जहानगिर हारमसजी यांनीं एक नवा दवाखाना स्थापिला. सिरपुरास एक दवाखाना निघाला. असे नवे दोन मिळून एकंदर ३८ दवाखाने झाले. रा. रा. नरहर बाळाजी साहुकार कोळासपूर, यवतमाळ; व शिवरतन रामप्रसाद साहुकार, अकोट या उभयतांनीं प्रत्येकीं ५०० व २५० रुपये वर्गण्या दिल्या बद्दल आह्मी त्यांच्या औदार्याची तारीफ करितों.

———

सरबराईचा जुलूम किती कारी दरवाज्यांनीं व कुलूपी गोळ्यांनीं होत असतो याचा कांहीं थांग नाहीं सरबराई ह्मणजे सरकारी आफिसरापासून तों पट्टेवाल्यापर्यंत सर्वांची बरदास्त ते गांवोगांव फिरत असतांना गांवकऱ्यांनीं आपल्या पदरच्या खर्चानें करण्याची शिस्त होय. नवल इतकेंच कीं परमेश्वर कृपेनें ज्यांच्या जवळ चार पैसे आहेत, हातीं सत्ता आहे व ज्यांना सरकार मुबलक पगार देते अशा लोकांनीं खेडेपाड्यातील गोरगरिबांच्या पासून फुकट निर्लज्जपणा उपटाव्या व बिगारीनें काबाडकष्ट करून घ्यावे हें मोठें लाछनास्पद आहे. किंवा आश्चर्य तें कोणतें? धन एक अदृश्य लोहचुंबक आहे आणि त्याचा विलक्षण प्रकार असा आहे कीं तें धनालाच ओढतें. धनिक अधिक धनवान होतात आणि गरीब अधीक गरीब होतात. अन्नकाल ज्याच्या हातीं अनुकूलता असून जो सरबराईच्या मौजा मारणार नाहीं तो अभागी व पापी! सरबराईनें त्रस्त लोक पुष्कळ आहेत पण त्यांना कोणी वाली नाहीं. इकडील राज्यव्यवस्थेच्या गडेलहाकीमुळें वरच्या गोष्टी दृष्टीस उजेडांत आणण्याचीं साधनें आह्मापाशीं नाहींत ही मोठी दिलगिरीची गोष्ट होय.

दृष्टान्तांनीं आपली स्थिती व्यक्त करण्याचा एक मार्ग आहे. पण आपल्या सारखाच समदुःखी भेटला ह्मणजे एकमेकांनीं अश्रु ढाळावे एवढाच त्यांतला अर्थ असतो. अशा वेळीं एखादा हकीम पोटदुखी जाणणारा कालवशें प्राप्त झाला तर मात्र त्या अश्रुपाताचा कांहीं फायदा होतो. आह्मापाशीं तसा हकीम नाहीं तथापि कोणता तरी काल फलदायक होईल या मार्कंडेय वचनावर विश्वास ठेवावा हें बरें!

कलकत्यास एक नामी फार्स सरबराईचा उडाला तो असाः— मि. बिटसन बेल नांवाचे खुलन्याचे जिल्हा माजिस्ट्रेट आहेत. ते फिरत असतां एका जमीनदाराला दुध तयार ठेवण्यासाठीं सूचना आली. जमीनदाराच्या मोहरीलानें (बाबू केशवलाल मित्र यानें) कोंबड्यांचीं आंडीं, दुभत्या दोन गाई वगैरे हजर ठेविल्या पण माजिस्ट्रेटाची स्वारी दोन तास पूर्वींच दाखल झाली. चार शेर दूध काढून ठेविलेलें नव्हतें ह्मणून साहेब संतापले, त्यांनीं आदळ आपट केली, त्यांचें धैर्य गळालें आणि त्यांनीं मोहरीलाला बेशुद्ध होई पर्यंत मार दिला. पुढें त्या मोहरीलानें डेपुटि माजिस्ट्रेट बाबू सत्येश चंद्र बोस यांजकडे फिर्याद केली. फिर्याद खोटी ह्मणून ठरविली आणि खोटा खटला आणल्याबद्दल त्याजवरच उलट फौजदारी चालविली. परंतु परमेश्वर कधीं कधीं विचित्र प्रेरणा करितो. मूळ अपराधी जिल्हा माजिस्ट्रेट बेल यांनीं सेशन जज्जास लिहिलें कीं 'मी त्या मोहरीलाला हातांतल्या लहानशा छडीनें मारलें तें खरें आहे. फिर्याद खरी आहे. मी दुधाची किंमत पुष्कळपट दिली असती आणि पुढील दहावे मैलावर वाटेंत मी एका बाईला एक ग्लासभर दुधाबद्दल एक रुपया दिला. दूध तयार नव्हतें त्याबद्दल माझ्या प्रमाणें कोणीही मनुष्य संतापेल!' इत्यादि. लहानशी छडी होती तर बेशुद्ध व आजारी कसा झाला हें कळत नाहीं. वरील उदाहरणें वऱ्हाडांत शेंकडो घडतात पण कोणी पुढें येत नाहीं. वरील प्रकरण हायकोर्टीकडे गेलें. बाबू सत्येशचंद्र बोस सारखे नेटीव अंमलदारही इकडे पुष्कळ आहेत. आपली पोळी पिकावी व साहेबांचा मर्जी संपादावी ह्मणून आपल्या ब्रीदाला व प्रामाणिकपणाला तिलांजली सोडणारे लाल पुष्कळ दाखविता येतील. अशा लोकांना एकच उपदेश आहे तो हा कीः—

'काळ होई पाठमोरा। हातचा हिरा होई गारा' या प्रमाणें पापाचा घडा भरे पर्यंत त्यांची सुलतानी चालणार आहे! वरील उदाहरणावरून कोणी लाल शहाणपण शिकेल तर आमच्या लिहिण्याचें सार्थक्य होईल. हा खटला हायकोर्टापर्यंत पोचण्याला प्रसिद्ध बाबू मनमोहन घोस यांचें त्याच ठिकाणीं अकल्पित आगमन हें होय. यांनीं अशा अन्यायाला हायकोर्ट दाखविलें व दाद मागितली आहे या पासून आमच्या प्रांतस्थ वकिलांनीं एक कित्ता घेण्या सारखा आहे.

———

## प्रांतिक राष्ट्रीय सभा

———

सार्वजनिक कार्यांत या प्रांतांतील लोकांनीं पुष्कळ पुढारीपण घतलें आहे ही मोठी संतोषाची गोष्ट होय. मुख्यत्वें करून उमरावती व आकोला येथील प्रमुख वकिलांनीं व सार्वजनिक सभेच्या इतर सुखवस्तु गृहस्थांनीं एक अत्यंत बिकट पण अत्यंत उपयोगी कार्य आरंभिलें आहे. 'वऱ्हाड सार्वजनिक सभा' आपल्या अधिकारद्वारें सर्व प्रांताची एक प्रचंड व जाहीर लोकसभा भरविणार आहे. ही सभा येत्या नोव्हेंबरच्या दुसऱ्या व तिसऱ्या तारखेस दोन दिवस भरणार आहे. आणि याच सभेला प्रांतिक राष्ट्रीय सभा अशी संज्ञा दिली आहे. मुख्य राष्ट्रीय सभेनें जसा सरकारचा मंत्रिपणा पतकरला आहे. तसा या सभेचा हेतु प्रांतिक सरकारापाशीं आपल्या गरजा विदीत करण्याचा आहे. आपलीं सर्व दुःखें सरकारास निवेदन करावीं व त्यांच्या परिहारार्थ दाद मागावी हें जसें लोकांचें काम आहे तसें सरकारानें निष्पक्षपात बुद्धीनें, मोकळ्या मनोनिग्रहानें, व प्रजानुरंजनानें रयतेस सुखी अगर किमानपक्षी दुःखविमुक्त करावें हा सरकारचा राजधर्म होय.

नोव्हेंबरच्या जाहिरसभे विषयीं आगाऊ दोन अडीच महिने भगिरथ प्रयत्न करण्याचा येथील कांहीं सार्वजनिक लोकांचा कृतसंकल्प आहे आणि त्यांच्या आद्यस्थानीं राव साहेब देवराव बिनायक हे आहेत. सभेस येणाऱ्या लोकांचा पाहुणचार, आदरातिथ्य, व करमणूक इत्यादि गोष्टी आतां पासून योजण्यांत येत आहेत. सुमारें चार हजार परग्रामस्थ सभासदांस शिधासामुग्री फुकट लोककाजा प्रीत्यर्थ देण्याचें अभिवचन कांहीं श्रीमान व धुरीण लोकांनीं कबूल केलें आहे. या सन्मणिमालेंतील ग्रहस्थांची नांवें सध्यां प्रकाशित करण्या पेक्षां योग्य काळीं व स्थळीं त्यांचा नामनिर्देश जयघोषानें करण्याचें आह्मी योजिलें आहे. गेल्या १९ तारखेस राव साहेब देवराव विनायक यांच्या वाड्यांत प्रमुख लोकांची सभा भरून व्यवस्था-कमिट्या नेमण्यांत आल्या व कार्यसूची पत्राप्रमाणें पुढील तरतुदी केल्या जातील. सुमारें पांचशें रुपये वर्गणी किरकोळ खर्चासाठीं या जिल्ह्यांत गोळा करण्याचें ठरलें. या परवाच्या खानगी सभेला उमरावतीचे प्रसिद्ध वकील, प्रमोदसिंधुकर्ते व इतर ठिकाणची मंडळी पुष्कळ जमली होती.

सध्यांच्या कडेकोट तयारी वरून नोव्हेंबरची सभा अदृष्टपूर्व, टालेजंग व राजकीय दरबारा प्रमाणें होईल असा आमचा समज आहे. हजारो लोक एकत्र जमून राष्ट्रीय कार्यांचा विचार करितात असें वऱ्हाडच्या लोकांनीं जगास दाखविलें ह्मणजे आमच्या भावी सुखास व आनंदास भरती येईल असें आह्मी समजतों. लोकमताचें प्राबल्य ज्या प्रांतांत व्यक्त व स्पष्ट रितीनें स्थापित होईल त्यांचें भाग्य उदयास आल्याची खूण निराळी नको. या प्रांतिक राष्ट्रीय सभेस जे लोक हस्ते परहस्ते यथाशक्ती धनबल, मनुष्यबल, व विचारबल देतील त्या सर्वांचे आह्मी चिरकाल ऋणी राहूं.

———

The Berar Samachar

MONDAY AUGUST, 27, 1894

We have strong reasons to hope that some graduate will be appointed to the Principalship of the Training College, shortly to be vacated by Mr. V. R. Joshi. The attainments of graduates are two well acknowledged for a further elucidation. Moreover their promotions are an incentive to higher education and efficient work. Raosahib Patwardhan it is hoped will get certain rules passed and enforced for admission into public service similar to those which through the indefatigable exertions of Mr. Monro were obtained for the Central Provinces and strictly adhered to by Sir A. P. Macdonell when the Chief Commissioner of the Province. From a gentleman of such expectations, and conversant with the policy of the Bombay Educational Department of which he was a conspicuous officer we expect no other nomination. Moreover he will hardly fail to reconcile his words with his deeds. The rumours then rife in the town are probably unfounded. A junior officer unnecessarily superseding the rightful claimants holding a graded appointment of a Deputy Educational Inspector for over two years with the commendadation of the Director of Public Instructions under whom he had served is a fact which we can not believe in. Moreover though we might heartily congratulate on the good stars of the person whom rumour grants this post we might not forget that if he succeeds to this post simply because he is an undergraduate with a higher University qualification, there are others junior to him with still higher qualifications. Why then should they not supersede him on the strength of their qualifications if he supersedes others on that of his. If power be not the only explanation, the report we hear of is unfounded and really reflects on Raosahib Patwardhan's avowed policy. In filling up the Amraoti High School First Assistant Mastership Mr. Patwardhan respects the judgment of his predecessor, while in filling up the Principalship a graded appointment in the controlling agency of the Department, he sets it at defiance, is certainly incredible. To starve the department of able men when available is like starving the commissariat of an army. But to secure their services they must

at least get what they would have got if they were entertained in other lines. Their promotions and preferments must at least be what they would have been if they were in any other sister line in some other province. But the service of the Berar Educational Department is owing to its narrow limits conspicuously stagnant. Rao-sahib Patvardhan is a veteran officer quite familiar with the weak and strong points of his department or at least of a sister department. Promotions in other departments are strikingly rapid and equally dazzling They are often by twenties, fifties and so forth. Here they are hardly by tens even. Blind must an officer be not alive to these detriments to his service! We therefore assure those of our readers, interested in the department, that the rumour abroad has no sound foundation.

---

We take down some two paragraphs from the recent Judicial Commissioner's Report on Civil Justice. They will serve as a text to point out that the present money transactions between money-lenders and the borrowing Kunbis is a bad sign of the ruinous tendencies of the present times. If no helping hand is stretched forth to support the sinking ryots the disaster will ere long assume such dimensions as will make it a matter impracticable and beyond the possibility of improvement. Let the danger be seen seen all through. The remarks we allude to run as follow:—

"In 1569 cases moveable property was attached, and in 1,046 instances sale took place. Similarly in 1,515 cases immoveable property was attached, and in 1,062 instances was sale carried out. These figures are high and show that scarcity did affect the province.

Every inch of land is valuable in the plains of Berar, and every case is hotly contested in which it is the subject of dispute. To deal with this would require more space than can be alloted to it in an annual report. The rivalry between the money lender and the agricultural producer is the marked characteristic of our litigation, and in this struggle there can be no doubt that the poor man must gradually be the loser. I have no means of gauging how this competition between capital and labour is affecting the population, but I fear that the high rate of interest and the variations in the seasons must tell rapidly, and the land will inevitably fall to the money lender and the agriculturist become merely a worker for wages, and the servant of the Marwari."

What is then the remedy and will Govrnment condescend to think over the matter for a while? The relief should be three—fold. Agricultural Banks is the first and present need of the province to keep down the high rates of interest Dry remissions and partial reductions in revenue demands should lighten the burden of the agriculturist; and the last but not the least salvation of agrigrian discontent should be in the direction of an act like the Deccan Agricul—turist Relief Act. Let us hope for the best and let the local Government rise to occassion.

---

We have already annuced in our Marathi—columns the business with which Mr. Elliot the officiating Civil and Sessions Judge was commissioned a month before. The work was to hold an inquiry as to whether the establishments in the different departments of Revenue and judicial administration are full of men enough to cope with the rising and heavy work of the present day. The same question has been dealt with in the last report on Civil justice and from a separate para that stands there one would learn that the question of improving old establishments has received the impri—matur of the Judicial Commissioner's approval. He writes to the following effect:—

"I think this is a proper place to allude also to another point, that is the inadequacy of the ministerial staff of all the courts. It has been pointed out more than once that there is not an adequate number of karkuns and readers, and it is admitted that a revision of establishment is required. The sanctioned establishment has been going on with but slight variation since the present districts were formed. In the meanwhile work has almost doubled, and it is impossible to cope with it without an addition to the staff. I found in Ellichpur that it was so inadequate that decrees could not be written up as fast as they were passed, and the result was that copies could not be supplied to applicants, because the originals were not ready to copy. If a slight addition of, say, two karkuns could be sanctioned for each district, pending further consideration of the revision scheme, it would be a most useful concession, and would help Deputy Commissioners very much without causing very great expense. I would ask that this moderate proposal be taken into consideration as likely to improve matters."

---

Here is a nice picture of the pleasantness of a home-life over politics of which the writer in "To—day" magazine speaks in a humorous style:—

"Politics are a very small factor in the great scheme of life. We are ruled by nature's laws: the petty, tinkering measures that we make or unmake for ourselves are child's play, not man's work. Men lived and died, and laughed and wept, long before the plague of politicians was—for some wise, hidden purpose—let loose upon the earth; and the old world will roll on and the stars will shine when Parliaments and parties are remembered only as the restless dream of a long past night. "Fret not thy-self because of evil-doers." We each have a little kingdom of our own, and it is there that our thoughts and hopes should lie. There, as king or queen, we have to rule a turbulent but loving little band of subjects; and work enough they give our hands to do. There are riots to be suppressed and and law and order maintained. Education has to be encouraged and *fetes* and sports to be arranged, or the unruly populace will be getting into mischief. Committees of ways and means must be attended and boards of health established. The exchequer needs much supervision, imports and exports must be carefully adjusted on a sound financial basis, and rates and taxes gathered from the ruddy baby lips and the dimpled baby arms. Let us live more within this fairy isle of ours. Life is so still and peaceful in its untrampled groves. The troubled waters of the world break harmlessly against its silver sands, and the swell from the great ships passing by heaves for a moment on its shores, then sinks and dies away. Its skies to us are always fair, for they are the faces that we love. Its sunshine is the smiles that we have awakened. Of such fair kingdoms there are many on the deep sea of life, and we call them by the pleasant name of Home."

## वऱ्हाड.

हवामान— पाऊस बद्दल हाकाटी सुरूं झाली. पण पाऊस लवकरच पडेल असें वाटतें. आणि वाशिमकडे कांहीं पाऊसही पडला. रागराई थोडीबहूत प्रांतभर सुरूं आहे.

---

वऱ्हाड प्रांतांत ज्या म्युनिसिपालिट्या आहेत त्यांच्या हद्दींत देवीखात्याचें काम सुयंत्र, सुलभ व प्रसृत व्हावें ह्मणून नवीन नियम करण्यांत आले आहेत. या नियमांची पूर्ण अमलबजावणी झाली ह्मणजे मुनिसिपल हद्दींतील देवी काढण्याचा कारखाना निर्वेधपणे चालेल व सार्वजनिक आरोग्य एका रोगापासून बचावेल असा अंदाज आहे. म्युनिसिपाल हद्दींतले लोक अधिक शिकलेले, कायदा जाणणारे, व विशेष समंजस असतात, अशी कल्पना आहे तेव्हां हे नवे नियम थोडे बहुत कडक आहेत तथापि त्यांचा दुरुपयोग होऊन लोक जाचांत पडणार आहेत असें वाटतें.

---

रा० रा० मनसुखराय एक्स्ट्रा असि० कानझरव्हेटर वणी यांस गेल्या सोमवार पासून दोन महिने आठ दिवसांची हक्काची रजा मिळाली. आणि त्यांच्या रजेंत वणीचे फॉरेस्ट रेंजर रा० रा० व्ही० कृष्णस्वामी यांस नेमण्यांत आलें.

---

सब ओव्हरसिअर रा० रा० रघवीर सिंग यांनीं वरिष्ठाचा हुकूम तोडल्यावरून व कामांत हयगय केल्यावरून त्यांस बडतर्फ करण्यांत आलें आहे.

---

गेल्या गुरुवारीं कर्नल मेकंझी यांस उमरावती मुनसिपल हालांत मोठी पानसुपारी झाली. रा० रा० पांडुरंग गोविंद यांनीं उर्दूत, व गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांनीं इंग्रजींत साहेबांचें गुणवर्णन व अभिनंदन केल्या नंतर कर्नल मेकंझी यांनीं सर्वांचे आभार मानले आणि तें आभारदर्शक भाषण मराठींत रा० रा० रंगनाथ नरसिंह यांनीं लोकांस कळविलें. एकंदरीनें पानसुपारीचा समारंभ उत्तम झाला.

---

मे. खानबहादूर शमसुद्दीन अलीखान डेपुटी कमिशनर वाशिम हे थोडे दिवसांच्या रजेवर हैद्राबादेस जात आहेत.

---

परवां शनिवारीं कर्नल मेकंझी यांच्या अध्यक्षतेखालीं लेडी डफरीन फंडाची सभा भरणार होती. उमरावतीस स्त्रियांसाठीं दवाखाना बांधला जात आहे त्या साठीं वर्गणी गोळा करण्याचा हेतु आहे. विलायती धाटणीचें हें इस्पितळ चालेल तर आह्मास त्याची मोठीशी उपयुक्तता वाटत नाहीं.

---

गेल्या १९ वे तारखेस रा० रा० गोविंद नारायण काणे उमरावतीकर वकील यांनीं अकोलेकर मंडळीस आपल्या सुरस व्याख्यानानें हुद्धधर्म व गौतम बुद्ध यांचें चरित्र यांची उत्कृष्ठ गोडी लाऊन दिली.

नादारी मोकदमा नंबर ३९ सन १८९४.

नमुना नंबर ( जी )

विद्यमान नादारी कोर्टाचे जज्ज जि० आकोलें.

सर्वत्र लोकांस नोटीस देण्यांत येतें कीं रघुनाथ वल्लद राजाराम पंथ पाळ्या मारवाडी वस्ती भामोद तालुके दर्यापुर हा नादारी आहे असा आज तारीख ११ माहे ८ सन १८९४ इसवी रोजीं ठराव झाला अहे. आणि तारीख २२ माहे सप्टेंबर सन १८९४ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचे आसाईनीं नेमून देण्या करितां व नादारानें आपले सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमला आहे.

नादाराच्या सुटके संबंधी ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्या बद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी त्या नोटीशींत ज्या आधारा वरून तक्रार सांगणें असेल ते व त्याजबद्दल ज्या साक्षीस समन्सें करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदाराचीं नांवें नमुद करावीं. ही नोटीस जमण्याकरितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पाहण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत.

ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असल्याबद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दुरचे राहणार असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशिअल आफिसरापुढें तिच्या खरेपणा विषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपालाकडून कोर्टास पाठवावी ह्मणजे ते दावे रजिस्टरांत दाखल होतील आज तारीख२२।८।९४.

B. B. Sule

नादारी कोर्टाचे जज्ज जि० आकोला

---

## जाहिरात.

सर्वत्र लोकांस 'या जाहिरातीनें' सधी मर्द किसनसिंग इंगळे हल्लीं राहणार बाजार सांगवी तालुके अकोलें इजकडून सर्वत्रास जाहिर करण्यांत येते कीं किसन वल्लद कंगाजी इंगळे राहणार अमकापूर तालुके अकोलें हा माझा नवरा असून आज सुमारें सात वर्षें झालीं कोठें त्याचा पत्ता लागत नाहीं. पत्ता लावण्याचे जितके इलाज होते तितके ह्या वेळपर्यंत केले. ह्मणून गाइलाज होऊन जाहीर करिते कीं, सदहू किसन वल्लद कंगाजी याचा कोणी तपास लाऊन देईल तर त्यास आह्मी रुपये ( ५ ) इनाम देऊं. ह्मणून दिली जाहिरात सही. तारीख २१ माहे अगष्ट सन १८९४ इ०

( सही )

सहीची निशाणी बांगडी राधी मर्द किसनसिंग इंगळे हिच्या हातची असे

---

## वर्तमानसार.

लंडन, ता० ११—इंग्लिश सरकारानें जपानी सरकारास असें कळविलें आहे कीं, या लढाईंत आमच्या लोकांच्या जीवाचें किंवा मिळकतीचें जर कांहीं नुकसान होईल तर त्याचा जाब तुह्मास द्यावा लागेल.

शांघाई, ता० ११—जपानचें १२ हजार सैन्य फुसन येथें उतरलें असून ८ हजार गेनसन येथें आलें आहे. ही फौज चीनचे ३० हजार लोक कोरीयांत आले आहेत त्यांच्याशीं सामना करण्या करितां आलेली आहे.

चेफू येथून जी तार आली आहे त्यावरून समजतें कीं, जपानचें आरमार वीहैवी नाचाच्या बंदरावर काल रोजीं उतरलें असून त्यांनें एका दरवाजावर हल्ला केला असतां तो हल्ला माघारा फिरला. पुनः आरमारानें दुसऱ्या दरवाज्यावर हल्ला केला तरी त्यांस माघारेंच हाटावें लागलें.

लंडन, ता० १९—आरदर व वीहैवी या बंदरावर हल्ला करण्या करितां जपानचीं २६ जहाजें गेलीं होतीं अशी बातमी लागते. लढाईंत दोन्ही शहरास किंचितही धक्का लागला नाहीं. जपानच्या जहाजांवर किल्यांतून तोफा सोडल्या पण त्याच्या योगानें जपानच्या जहाजासही विशेष इजा झाली नाहीं.

मुजफराबाद येथील खजिना खजिनदारासुद्धां २३ हजारांचा हरवला आहे!

लाहोरास एक साधू आला असून तो ह्मणतो मी मेलेलें मनुष्य जीवंत करून ३ तास बोलवितों! पुनः तें मरावयाचेंच. कांहीं हेतू राहून ज्या मरणाऱ्यांस बोलण्यास सवड सांपडली नसेल त्यांची सोय चांगली होईल.

खैरपूरच्या मीर साहेबांनीं सिंध प्रांतांतील मुसलमानांच्या मुलांस विद्या शिकण्याचें उत्तेजन येण्याकरितां ६० हजार रुपयांची रक्कम काढून ठेविली आहे.

लखनौस महामारीचा सपाटा सुरू होऊन शेकडो लोक मेले व तेथील फौज अजीबात काढून नेली. पु. वै.

आस्ट्रेलियांत एक नवीन मोठी सोन्याची खाण सांपडली आहे.

तुर्कस्थानांत कान्स्टान्टीनोपल येथें जो नुकताच धरणी कंप झाला, त्यामुळें एक हजारावर माणसें, जमिनींत गडून गेलेलीं सांपडलीं.

मोरोको येथें काबीली जातीच्या मूर लोकांनीं बंडाळी चालविली आहे.

स्काटलंडास स्वतंत्रता देण्याचा कायदा पार्लमेंटांत पास झाला.

युरोपांत कालरा मोठ्या सपाट्यानें सुरू झाला आहे. हिंदुस्थानांत थोडथोडा आहे. यावरून युरोपांत इकडे आला असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

वायव्य प्रांतांच्या सेक्रेटरीयटमधील एका शिपायानें बरेच दिवसापासून सरकारी फायलीचीं बुकें जाळून त्यावर स्वयपाक करण्याचें काम चालविल्याबद्दल हल्लीं तपासांत बाहेर आलें आहे. आणखी काय काय असेल कोणास ठाऊक!

अमेरिकेंत चिनी लोकांस स्थायिक राहूं देण्याचा कायदा मंजूर झाला. स. वि.

कलू खिंडींत डोंगर ढासळून एक खेडें त्या खालीं गर्द झालें. गांवांतील फक्त सात माणसें जीवंत निघालीं.

निजाम सरकारानें आपला राज्यकारभार चालविण्याकरितां एक वेगळें कौंसल नेमलें आहे. पण त्या कौंसलाचा कोणताही ठराव न जुमानतां त्याच्या विरुद्ध अंमल करण्याचा आपल्या दिवाणास अधिकार दिला आहे. हा अधिकार चालवितांना दिवाणानें फार विचार करावा आणि खुद्द निजामास कळवून त्यांची मंजुरी घेऊन चालवावा असें मात्र फर्माविलें आहे. हें निझामाचें करणें कित्येकांस पसंत नाहीं, पण त्यांत नांव ठेवण्यासारखें कांहीं दिसत नाहीं. सगळ्या कौंसलदारांच्या मताविरुद्ध एकट्या स्टेट सेक्रेटरीस जर कापडावरील जकांत घेण्याचें बंद करतां येतें, इतकेंच नव्हे तर पार्लमेन्टचा ठरावही जर एकट्या स्टेट सेक्रेटरीस फेकून देण्यास येतो तर निझामाच्या दिवाणास तसा अधिकार कां असू नये? ठा० अ०

| चीन | | जपान |
|---|---|---|
| ४१७९६५९ | क्षेत्रफळ | १४७५५५ |
| ४०४१८०९०० | वस्ती | ३९६०७२३४ |
| थेल नाणे | | येन नाणें |
| ७९६००००० | उत्पन्न | ९२८१४८०९ |
| १६००००० | फौज | ३०००० |
| १०० | आरमार | ४४ |
| बादशाही | सत्ता | गादशाही |
| थेल नाणें | | येन नाणें |
| | आयात मालाची किंमत | |
| ११०८८४३५५ | | ६६०४१५८४ |
| | निर्गत मालाची किंमत | |
| ९६९४७८३२ | | ६९३०६८९४ |

ह्या दिलेल्या सामान्य माहिती वरून चीनचा विस्तार, लोक वस्ती, उत्पन्न आयात व निर्गत माल किती आहे व जपानचा किती आहे. हें सहज समजेल. दोन्ही राष्ट्रांच्या फौजा व आरमारें अलीकडच्या पद्धती प्रमाणें उत्तम प्रतीचीं आहेत. शेवट जय अपजय कोणास मिळतो व कोणाचें किती नुकसान होतें व त्याचा परिणाम एकंदर देशावर कसा काय घडतो हें कांहीं अवधानें समजेल. शु० सु०

बऱ्हाणपूर येथें काळ्याचा आजार तडाख्यानें सुरू आहे. गांवांत जप व अनुष्ठाने वगैरे दैविक आराधना सुरूं आहे. याच बाईच्या तडाख्यामुळें बऱ्हाणपूर येथील 'आर्यवैभव' छापखान्याचे मालक रा. रा. रघुनाथराव भिडे गेल्या आठवड्यांत मरण पावले.

एक युरोपियन पोहणारीण बाई इंग्लिश च्यानलमध्यें आपलें कौशल्य दाखविण्यासाठीं अमेरिकेहून निघाली आहे. एकंदर गोऱ्या बायांची कमाल आहे ह्मणावयाची!

गजानन एम. नवलकर नांवाचा एक हिंदु स्काटलंडमध्यें सॅनीटरी एन्जीनियरच्या परिक्षेंत पास झाला ह्मणून समजतें. चांगलें.

उंदीर व घुशी याजवर उपाय—भाकरीचा चुरा, कळीचा चुना व साखर हीं तिन्ही सममाग घ्यावीं आणि त्यांचें चूर्ण करून बिळापाशीं ठेवावें, ह्यांना साखरेची फार आवड असल्यामुळें तें मिश्रण प्रेमानें खातात, परंतु पोटांत गेल्यावर चुन्याच्या कळीचा संयोग पातळ द्रव्यांशीं होऊन शिजूं लागतो. पाण्याचें भांडें जर नवळ ठेविलें असलें तर पाणी पिऊन तात्काळ मरण पावतात. फार सोपी व थोड्या खर्चाची युक्ती आहे.

शहाणा घोडा— क्रिस्टलप्यालेस (स्फटिकप्रासाद) मध्यें हल्लीं एक घोडा आणिला आहे. त्यास फ्रेंच व जर्मन भाषा समजतात. त्या भाषेंत विचारलेल्या प्रश्नाचीं उत्तरें तो खुणांनीं देतो. समोर उभ राहिलेल्या रांगत किती मंडळी आहे, हें खुरानें लिहून दाखवितो. घड्याळांत किती वाजले हेंही त्यास बरोबर समजतें.

कन्याविक्रयाची बंदी—खानदेशांतील धरणगांव येथील माळ्ये लोकांनीं एकत्र जमून असा ठराव गेले महिन्यांत केला आहे कीं, आपल्या पैकीं कोणीही कन्याविक्रय करूं नये व मुंबईंत मुलगी देऊं नये. या ठरावाविरुद्ध वागणारास आजन्म अपंक्त ठेविलें जाईल. हा ठराव स्टांपावर सह्या साक्षींनिशी झाला असून त्या प्रमाणें शपथाही घेण्यांत आल्या. ब्राह्मण लोकांचें लक्ष इकडे लागेल काय? न्या० सूधा०

रानटी लोकांत बोलतांना लाजणारे लोक मुळींच नाहींत.

लंडन शहरांतील गटारांची लांबी ३००० मैल आहे, तारायंत्राच्या तारांची लांबी ३४००० मैल, ग्यासाच्या नळ्यांची लांबी ३,२०० मैल, व पाण्याच्या मोठ्या नळांची लांबी ४,५०० मैल आहे.

स्वीडन व नॉर्वे देशांत जोग्यांचे किंवा जोगिणींचे मठ मुळींच नाहीत. अशा मठाचा कायद्यानें प्रतिबंद केला आहे.

आस्ट्रेलियांतील कुत्रे व इजिप्ट देशांतील घनगरी कुत्रे मुळींच भोंकत नाहींत.

मनुष्याच्या आयुष्याचे दरसालांत सरासरी सुमारें दहा दिवस आजारीपणांत जातात.

एक जर्मन भूशास्त्रवेत्त्यानें असें मत आहे कीं, मृत समुद्र (एशिया मैनर) ५००० वर्षांनीं एक मिठाचा खडक बनेल. क०

---

नोटीस

नोटीस बेशमी केशव गणेश कृष्णपक्षी रहाणार खामगांव तालुके मजकूर यांस नोटिशीचें उत्तर देणार खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी नोटीस दिलेली पावली त्यांत आपण लिहिलें कीं आह्मी तुमचे गुमास्ते असून तुमचे आपसांतील तंट्याचें काम चालविण्याबद्दल माझा ठराव रुपये २४० देण्याबद्दल ठराव केला असून त्या प्रमाणें मी तुमचें काम केलें व तुमचेकडून मजला ठरावा पैकीं ६० रुपये मिळाले व त्याजबद्दल पावतीही दिली व शिवाय ठरावा पैकीं रुपये १२० देणे राहिले आहेत ते द्यावे अशा विषयींची नोटीस आली वरून तुह्मास ह्या नोटिशीद्वारें कळवितें कीं मी आपणास ठरावा बद्दल कांहीं एक दिलें नाहीं व आपण मजला पावतीही दिली नाहीं व मी तुह्मास वर लिहिले प्रमाणें रुपये देण्याबद्दलचा ठरावही केला. नाहीं विनाकारण आपण बळेंच खोटें लिहून नोटीस दिली वरून मी तुह्मास रुपये देईन असें समजूं नये. तुह्मी मजवर जी नोटीस दिली त्याचें कारण हेंच कीं तुमची व माझी ओळख नसून तुह्मी आपले बरोबर तीन चार इसम घेऊन माझे गांवीं आले व मजला सांगूं लागले कीं मी पूर्वी सरकारी नोकर असून मजला सर्व कामाची माहिती आहे व मी शिराळे येथें तुमचे जेठाचे घरीं नोकरी केली हल्लीं माझी नोकरी सुटली आहे व मजला तेथील सर्व हकीकत माहीत आहे; जर तुह्मी मजला नोकर ठेवाल तर मी तुह्मास सर्व कामकाजाची माहिती सांगेन व तुमचा पुष्कळ फायदा होईल असें काम करीन. मी बायको मनुष्य असल्यामुळें व तुमचे बरोबरील मनुष्यानी तुमची खात्री सांगितल्या वरून व तुह्मी फार हुशारीच्या गोष्टी सांगितल्या वरून मी तुह्मास ह्मटलें कीं जेव्हां काम पडेल तेव्हा तुह्मास बोलावून घेऊं. हल्लीं आगचा आपसांत वाद वगैरे कांहीं नाहीं. पूर्वीं आह्मा आपसांत समजूं. आपसांत न समजल्यास पुढें तुमचे मार्फत काम करूं. तरी तुह्मी मजला पुन्हा थापा देऊन सांगितलें कीं आपसांत समजूत होत नाहीं हें पक्कें आहे तुह्मी काम चालविल्यास तुमचा फायदा होईल नाहींतर पैशाची अफरा तफर होईल यांत नुकसान आहे अशा प्रकारें सांगितल्यावरून तुमचे विश्वासावर जाऊन तुह्मी ह्मटलें कीं तुमचें काम करीन तर मजला रुपये ५० द्यावे. न काम झाल्यास जितके दिवस काम करीन तितके दिवसाचा पगार दर महा रुपये ८ प्रमाणें चुकून द्यावे या प्रमाणें तुह्मी सांगितले तरी मी पक्का ठराव मुळीच केला नाहीं नंतर तुह्मी ह्मटले कीं काम मजला पूर्वी द्या मग ठराव कमी जास्त करूं. यामुळें मी तुमचेकडे काम दिलें. व प्रथमच तुह्मी ह्मटलें कीं, या फिर्यादीचे कामास रुपये २०० पाहिजेत ते द्यावे पुढें काम दाखल होऊन निकाल झाल्यावर हिशोब होईल त्यावरून मी परभारे लोकांकडून तुह्मास रुपये फिर्यादी करितां रुपये २०० देवविले त्या नंतर आठ चार दिवसांनीं तुह्मी कांहीं नोटीसा वगैरे छापले देऊन मजला सांगितलें कीं मी फिर्यादी दाखल करून अवल नोटिसी दिल्या आहेत कारण की आपले पैशाची अफरातफर होणार नाहीं असें सांगून पुन्हा वकिलास देण्याचे रुपये ६० ठरले आहेत ते द्यावे. वकील पत्र दिले पाहिजे काम सुरू आहे तर मी वकिलास देण्याकरितां रुपये ६० दिलें पुढें कांहींच काम मजला दिसलें नाहीं वरून मी चौकशी केली असतां आपण फिर्याद वगैरे न करितां फक्त नोटिसी दिल्या व वर लिहिलें प्रमाणें रुपये २६० आपण घेऊन गेला असें समजलें या प्रमाणें ठकबाजी केली व याच प्रमाणें माझी जाऊ नामे गुजाबाई इजला ही थापा देऊन कांहीं पैसा खाल्याचे समजलें वरून आह्मी तुमचे वर फौजदारी करावी तर चार लोकांनीं समजाविल्यावरून प्रथम आह्मी तुह्मास रुपये देण्याबद्दल मागणें केलें तर तुह्मी सांगितलें कीं माझा पगार वजा जाता बाकी रकम दोन तीन दिवसांनीं पटून देतो तरी तुह्मी रुपये न देतां वर लिहिलें प्रमाणें नोटिसीनें कळवितां. असें केल्यानें रुपये आपणास सुटतील असें समजूं नये करितां ही नोटिस पावल्या तारखे पासून ८ दिवसाचें आंत आमचे रुपये आह्मास देऊन पावती घ्यावी जर या प्रमाणें न कराल तर तुमचे वर ठकबाजी बद्दल फौजदारीत प्रथम व्यवस्था करून नंतर पैशाबद्दल रिती प्रमाणें दाखल करूं हें पक्कें समजावें. कळावें तारीख १४ माहे अगष्ट सन १८९४ इसवी.

(सही) धिंधाबाई गर्द गावाजी रावणकार वस्ती सेलोडी निशाणी खुद्द बांगडी.

---

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.